म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ..... सा. वा.
दा. क्र. ६७०८

IRBK-0106978
IRBK-0106978

॥ ૬ ૯૯૫૮

નોંધણી ૯૬૯૫

22648

એલવાડ-૫૨

288

3/7/58

प्रवचन-–स्मृति

# सावित्री-चरित्र

प्रवचनकार

के. वेदान्तवाचस्पति पं. भाऊशास्त्री वझे

[illegible]
दि. [illegible]

IRBK-0106978

किंमत १। रुपया

नेलैंकर बुकसेलर्स, बुधवार चौक, पुणें २.

# प रि च य


**रा. ब. डॉ. रा. त्र्यं. मोने** यांचा जन्म सन १८८६ मध्यें झाला. १९०४ मध्यें मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनीं पोस्टांत नोकरी धरली व वकिलीचा अभ्यासही सुरू केला. पुढें कांहीं दिवस त्यांनीं नगरला शिक्षकाचेंहि काम केलें. १९०६ मध्यें बी. जे. मेडिकल स्कूल या संस्थेच्या प्रवेश-परीक्षेस बसले व पहिले आले. त्यामुळें त्यांना स्कॉलरशिप मिळाली. या संस्थेच्या चारहि परीक्षांत त्यांनीं पहिला नंबर मिळविला व सर्व बक्षिसें मिळविलीं. १९१० सालीं त्यांची सब असिस्टंट सर्जन या हुद्द्यावर नेमणूक झाली. त्यानंतर त्यांनीं एल्. सी. पी. एस्. व एम. सी. पी. एस. (मुंबई) ह्या दोन परीक्षा दिल्या व त्यांत पहिला नंबर मिळविला. त्यांना १९२५ मध्यें नाशिकला ॲक्टिंग सिव्हिल सर्जन म्हणून नेमलें. ते वयाच्या ४० व्या वर्षी विलायतेंत गेले. तेथें त्यांनीं एम्. आर. सी. एस्. इंग्लंड, एल्. आर्. सी. पी. लंडन, डी. टी., एम्. व एल्. एम्. ह्या पदव्या मिळविल्या. परत आल्यावर सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांनीं धुळें, जळगांव, विजापूर, ठाणें, पुणें, बेळगांव व धारवाड या जिल्ह्यांत सिव्हिल सर्जन, म्हणून काम केलें. त्यांचें शस्त्रनैपुण्य व कार्यशासन यांबद्दल त्यांना "रावबहादूर" ही मानाची पदवी १९३६ मध्यें देण्यांत आली. त्यांचें हें चरित्र स्वावलंबनाचा व स्वोद्धाराचा आदर्श आहे. सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर त्यांनीं अमळनेरास श्रीमंत प्रतापशेठ यांनीं चालविलेल्या धर्मार्थ रुग्णालयांत सेवा पत्करिली. अंमळनेरास गेल्यापासून त्यांच्या अंगच्या प्रभुदत्त गुणामुळें व अविश्रांत काम करण्यामुळें खानदेशांतील रोगी जे पूर्वी मुंबईकडे धांव घेत असत ते अंमळनेरास जाऊं लागले. आपल्या गोड व गरीब स्वभावामुळें लहानापासून थोरापर्यंत सर्वांना ते अतिशय प्रिय होऊन राहिले आहेत.

भरपूर पैसा मिळाला तरी त्याचा सदुपयोग करण्याची इच्छा होणे हे भाग्याचें लक्षण आहे; आजपर्यंत त्यांचेकडून अनेक संस्थांना हजारों रुपयांची मदत होत आली आहे.

---

मुद्रक : य. वि. लेले, अशोक प्रिंटिंग प्रेस, ५७०, शनवार पेठ, पुणें २.
प्रकाशक : बा. म. नेर्लेकर, नेर्लेकर बुकसेलर्स, बुधवार चौक, पुणें २.

रा. ब. डॉ. भाऊसाहेब मोने



अनुक्रमांक २२८५
वर्गवारी
नों. दि. ३/७/१५

प्रवचनकार

# कै. वेदान्तवाचस्पति पं. भाऊशास्त्री वझे



# प्रस्तावना

श्रीपरमपूज्य गुरुवर्य भाऊशास्त्री वझे यांचा व माझा परिचय १९३२ साली झाला. त्यावेळीं त्यांची आनंदाश्रमांत प्रवचनें चालू होती. १९३९ पर्यंत म्हणजे ते पुण्यांत असेंपर्यंत मी प्रायः त्यांचीं सर्व प्रवचनें ऐकलीं आहेत व लिहून काढून त्यांना वाचूनहि दाखविली आहेत. माझ्याच प्रमाणें श्री. बिवलकर यांनीहि बहुधा त्यांची प्रवचनें ऐकून स्वतः लिहिलेली त्यांच्या कडून ऐकवून तपासून घेतलेली आहेत. ही मुद्रित करावीत अशी बऱ्याच श्रोतृजनांची इच्छा होती पण ती आतांपर्यंत सुप्तावस्थेंतच राहून गेली. श्री. रा. ब. डॉक्टर रामचंद्र व्यंकटेश मोने व त्यांच्या तिघा बंधूंनी त्या इच्छेला जागृतावस्था आणली आहे. प्रथमतःच मला हे सांगणें जरूर आहे कीं ही प्रवचनस्मृति जतन करण्याचे श्रेय श्री. बिवलकर यांना देणें जरूर आहे. ह्या प्रवचनस्मृतींचा वाङ्मयसंग्रह फार मोठा आहे. आज प्रसिद्ध होणार असलेले सावित्री-चरित्र हे केवळ प्रतीकात्मक आहे. (म्ह. नमुन्यादाखल आहे.)

कोणता असा भारतीय वैदिक असेल कीं त्याला हे सावित्री–चरित्र ज्ञात नसेल. पण आपाततः जरी या चरित्राचें ज्ञान असले तरी वटपूर्णिमेला स्त्रिया वटवृक्षाची पूजा करतात, गाणीं म्हणतात, ब्राह्मणाला दक्षिणा देतात, इतकेंच सामान्य भावनात्मकस्वरूप त्यांना माहीत असते.

वास्तविक ही कथा कोठे आली? कां आली? तिचा प्रसंग कोणता? सांगणारा वक्ता व ऐकणारा श्रोता कोण? व या कथेचें असामान्य वैशिष्टय कोणते हें चतुर व मार्मिक पंडितावांचून कळणें कठीण आहे. रत्न, रत्न असेल पण रत्नपारख्यावांचून त्याची खरी पारख वा किंमत कशी होणार? या कथेंत तत्त्वज्ञान कोणतें, काव्य कोणतें, स्वभाव वैशिष्टय कोणतें, कोणत्या ठिकाणीं कसा कसा रसपरिपोष निर्माण झाला आहे, हें सांगण्याकरितां उत्तम वक्ता लागत असतो. या सर्व वक्तृत्वगुण संघाचा संपूर्ण विकास (जर कोठे झाला असेल तर तो) पंडित भाऊशास्त्री वझे यांचे ठिकाणीं झाला होता, हें त्यांच्या कोणत्या श्रोत्यास अज्ञात असेल? त्यांनीं पुणें सोडून जवळ जवळ बारा वर्षे झाली पण त्यांच्या प्रवचनस्मृतीचा सुगंध प्रत्येक श्रोत्याच्या मनांत अजून दरवळत आहे; अर्थात त्याला अधिक प्रफुल्लितपणा प्राप्त व्हावा

म्हणून हो प्रवचनस्मृति मुद्रित होत आहे. हिचे आवघ्राण कोणता सुविद्य करणार नाहीं ?

आजच्या काळांत हे सावित्रीचरित्र स्त्रियांना तर वैचारिकदृष्ट्या आदर्श-भूत वाटेलच परंतु पुरुषांनाही पण वहकून न जातां सन्मार्गस्थ कसे व्हावे हे मत्यवान चरित्रावरून कळेल. या चरित्रांत काय नाहीं ? तत्त्वज्ञान आहे, चारित्र्य आहे, शील आहे, काव्य आहे, प्रतीभा आहे, म्हणून मला असा आत्मविश्वास आहे, कीं जनता या पुस्तकाचा जरूर पुरस्कार करील व आत्मकल्याण संपादन करील.

आपला,
गोविंद नरहर पंढरपुरेशास्त्री
वेदान्त उपनिषत्तीर्थ.

## हृद्गत

कै. वे. शा. सं. पंडित भाऊशास्त्री वझे यांची ओळख अध्यात्माची आवड असणाऱ्यांना करून देण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. त्यांची प्रवचनें मराठीत अगर हिंदीत ज्यांच्या कानांवरून गेली असतील त्यांना शास्त्री-बुवांची आठवण विसरूं म्हटलें तरी साधेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. संगीतात जसें बालगंधर्वांचें गाणें गोड व अवीट त्याचप्रमाणें प्रवचनांत शास्त्रीबुवांची रसाळ व प्रासादिक वाणी.

शास्त्रीबुवांची प्रवचनें छापून प्रसिद्ध व्हावीत असे अनेकाप्रमाणें आमच्याही मनांत होते; सुदैवानें पुणे येथील श्री. रा. कृ. बिवलकर यांनीं त्यांची प्रवचनें उतरून घेतलेली आम्हांस मिळाली व ती छापून प्रसिद्ध करण्याची इच्छा व सहाय्य रा. ब. डॉ रामचंद्र व्यंकटेश मोने व त्यांचे थोरले बंधु श्री. शंकर व्यंकटेश मोने यांनीं दर्शविल्यामुळेंच हा योग आला आहे.

प्रवचनें प्रसिद्ध करण्याची ही पद्धत ( जसे त्यांच्या तोंडून बाहेर पडले तसे ) जर लोकांना आवडली तर शास्त्रीबुवांची आणखीही कांहीं प्रवचनें प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. प्रभूची काय इच्छा असेल त्याप्रमाणें घडेल. इति.

प्रकाशक

# श्रद्धांजलि !

माझे परमपूज्य वडील कै. ती. पं. भाऊशास्त्री वझे यांनी सन १९४३ साली पुण्यांत खुन्यामुरलीधर मंदिरांत सावित्री-चरित्रावर दिलेली १४ प्रवचनें आज प्रसिद्ध होत आहेत, या गोष्टीने मला आनंदाचे इतके भरते येत आहे कीं तें व्यक्त करण्यांस लेखणी चालत नाहीं. वास्तविक हा योग यापूर्वी माझ्याकरवीच यावयास हवा होता, परंतु लिहिण्यांत अनभिज्ञ व प्रसिद्ध करण्यांस आर्थिक दृष्टीनें असमर्थ या दोन्ही तऱ्हेनें मी पंगु असल्यानें, वडिलांची ही सेवा मी करूं शकलो नाहीं हे माझे दुर्दैव. तथापि "अवश्यं भाविभावानां" या व्यासोक्तिनुरूप पृथ्वीच्या पोटांत दडून राहिलेलीं रत्नें जशी यदृच्छेनें केव्हांतरी बाहेर पडतात, तशी माझ्या तीर्थरूपांची पुण्यांत झालेली कांहीं प्रवचनें त्यांच्या चहात्यांनीं प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे.

सावित्री-चरित्रानंतर यथाकाल चूडालाख्यान, वेदस्तुति, भागवत दशमस्कंध, गीता पंधरावा अध्याय वगैरे विषयांवरील प्रवचनें बाहेर पडतीलच. ही प्रवचनें वाचतांना, ज्यांनीं ती पूर्वी ऐकली आहेत त्यांच्या डोळ्यापुढें वडिलांची तरतरीत मूर्ति, त्यांचा खणखणीत पण गोड आवाज व त्यांचेच भाषेत सांगायचे म्हणजे एरव्ही कळण्यांस अवघड व ऐकण्यांस कंटाळवाणा वाटणारा वेदांत विषय ते आपल्या मधुरवाणीनें (Sugar coated quinine pills—शर्करावगुंठित कोयनेलची गोळी) अत्यंत सोप्या भाषेत प्रत्यक्ष सांगत आहेत असाच भास निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीं; आणि म्हणूनच लिखाणांत पाल्हाळीक वाटणारा पण प्रवचनांत जरूर असणारा भाग (म्हणजेच शर्करा) जशाचा तसा ठेवला आहे. त्यांची प्रवचनें ऐकतानां एक तास कुठल्या कुठें निघून जाई व जणूं काय १५-२० मिनिटेच आपण प्रवचन ऐकले कीं काय असेच प्रत्येकाला वाटे ही गोष्ट नवीन पिढीला सांगितली तर खरीसुद्धां वाटणार नाहीं.

ही सर्व प्रवचनें लिहून घेण्याचें काम श्री. रामचंद्र कृष्ण बिवलकर, रिटायर्ड डे. पोस्टमास्तर पुणे यांनीं अत्यंत आस्थेवाईकपणानें केल्याबद्दल व ती प्रसिद्ध होण्यास उदार बुद्धिनें सर्वतोपरी सहाय्य करण्याबद्दल रा. ब. डॉ. रा. व्यं. मोने यांचे आभार मानावें तितके थोडेच आहेत.

शेवटी त्यांनी आरंभिलेली ही सेवा जगच्चालक प्रभूनें शेवटास न्यावी अशी त्याचे चरणीं प्रार्थना करून पुरे करतो.

पं. रामचंद्र भाऊशास्त्री वझे

## सावित्री चरित्राचें—शुद्धीपत्र

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५१ | जटातुंट | जटाजूट |
| ५१ | जागर्ति | जागर्तु |
| ५६ | शुश्रृषस्व | शुश्रूषस्व |
| ५६ | कुल | कुरु |
| ५६ | प्रतीव | प्रतीपं |
| ५६ | परं | पदं |
| ८०. | चक्रममाणस्य | चंक्रममाणस्य |

# प्रवचन-स्मृति

प्रवचनकार

## कै. वेदान्तवाचस्पति पं. भाऊशास्त्री वझे

# सावित्री-चरित

## प्रवचन १ लें

मी पुण्यास पुन्हां कसा आलों म्हणाल, तर योगायोग इतकेंच त्याबद्दल सांगतां येईल. येथें आल्यानंतर राहिलेली गीता सांगावी, असें मला सुचविण्यांत आलें आहे, व माझाही मानस तोच आहे. पण नवीन काळाप्रमाणें स्त्री-दाक्षिण्य म्हणून व समयाला अनुसरून प्रथम सावित्री-चरित्र सांगणार आहें. आज एकादशी आहे तेव्हां एकादशीपासून ते प्रतिपदा या पांच दिवसांत सावित्री-चरित सांगणार आहें. नंतर प्रतिपदेपासून गीता सांगणार आहें. नंतर किती दिवस वाढेल तें आज सांगतां येत नाहीं. काल पंढरपुरे-शास्त्र्यांनीं सांगितलें त्याप्रमाणें कदाचित् पंधरा वर्षेंहि लाग-तील. त्यांच्या आशीर्वादानें तसें झालें तरीहि ठीक, माझी ना नाहीं. इतकें सांगून प्रवचनास सुरुवात करतों.

पुन्हां थोडेंसें सांगावेंसें वाटतें. जे प्रेमी होते त्यांनीं घरून निघतांना हात धरला. नागपुरास लोकांनीं पाय धरले तर येथें आल्यावर थंडीनें गळा धरला आहे म्हणून खोकला येतो. खोकलों तर टीका करूं नका.

देवळाचे मालक रा. खरे यांनीं मला पुन्हां जागा देण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें जागा दिली, म्हणून प्रथम त्यांचे आभार मानतों. त्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे पंढरपुरे-शास्त्री यांनीं गादी दिली. आजकालच्या काळांत एक श्रोता दुसऱ्या श्रोत्याला जागा देत नाहीं मग पुराणिक पुराणिकाला कशी देईल ? पण योग असा कीं, पंढरपुरे ती देतात; म्हणून त्यांचे आभार मानले पाहिजेत ते मी मानतों. काल त्यांनीं माझें फार स्तवन केलें, विष्णूची उपमा दिली. लगेच मला वाटलें कीं, मी चतुर्भुज विष्णूच आहे; पण घरीं जाऊन पाहतों तों मला दोनच हात आहेत असें दिसलें. असो. हा सगळा भावनांचा बाजार आहे. अहो असें पहा कीं, कोणी मुरलीधराला देव समजण्याऐवजीं दगड समजला किंवा म्हणाला, तर तो माणूस आपलें स्वतःचें दगडासारखें रूप दाखवितो इतकेंच. त्यांत मुरलीधराला काय कमीपणा आहे ? त्यालाच तुम्ही भक्तवत्सल गोपालकृष्णा, असें म्हणालांत तर तो येऊन लगेच तुमच्या अंगणांत नाचेल असें नाहीं; तर त्या योगानें तुम्ही आपल्या हृदयाची कोमलता प्रकट करतां इत-केंच. असो. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, या भावना आहेत.

सावित्री-चरित्र असें—पुन्हां एक गोष्ट आठवली म्हणून सांगतों. तुम्ही म्हणाल कीं, सावित्री-चरित्र ऐकलें आहे, आतां पुन्हां पुन्हां कशाला ? तर तें जरा नवीन तऱ्हेनें सांगणार आहें इतकेंच. भटजींना विसरूं नका. त्यांना द्यायचें तें द्याच आणि वटसावित्रीची पूजा करावयाची तीहि कराच. असो, मी आतां सांगणार आहें हें चरित्र महाभारतांत वन-पर्वांत आहे. त्याचा संदर्भ असा कीं, पांडव वनवासांत

असतांना त्यांना भेटण्यासाठीं मोठमोठी मंडळी येत असत. उद्देश असा कीं, त्यांच्यापासून कांहींतरी घ्यावें ( शिकावें ). आपल्याला काय घ्यावयाचें तें पाहून आपण कांहीं घेतलें तर बरें, कारण पांडवांना आपल्या दुःखाची विस्मृति व्हावी म्हणून पुष्कळ मोठी मंडळी येत असत. कृष्णहि येत असत. पण त्यांचे म्हणजे पांडवांचे भोग नाहीं कोणी दूर करूं शकले. कारण त्यांचा नियमच असा आहे कीं, भोग हे जन्मांतरींचें कर्माचें फळ असल्यामुळें ते ज्याचे त्यानेंच भोगले पाहिजेत, त्याशिवाय गति नाहीं. अशा वेळीं स्नेही, सोबती, हितचिंतक, ' सिंपथायझर्स, ' यांचा उपयोग इतकाच कीं, ते त्याचे भोग-दुःख सह्य होण्याला मदत करतात. असो, पांडवांकडे आलेल्या मोठ्या माणसांत मार्कंडेयहि आले आहेत. मोठी मंडळी आली आणि त्यांच्यांत निरनिराळी चर्चा होत असली तरी अर्थात् ज्या परिस्थितींत मनुष्य असतो त्या परिस्थितीबद्दल चर्चा होत असते. उदाहरणार्थ, निपुत्रिकाच्या घरीं एखादा साधु गेला तर तो निपुत्रिक प्रथम असें सांगेल कीं, 'महाराज, संतति नाहीं; म्हणून संतति होईल असा उपाय सांगा. ' एकादा दरिद्री असेल तर तो पैसा मागेल. ज्याला प्रश्न विचारावयाचा म्हणजे आलेला पाहुणा जर ज्योतिषी असेल तर अलीकडचीं अगदीं नास्तिक मुलें देखील परीक्षेचा ' रिझल्ट ' विचारतील. तसे मार्कंडेय आले होते. त्यांना धर्मराजानें विचारलें कीं, ' महाराज, मी आपत्तींत आहे, तींतून सुटण्याचा कांहीं मार्ग सांगा. ' कोणत्याहि आपत्तींतून सुटण्यासाठीं मार्ग आहेत, व्रतें आहेत, त्यांना मुदती आहेत. या सगळ्यांचा अर्थ इतकाच कीं, कांहींतरी

दिवस घालवावयाचे आहेत. आपत्तींत असलेला मनुष्य, जो येईल त्याच्याजवळ आपल्या आपत्तीचें रडगाणें गात असतो, त्यांत त्याला समाधान वाटतें. कोणी कांहींतरी उपाय सांगावा असें वाटतें. खरी गोष्ट सांगितली तर पटणार नाहीं असें असतें, म्हणून कांहीं तरी थोडेसें निराळें सांगावें लागतें. एखाद्याला उसण भरली असली तर तीवर मंत्र घालतात. मंत्र घातला कीं वास्तविक संपलें, तर तसें नाहीं. रोगी म्हणतो, " छू नाहीं म्हणालात ? " आणि खरोखर, तसें नाहीं केलें तर त्याचें समाधान होत नाहीं. तो लगेच म्हणतो, 'महाराज " छू नाहीं म्हणालांत ! " आणि खरी गोष्ट अशी असते कीं, मंत्रापेक्षां त्या ' छू 'च्या तंत्रांत समाधान आहे. खेड्यापाड्यांत धंदेवाईक बुवा गेले तर उपदेश करून कान फुंकले पाहिजेत. नुसत्या मंत्रोपदेशांत सौख्य वाटत नाहीं. वास्तविक मंत्रच खरा, पण कान फुंकल्याशिवाय समाधान नाहीं. सारांश, चमत्कारिक अशी कांहीं तरी क्रिया सांगितली पाहिजे. आणि ती सांगितली तरच समाधान होतें. तसें खरें सांगावयाचें तर आपत्तीला उपायच नाहीं. ती भोगलीच पाहिजे. म्हणजे भोगूनच संपविली पाहिजे. हाच मंत्र भगवंतांनीं आपला सखा जो अर्जुन त्याला गीतेंत सांगितला आहे. ' तांस्तितिक्षस्वभारत. ' ' अर्जुना, भोग हे भोगलेच पाहिजेत; सहन केलेच पाहिजेत.' मग ती सहनशक्ति कशानें येते ? तर ते भोग अनित्य म्हणजे न राहणारे आहेत असें कळकळून सांगून तसें पटविणारा भेटला म्हणजे धीर वाटतो. आकाशांत आलेले ढग गेले म्हणजे उजेड येणार आहे हें आपणांस पक्कें माहीत असल्यामुळें त्यासाठीं खोल्या

पाहून आपण कांहीं उजेड करून घेत नाहीं. कारण ढग हे जाणारे आहेत ही आपली समजूत दृढ असते. तसें आपत्ती-साठीं कांहीं न करतां त्या जाणार आहेत हें पक्कें मनांत धरूनच त्या सोसल्या पाहिजेत. आपत्तींत रडणें आणि ओरडणें हा शरीरधर्म आहे. पोटांत मुरडा आल्याबरोबर 'आई' म्हणणें-'देवा' म्हणणें म्हणजे आपत्तींना सौम्य करणारा-सह्य करणारा तो एक शब्द आहे इतकेंच. माणूस आपत्तींत ओरडेल, रडेल यांत नवल नाहीं कारण रडलें-ओरडलें म्हणजे तें दुःख कमी होत असतें. विद्वानालाहि विचारलें तर तो सांगतो कीं, बाबा, आतां एकदां रड; अगदीं मोकळेपणानें रड. आणि तसें रडलें म्हणजे दुःख सह्य होतें. भोग भोगण्यासाठीं म्हणजे भोग भोगण्याचें सामर्थ्य येण्यासाठीं उपाय आहेत. व्रतें, तपें, जप हे मनाला दुसरी-कडे गुंतविण्याचे मार्ग आहेत. त्यापेक्षां जास्त कांहीं नाहीं. याचा अर्थ इतकाच कीं, काढलेलें कर्ज फेडलेंच पाहिजे. जन्मांतरींच्या प्रारब्धकर्मांचे तडाखे सोसलेच पाहिजेत. दुःख हें आत्म्यांत नसून मन आणि आत्मा यांच्या संयोगांत आहे. पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह तारा यांच्या संयोगांत वीज आहे. कोणत्याही एका तारेंत नाहीं. त्याप्रमाणें सुख आणि दुःख या तारा आहेत, त्या एक झाल्या म्हणजे दिसतात; आणि म्हणूनच त्या अन्योन्याश्रयी आहेत. "तं विद्या दुःख-संयोगं वियोगं योगसंज्ञितम्." संयोग हा कायमचा नसून विभक्त होणारा आहे. वियोग कसा होईल हा प्रश्न आहे. भांडणें होतात म्हणून बाजूला राहावें असा विचार केला तर कोठें तरी जावें लागेलच. जंगलांत गेलांत तर जंगली माणसें

आणि पशु यांच्यापासून त्रास होईल. आपण मठांत गेलों तरी तेथेंहि खटले चालूच आहेत. म्हणून आपल्याला वियोग करून राहतां येणार नाहीं. त्याला कांहीं तरी उपायच केला पाहिजे हें खरें. गंगेला पाणी फार आहे. आणि आपल्याला आंघोळ तर करावयाची आहे, तर मग घाट असेल तेथें जावें. यासाठीं घाट बांधण्याचें पुण्य आहे. घाटावर आंघोळ करणाराचें एक-षष्ठांश पुण्य घाट बांधणाराला जात असतें. म्हणून हा अथांग भवसागर तरून जावयाचा असेल तर साधुसंगतीचा घाट बघून तेथें या विषयांच्या समुद्रांत आपल्याला उतरलें पाहिजे, तरच निभाव आहे. त्यांच्या शब्दांत आणि संगतींत जादु आहे. काय जादु आहे सांगूं? लेक कितीही बोलली तरी लागत नाहीं आणि सुनेचा एकच शब्द लागतो. लेकीचा शब्द लागत नाहीं, तसे साधूचे शब्द बोंचत नाहींत. अशा ज्या संवेदनात्मक मनोवृत्ति त्या परमार्थाकडे चिकटविण्याचें जें साधन तें प्रवचन. माझे नव्हे-पण स्वानुभव पहा कीं, एक तासापुरतें तरी कां होईना आपण घर विसरतों, कारण मन त्यांत रमतें. असें आहे. यावरून सुख-दुःख हें मनोनिष्ठ आहे. आत्मनिष्ठ नव्हे हेंच सिद्ध होतें. असो.

सत्संग, निरूपण, प्रवचन हे सर्व दुःखविस्मृतीचे उपाय आहेत, दुःख नाहींसे करण्याचे मार्ग नाहींत. म्हणून विसरतां कसें येईल हें शिकलें पाहिजे. हा विस्मृतीचा अभ्यास आहे. तेव्हां दुःख कमी करण्याचें म्हणजे विस्मरण्याचें म्हणजे विसरावयाला शिकणें आणि तें आचरणें एवढेंच आपल्या हातीं आहे. बाकीच्या गोष्टी आहेत तशा असेनात!

उदाहरणार्थ, फोड आहे आणि तो ठणकतो आहे म्हणून तो नकोसा वाटतो, एरवीं ठणका नसला आणि फोड असला तरी चालेल; पण आपण फोड कां कापतों तर ठणकतो म्हणून. जो आपल्या नित्याच्या व्यवहारांत कांहीं अंतराय करील असा एखादा दोष शरीरांत असला तर असेना! चालेल. पण रूपजीवि माणसाला मात्र तसें करून चालणार नाहीं. दुःखाला विसरणें म्हणजे सुख आहे, दुसरी जडीबुटी कांहीं नाहीं.

दुसरा उपाय असा कीं, आपण ज्या दुःखांत आहोंत तसे अनेक लोक आहेत. त्यांच्याकडे पाहून आपलें दुःख हलकें करणें. सच्छील माणसें कधींही वंचना करणार नाहींत. चांगलीं माणसें दुःखाची विस्मृति करून देऊं शकतात. जगांत किती लोक आपत्तींत आहेत याची कांहीं कल्पना आहे? अनंत आहेत. किंबहुना ' जगीं सर्व सूखी असा कोण आहे। विचारी मना तूंचि शोधूनि पाहे-, हेंच खरें.

एक दुसऱ्याकडे गेला आणि म्हणाला, मी दुःखी आहें. दरिद्री आहें. कां रे बाबा? तर सांगतो कीं, मेलों तरी हरकत नाहीं, पण बायकोच्या हातांत गोठ करून घातलेच पाहिजेत. अरे! यांत दुःख काय आहे? आणि, ठीक, मग तूं मेल्यावर त्या गोठांची काय किंमत आहे? काय शोभा आहे? बायकोच्या अंगावर दागिने नाहींत, मणी नाहीं आणि कंकणही नाहीं हें पाहून दुःख होत आहे. तर दुसरा म्हणतो, अरे, माझ्या घरांत धान्याचा कणहि नाहीं, मग मणि आणि कंकण कुठलें? असो, दिवस फार वाईट आले आहेत. कट्ट्यावर ठेवलेला गोग्रास-माणसें उचलून खाऊं लागलीं

आहेत. ही सत्य गोष्ट सांगतों आहे. अशी परिस्थिति आहे. त्यांत फेरफार करण्याचें सामर्थ्य सरकारमध्यें नाहीं. सायकल-वर बसलांत, आतां फेरा फिरल्याशिवाय गति नाहीं. मग ? मग काय ? फिरा आतां खालीं आणि वर–

माणूस दुःखें कशीं उत्पन्न करून घेतो पहा–मुलगा विचारल्याशिवाय सिनेमाला गेला तर हा छटपटतो ! मिशीचा कटच जरा वांकडा गेला ! इस्त्रीच वाकडी झाली ! काय दुःख आहे ! स्वतःला वाटतें, आपलें दुःख मोठें आहे. पण आपण लोकांचीं मोठीं दुःखें पाहूं लागलों म्हणजे असें वाटूं लागतें कीं, आपलें दुःख ठेंगणें आहे. एकदां फ्रान्समध्यें ठेंगण्या पात्राचा पार्ट उंच माणूस करणार, असें प्रसिद्ध झालें. हें कसें शक्य होणार ? यावर तर्कवितर्क सुरु झाले. झालें, जाहिराती फडकल्या; तिकिटें संपलीं. नाटकवाल्यानें काय युक्ति केली ? तर त्या उंच माणसापेक्षांहि एक उंच माणूस आणला, त्याबरोबर पहिला उंच माणूस ठेंगणा झाला. जसा पार्ट तसा नट असला म्हणजे झालें. सुदाम्या-चा पार्ट हडकुळाच पाहिजे, लठ्ठ नाहीं चालणार, तर शोभ-सान्च पाहिजे. एकदां पार्वतीनें शंकरांना विचारलें कीं, महा-राज, विद्वान् कोण व मूर्ख कोण ? तेव्हां शंकर म्हणाले कीं, या गोष्टी सापेक्ष आहेत. आत्मा मात्र निरपेक्ष आहे. महा-देव पुढें म्हणाले–पार्वती, जगांत मूर्खहि कोणी नाहीं आणि शहाणाहि कोणी नाहीं, तर माझा राम ज्याला ज्यावेळीं जसा बनवील तें खरें. त्याच्या मनांत आलें तर मूर्खाला शहाणा आणि शहाण्याला मूर्ख बनवितो. असो, आपला विषय असा कीं, आपलें दुःख विसरणें हाच दुःखनिवृत्तीचा मार्ग आहे.

ज्याप्रमाणें तरंगाशिवाय पाणी नाहीं त्याप्रमाणें दुःखाशिवाय माणूस नाहीं—यासाठीं जगांत राहणारानें कठोरच व्हाव-याला पाहिजे! आणि एक उदाहरण देऊन तोच विषय मार्कंडेयांनीं धर्मराजाला सांगितला. आपल्या देहावर आपत्ति आली म्हणजे आपली काळजी, दुसऱ्याच्या देहावर आली म्हणजे दुसऱ्याची काळजी; म्हणतो, टॉमीचा पाय दुखावला आहे; निदान म्हणतो, शेजारचा माणूस भजन करतो त्याचा त्रास आहे; वास्तविक यांत काय त्रास आहे? म्हणून आपल्याला काय करावयास पाहिजे? तर थोडें कठोर बनावयास पाहिजे इतकेंच.

मार्कंडेय युधिष्ठिराला म्हणतात, 'तुला दुःख करायला काय रे झालें? अरे, एकदां रामचंद्राकडे बघ तर खरें! राम चौदा वर्षें वनवासांत होते, तर तुला बाराच वर्षें वनवास! मग तुला दुःख कसलें? रामाजवळून सगळेंच हिरावून घेतलें होतें. दंडकारण्यांत म्हणजे त्या वेळच्या अंदमानांतच त्याला पाठविलें होतें. तेथें सगळे जंगली लोक, बरोबर एकटी स्त्री-तिलाही पळविली. पण स्वतः शूर होता. लढला. अनेक संकटें भोगलीं. पण कधींहि दुसऱ्याला हार गेला नाहीं.' मार्कंडेय म्हणतात, 'धर्मा, रामाबरोबर एकच भाऊ होता. तुझें कसें आहे, तर शूर, वीर असे चार भाऊ आहेत तुझ्याबरोबर—रामाची बायको सीता रावणानें पळवून नेल्यामुळें त्याचेवर एकट्यानें वनवास कंठण्याचा प्रसंग! तर तुमची बायको तुमच्याबरोबर. शिवाय पर्णकुटी म्हणजे नांवाचीच—राज-वाडाच आहे तो. रामाला कंदमुळेंहि मिळण्याची कोण पंचाईत! तर दहावीस ब्राह्मण रोज तुमच्या पंक्तीला—तेव्हां

तुम्हांला काय दुःख आहे ?' हें सांगून त्याचें समाधान केलें. तेव्हां धर्मराज म्हणाले, ' महाराज, मला माझ्या स्वतःबद्दल विशेष दुःख नाहीं वाटत.' व्याही म्हणतो मला नको कांहीं. पण तिच्या मुलाचें कार्य आहे म्हणून तिला म्हणजे सासूला मात्र बनारसी शालू पाहिजे!—तसे धर्मराज मार्कंडेयाला सांगतात—' महाराज, मला माझ्याबद्दल दुःख नाहीं वाटत. भाऊ आहेत, तालीमबाज आहेत, पराक्रमी आहेत. त्यांच्या-बद्दलही दुःख नाहीं. राज्य गेलें त्याबद्दलहि नाहीं वाईट वाटत. पण हिला पाहिलें म्हणजे दुःख होतें.' धर्मराज आणि बायको-साठीं रडतो! असें चालेल का हो! अरे, आपण दुःख सोसतों तसें तिलाहि सोसूं दे. स्वतः मुलासाठीं हाल सोसले, त्याचीं बिलें भरलीं, कर्ज फेडलें तरी त्याला म्हणतो; ' तूं नको हें करूं. ' कां तर म्हणे त्याला कष्ट होतात. मग! होऊं देत कष्ट. तुम्हीं नाहीं का त्याच्यासाठीं कष्ट सोसले ? मग त्यानें थोडेसे सोसले तर बिघडलें कोठें ? पण नाहीं. तसे धर्मराज म्हणतात, 'महाराज, हिला पाहिलें कीं कष्ट होतात. द्यूतांत हरलों, तिनें सोडविलें. जयद्रथानें छळ केलान्, तिनेंच अब्रूचें रक्षण केलेंन्. तिची योग्यता नाहीं कोणाला याव-याची! आणि कळावयाचीहि नाहीं. आपली बायको आणि गुरु यांचेसारखा कोणी नाहीं असें प्रत्येकाला वाटत असतें.' मार्कंडेय म्हणाले—' राजा, काय सांगतोस असल्या गोष्टी!' तेव्हां धर्मराज म्हणाले, ' महाराज, आपण कधीं आणि कुठें अशी स्त्री पाहिली आहे काय ?' मार्कंडेय म्हणाले, 'अरे, किती तरी आहेत. सांगूं का ? ऐकावयास तयार हो.' तें आतां उद्यां सांगेन.

२८-१.
आ. क्र. ५१५.४
६४०
२।१।५६

# प्रवचन २ रें

सावित्री-चरिताचा आरंभ आहे. कोणत्या प्रसंगानें सावित्री-चरित्र सांगावें लागलें तें पाहूं. त्याची थोडीशी रूपरेषा काल सांगितली. एखादा प्रसंगच मनुष्याला परमार्थाला लावतो. शुकदेवासारखे असे दोन चारच प्राणी आहेत कीं जे विषय जिंकून जन्मास आले आणि अगदीं जन्मापासून परमार्थाला लागले. पण सर्वसामान्य प्राणी प्रसंगानेंच परमार्थाला लागत असतो. भविष्यकाळांतील आयुष्य उज्ज्वल करण्याकरितां इतिहासाची उजळणी केली पाहिजे. प्रसंगाशिवाय गोष्ट आठवत नाहीं व जात्यावर बसल्याशिवाय ओवी सुचत नाहीं व येत नाहीं हें अगदीं खरें आहे. मला पुष्कळ श्लोक येत असले तरी प्रसंगाशिवाय आठवत नाहींत; त्याप्रमाणें सावित्रीचरित्र सांगण्याचा प्रसंग असा आला. याला शास्त्रांत प्रसंगसंगति असें म्हणतात. शास्त्र उगीच नाहीं. मार्कंडेयांनीं हें जें चरित्र धर्मराजाला सांगितलें तें घरून ठरवून आले नव्हते कीं, राजाला आज हें सावित्री-चरित्र सांगावयाचें ! तर तो प्रसंगच तसा जमून आला होता. वैद्याच्या दवाखान्यांत औषधांच्या बाटल्यांचीं कपाटेंच्या कपाटें भरलेलीं असतात, पण रोगनिदान करून तो नेमकी बाटली काढतो. तसें भवरोगाची चिकित्सा करणारे संत साधकाला तो कोणत्या दुःखानें दुःखी आहे हें पाहून निदान करून उपाय सांगत असतात. तसें सावित्रीचरित्र सांगण्याचा प्रसंग असा कीं, मी द्रौपदीला सुख देऊं शकलों नाहीं, उलट तिनें माझ्यासाठीं फार कष्ट सोसले; अशी धर्मराजाला सारखी रुखरुख लागून राहिली होती. आणि

तिच्यासारखी अशी एकादी बायको तुम्ही पाहिली आहे काय? असें धर्मराज मार्कंडेयांना विचारीत होते. दुःख कसें येतें हें सांगतां येत नाहीं. दुःखें तेव्हांच उद्भवतात कीं, जेव्हां एखाद्याच्या स्थायीभावाला धक्का लागतो. दुःखाची दुसरी सोपी अशी व्याख्या सांगतां येणार नाहीं. फाटका सदरा असला तर एखादा वीर मनुष्य म्हणेल असूं दे. त्यांत काय आहे? पण एखादा रुपजीवि चैनी मनुष्य असेल तर तो त्या फाटक्या सदऱ्यासाठीं सारखा कुरकुर करीत राहील. एकुलता एक मुलगा जोडा घालून देवघरांत आला तर जुन्या वळणाच्या माणसाला वाईट वाटेल; कारण त्यांत अधर्म होतो आहे असें त्याला वाटतें. कारण तसें त्याचें मत बनून गेलेलें असतें. मत न बदलणें म्हणजे स्थायीभाव आणि मत बदलणें म्हणजे व्यभिचारीभाव. स्थायीभाव हा मानबिंदु असतो, 'पॉइंट ऑफ ऑनर' असतो. त्यालाच स्थायीभाव असें म्हणतात. काळिजाला धक्का लागला कीं, दुःख आहे. धर्मराजाचा स्थायीभाव शांति आहे. नवरसांत नववा रस शांतरस आहे. धर्मराजाचा स्थायीभाव शांतरस आहे. दुःखनिवृत्ति म्हणजे स्थायी भावाला धक्का न लागूं देणें. भीमाचा स्थायीभाव वीररस आहे. धर्मराजाच्या स्थायीभावाला द्रौपदीच्या दुःखानें धक्का लागला. तो म्हणाला, 'मला माझ्या स्वतःबद्दल वाईट नाहीं वाटत, भावांबद्दलहि वाईट नाहीं वाटत, राज्य गेलें तर त्या राज्याबद्दलहि वाईट नाहीं वाटत; पण हे महामुने, तिला पाहिलें कीं, पोटांत दुखतें.' 'अरे, जे कष्ट तुम्ही भोगत आहांत तेच ती भोगते आहे, त्यांत जास्त काय आहे?' पण धर्मराज म्हणतात—' आम्हांला तारलें असेल तर

द्रौपदीनें. द्यूतांत सर्वस्व गेलें, देह गेले, राज्य गेलें अशा वेळीं द्रौपदीचा छळ झाला! तिचीं वस्त्रें फेडलीं गेलीं! धृतराष्ट्र तिच्या शांतीनें प्रसन्न झाला व म्हणाला, 'वर माग.' तिनें पहिला वर मागितलान् कीं, माझ्या पतींना दास्यांतून मोकळे करा.' धृतराष्ट्र म्हणाले, 'तथास्तु' आणि म्हणाले, 'द्रौपदी, दुसरा वर माग.' ती म्हणाली-'राजा, दास्य म्हणजे परवशता आहे. त्यांतून माझ्या पतींची तूं सुटका केलीस, आतां त्यांचीं शस्त्रास्त्रें परत द्या.' म्हणजे-'आर्म्स ॲक्ट' काढून घ्या! कारण शस्त्रांच्या पोटांत 'स्वराज्य' आहे, 'सुखसंपत्ति' आहे. दास्यांत धार्मिक सभेलाहि अगोदर परवानगी पाहिजे. पण शस्त्र हातांत आल्याबरोबर मग काय कमी आहे! धृतराष्ट्र म्हणाले, 'तिसरा वर माग.' तेव्हां ती म्हणाली, 'महाराज, क्षत्रिय स्त्रीला तिसरा वर मागण्याचा अधिकार नाहीं.' दोन वरांतच सगळें मागितलें. पण शास्त्रांचा आधार घेऊन तिनें राजावर मात केली. ती म्हणाली, 'महाराज, आम्ही दास्यमुक्त झालों आणि आमचीं शस्त्रें हातांत आलीं, मला बस्स आहे.' धर्मराज मार्कंडेयांना सांगतात कीं 'महाराज, आम्ही शूर असून आमचें आम्ही संरक्षण करूं शकलों नाहीं. वस्तु अव्यक्त शब्द सांगत असते. तसें आम्ही स्वतंत्र कसे आहोंत तर स्त्रीमुळें! आणि महाराज, मला याचें दुःख आहे.' भीमाच्या मनांत त्याचा अंशहि नाहीं. ती जशी धर्मराजाजवळ कुरकुर करी तशी भीमाला पाहून लांब जात असे.

पुरुषहि निरनिराळ्या प्रकारचे असतात. उदाहरणार्थ, धीरोदात्त रामचंद्र एकवचनी, एकपत्नी, एकबाणी. तसेच छत्रपति शिवाजीमहाराज. कल्याणच्या सुभेदाराची सुंदर

सून पुढें आली तरी धीरोदात्त. धीरललित नेपोलियन. कृष्ण शूर पण शृंगारिक. धीरोदात्त बाजीराव. भीम म्हणजे पराक्रमी पण उद्धट. अशा भीमाजवळ एकदां कुरकुर करण्याची द्रौपदीला पाळी आली. कीचकानें ज्या वेळीं अत्यंत छळ केला त्यावेळीं ती धर्मराजाजवळ गेली. तो म्हणाला शांत रहा. तो छळतो छळूं दे. आपण कोर्टांत (विराट राजाकडे) जाऊन निकाल लावून घेऊं!' काय उपयोग? द्रौपदी म्हणाली, 'अहो, तूर्त मी जळतें आहे त्याला उपाय सांगा.' कीचकाच्या छळानें ती गांजली होती. तिला कांहीं सुचत नव्हतें. भीमाला बघण्यासाठीं स्वयंपाकगृहांत गेली. पहाते तों कढई डोक्याखालीं घेऊन तो घोरत पडला होता. त्याला मोठ्यानें ओरडून जागा केला असता तर आरडाओरडा झाला असता, म्हणून हलवून जागा केलान्. तो म्हणाला, 'कोण? द्रौपदी? इकडे कोणीकडे?' तिनें एक अध्यायभर रडकथा गायली! तिनें वर्णन चालविलें. तो म्हणाला, 'ही रडकथा पुरे! काय करूं तें सांग. द्रौपदीनें आपल्या हालांचें वर्णन केलें. तेव्हां तो म्हणाला, 'द्रौपदी, शूरांच्या बायकांना नेहमीं कष्टच असतात. समुद्रांतून मोतीं काढणाऱ्या कोळ्यांच्या बायकांच्या एका हातांतच बांगडी असते आणि दुसऱ्या हातांतली समुद्राला वाहिलेली असते. तसें लढाईवर गेलेल्या शूर वीरांच्या बायकांना नेहमींच कष्ट असतात. कारण केव्हां काय होईल कोणास ठाऊक?' भिळभिळीत माणसांच्या बायकांना कसले कष्ट आहेत! नवरे बाहेर गेले कीं त्या बसतात पेटी वाजवीत. पण वीरांच्या बायकांचें सौभाग्य नेहमीं संदेहांत असतें. नाटकास गेलेल्या नवऱ्याच्या बायकोचें सौभाग्य

असतें! भीम म्हणाला, 'द्रौपदी, काय कष्ट आहेत? कीचकालाच मारायचें ना? उद्यां मारतों.' मारला आणि तिच्यापुढें आणून ठेवला आणि म्हणाला, 'आणखी काय! जाऊं आतां स्वयंपाकाला?' धर्मराजाचा स्वाथीभाव शांत-रस असल्यामुळें ते मार्कंडेयांना सांगतात, 'महाराज, हिनें आम्हांला आपत्तींतून बाहेर काढलें. अशी सीमंतिनी तुम्ही कोठें पाहिली आहे काय? आपण चिरंजीव आहांत. पुष्कळ ठिकाणीं आपला वास हात असतो, तेव्हां पुढें मागें कोठें तरी आपण माझ्या स्त्रीसारखी स्त्री पाहिली आहे काय?' मार्कंडेय मनांत म्हणाले, 'बावळट आहे बेटा!' मग म्हणाले, 'राजा, ती पतिव्रता आहे; तिनें तुमच्यासाठीं कष्ट सोसले आहेत. तिनें तुम्हांला दास्यांतून मुक्त केलें आहे हें सगळें खरें आहे. पण यांत विशेष काय आहे? यांत विशेष काय झालें? चंद्रहि उजेड देतो, सूर्यहि उजेड देतो, पण एक परप्रकाश्य आहे तर दुसरा स्वयंप्रकाश्य आहे. तसें राजा, तुझी द्रौपदी परप्रकाश्य आहे. श्रीकृष्णाच्या कृपेचा प्रकाश पडला, चमकली. पण मी आतां तुला ज्या पतिव्रता स्त्रीचें चरित्र सांगणार आहें ती सावित्री स्वयंप्रकाश्य आहे. 'अहिल्या, द्रौपदी, 'सीता, 'तारा, 'मंदोदरी, तथा! पंचकं ना स्मरेन्नित्यं-'पंचकन्या'-नव्हे! तर जो जो नर या पंचकाचें प्रातःकाळीं स्मरण करील किंवा करतो तो पापमुक्त होतो. अरे, पण या सगळ्या पर-प्रकाश्य आहेत. आतां एकेकीचें वर्णन सांगतों. जी पाषाण झाली तिला राघवें मुक्त केलें. मग ती स्वाभाविकपणें मुक्त झाली. म्हणून पहिला नंबर दिला तिला. मग द्रौपदी-दुःशासनानें वस्त्रहरण केलें, कृष्णानें वस्त्रें पुरविलीं,

वहीण मानली, दुसरा नंबर दिला. तसेंच सीता रावणाचे घरीं वर्षभर राहिली. पण लोकापवाद टाळण्यासाठीं रामानें तिला दूर करून ती निष्कलंक आहे असें जगाला दाखविलें. स्वतःची पत्नी होती तरी आणिक एक खालचा म्हणजे तिसरा नंबर दिला. चौथी तारा—वालीची स्त्री. तिनें सुग्रीवाशीं पाट लावला. पण रामाच्या आश्रयाला आली म्हणून कोणी बोलूं शकला नाहीं. चौथा नंबर. आणि शेवटची मंदोदरी. रामाच्या आश्रयानें राज्य केलें म्हणून शेवटचा पांचवा नंबर—यांचें फार महत्त्व नाहीं. कारण पतिव्रता असतील पण त्या पर-प्रकाश्य आहेत.

अनसूया, सावित्री या स्वयंप्रकाश्य पतिव्रता आहेत. दोन तऱ्हा. भिळभिळीत पतिव्रता आणि झणझणीत पतिव्रता. उदाहरणार्थ, नवऱ्यानें सांगितलें दारू आण. काय करते ? नाकाला पदर लावते, आणते. म्हणते काय करूं ? पतीची आज्ञा ! ही भिळभिळीत पतिव्रता. झणझणीत पतिव्रता जी असते ती आपल्या पतीच्या अशा वेड्यावाकड्या इच्छा पुऱ्या करणार नाहीं. उद्धट नाहीं वागणार ! पण नवऱ्याला दारू नाहीं पिऊं देणार ! त्यांत चारित्र्याचा, शीलाचा प्रभाव पडतो. म्हणतो, पार्टीचा खर्च मी देईन पण पार्टी तुमच्या घरीं होऊं दे; कारण घरीं झणझणीत (पतिव्रता) काम आहे. स्वभावधर्म असा—तिच्यादेखत दुष्कर्म करण्याची छाती नाहीं. कांहीं पतिव्रता पतिनिधनानंतर जाळून घेतात, पण अलीकडील लोक त्यांना रानटी म्हणतात. पण त्यांत रानटीपणा काय आहे ? त्यांना रानटी म्हणण्यांत काय अर्थ आहे ? एकदां मुसलमानही हिंदु पतिव्रतेचे पक्षपाती झाले. त्यांच्यांत

स्त्रियांबद्दल कांहीं वादविवाद चालला होता; तेव्हां एक म्हणाला कीं, हिंदु स्त्री कशी आहे? तर स्वार्थत्यागी आहे. पतंगासारखी आहे. तेजस्वी दिव्यावर झडप घालून मरून जाते. तेव्हां दुसरा म्हणाला कीं अरे, हिंदु स्त्रींची योग्यता तूं समजतोस त्याहून फार मोठी आहे. कारण तो म्हणतो, झग-झगीत प्रकाशावर उडी घालून मरण्यांत नवल कसलें? पण हिंदु स्त्री मालवलेल्या दिव्यावर झडप घालून मरते. पहिली झगझगाटांत उडी घालते तर दुसरी शुकशुकाटांत उडी टाकते. पतंगापेक्षां पतिव्रता श्रेष्ठ आहे. म्हणजेच पहिली-पेक्षां दुसरी श्रेष्ठ आहे. आपली चरित-नायिका सावित्री तिचा नंबर याहिपेक्षां जास्त वरचा आहे. पतीला खूष करण्यासाठीं वेड्यावांकड्या वेषभूषा करण्यापेक्षां आपल्या साधेपणानेंच पतीचें मन आकर्षून घेणें हें जास्त श्रेष्ठ होय. हृदयांतील खरा भाव प्रसंगानें व्यक्त झाल्याशिवाय राहत नाहीं. केतकरांनीं अमेरिकन बाईला हिंदु करून घेतली. पण शेवटीं ती वळणावर गेलीच. तिनें पतीचा देह शेवटीं ख्रिश्चन धर्माप्रमाणें पुरला, पण हिंदु धर्माप्रमाणें जाळला नाहीं! माणूस पन्नास वर्षें कसाहि राहिला तरी शेवटपर्यंत उत्तम राहिला तरच त्यानें अखेर चांगली साधली असें होईल. पति गेला तिकडे जाणारी स्त्री चांगली असली तरी आपल्या स्वतःच्या पराक्रमानें आणि चातुर्यानें अगदीं यमाच्या हातून पतीला सोडवून आणणारी आपली चरित्रनायिका सावित्री जास्त श्रेष्ठ होय. मार्कंडेय धर्मराजाला विचारतात कीं, "राजा, तुला साऱ्या दास्यत्वांतून सोडविणारी तुझी

स्त्री श्रेष्ठ कां आपल्या नवऱ्याला स्वतःच्या पराक्रमानें यमाच्या दाढेंतून सोडविणारी स्त्री जास्त श्रेष्ठ?" तीच आपली चरित्रनायिका सावित्री.

### सावित्रीचें पूर्वचारित्र

मद्रदेश म्हणजे काबूल. अशा त्या देशाचा राजा अश्वपति. सर्वगोष्टी अनुकूल पण अनपत्य होता. संतति नाहीं याबद्दल जुन्या लोकांना दुःख होत होतें. ते 'बर्थ कंट्रोलच्या फॉर' नव्हते; कारण 'लुप्त पिंडोदक क्रियः' असें होईल, याबद्दल त्यांना वाईट वाटे. तसेच अश्वपतीला वाटत होतें, दुःख होत होतें; म्हणून त्याला कोणी एक व्रत सांगितलें. व्रत, जप, तप हे माणूस करतो याचा अर्थ असा कीं, माणूस प्रयत्न करतो म्हणजे प्रारब्धाची परीक्षा पाहतो. प्रारब्धांत असेल तरच मिळेल. म्हणे–'इट् इज् वेस्ट ऑफ टाइम अँड एनर्जी.' अरे मग अगदीं साध्या दुखण्यासाठीं किती तरी डॉक्टरांकडून परीक्षा करून घेतां. ते अगोदर दहा दहा रुपये फी घेतात. आणि मग ते सांगतात कीं, कांहीं नाहीं. तें पटतें. व्रतांत 'टाइम आणि मनी वेस्ट' होतो मग यांत होत नाहीं काय! हें काय आहे–तर प्रयत्न करणें आपल्या हातांत आहे. प्रयत्न साध्य झाला नाहीं तर प्रारब्धांत नाहीं असें म्हणा. त्याप्रमाणें राजा अश्वपतीनें प्रयत्न करावयास सुरुवात केली. परिमित आहार, मंत्र, तंत्र, शास्त्र यथाविधि केले. अठरा वर्षें असें व्रत केलें त्या वेळीं त्या व्रताची देवता

" सावित्री देवी " त्याच्यावर प्रसन्न झाली आणि तिनें राजाला दर्शन दिलें. आणि म्हणाली, 'राजा, अग्निकुंडांतून उत्पन्न झालेली मी सावित्री तुला प्रसन्न आहे. तुझी शांत-वृत्ति, चिकाटी आणि धर्मावरची अढळ श्रद्धा पाहून मी प्रसन्न झालें आहे. काय वाटेल तो वर माग. मी देण्यास सिद्ध आहें.' राजा म्हणाला, 'देवी, वर मागूं ?' 'माग,' म्हणाली. राजा म्हणाला,-'मागतों पण उद्यां मागेन. कारण आज ती जवळ नाहीं. तिचा विचार घेतला पाहिजे ना ?'

## प्रवचन ३ रें

कसोटी ही श्रीमंतांच्या आणि गरीबांच्या सोन्याला कोणीहि सोनेंच म्हणणार तसें सरस्वती देवी म्हणाली, राजा, मी कशानें प्रसन्न झालें तर अगोदर अठरा वर्षं तपश्चर्येच्या कसोटीवर तुला घांसून घेतला आहे. वर माग म्हटल्याबरोबर कांहीं तरी वर मागशील म्हणून एकच सूचना द्यावीशी वाटते कीं, राजा, जो वर मागायचा तो अधार्मिक असूं नये. जपून वर माग. वर मागतांना नेहमीं देणाराच्या इच्छेप्रमाणें व आपल्या परिस्थितीकडे लक्ष ठेवून आपल्या शक्तीपेक्षां जास्त असा वर मागूं नये. उत्तम बायको दे असा वर आपण मागतों पण आपल्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे; तो असा कीं, तिला नीट संभाळण्याची ऐपत आपल्यांत आहे अगर नाहीं. म्हणून राजा, अधार्मिक वर मागूं नको !" राजा म्हणाला, 'आई, मी ही तपश्चर्या संततीसाठीं केली आहे. हें आपणास माहीत असतांना हें आपण असें कसें सांगतां ? परिस्थितीप्रमाणें वर मागण्यांत फरक होतो. एकदां एक भटजी कांहीं मदत मागण्यासाठीं एका श्रीमंताचे घरीं गेला व त्यानें दोनशे रुपये मागितले. श्रीमंतानें दोनशेंच पुरेत का असें विचारल्याबरोबर भटजीला वाटलें, जास्त मागितले असते तर अधिक बरें झालें असतें. तर असें असूं नये. एकदां एक स्वार व ब्राह्मण रस्त्यानें जात होते. ब्राह्मण अनवाणी चालतो आहे, असें पाहून स्वारानें आपला जोडा ब्राह्मणास दिला. ब्राह्मणाला वाटलें न मागतां हा जोडा देतो, तर मागितलें तर सहज घोडाहि देईल. जरा पुढें गेल्यावर ब्राह्मणानें घोडा मागितला. तेव्हां स्वार

म्हणाला, ‘ भटजी महाराज, न मागतां जोडा दिला. आतां घोडा मागतां; तर मागणें देखील नीट विचार करून मागावें चाबूक हवा असेल तर मिळेल!’ सच्छील माणसें जेवढी जरूर असेल तेवढेंच मागतात. जास्त मागणें हें चूक आहे. राजा म्हणाला, ‘आई, मला संतति पाहिजे. संततिपैकीं काय तर मुलगा पाहिजे, मुलगी नको. मला पुष्कळ मुलें पाहिजेत. मुलें धर्मासाठीं मागतों आहे, अधर्मासाठीं नव्हे. कुलधर्म चालविण्यासाठीं मुलें मागतों आहे!’ अर्थात् ती अधार्मिक असूं नयेत. नाहीं तर हे समोरून येणारे, ‘ फ्रेंचकट फॅशनेबल’ गृहस्थ कोण म्हणाल तर म्हणे भाऊशास्त्र्यांचें चिरंजीव–, तर असें असूं नये. असें असणें ही कुलशोभा नसून कुलकलंक आहे. दिलीपाला रघू झाला त्याच कुलांत राम झाले तें ‘ रघुकुल,’ आणि त्याचा लौकिक कैक पिढ्या चालला. याचें नांव कूलभूषण आणि कुलधर्म. राजा म्हणाला, ‘ आई, म्हणून मला चांगलीं मुलें पाहिजेत.’ यावर सावित्रीदेवी म्हणाली, ‘राजा, तूं तपश्चर्येला बसल्यापासून आमची चर्चा चालली आहे.’ राजा म्हणाला, ‘आई, मग उशीर कां? आई, सांगा ना! आपण सर्वज्ञ आहां, मग असा उशीर कां? सावित्रीदेवी म्हणाली, ‘ सर्वज्ञ आहे असें म्हणतोस आणि मग असा अधीर कां? असो. राजा, मी ब्रह्मदेवाला सांगितलं आहे कीं, राजा अपत्य मागतो! तेव्हां तुला काय द्यावयाचें तें आमचें ठरलें आहे. कसें द्यावयाचें याचाच फक्त विचार आहे. त्यांचें आमचें काय ठरलें तें (यथासांग) सांगत नाहीं, पण एवढेंच सांगतें कीं, तुला एक तेजस्विनी कन्या होणार. पण लक्षांत ठेव, यापेक्षां जास्त बोलूं नकोस.

नाहीं तर म्हणशील कीं, मुलगा मागितला. आणि मुलगी दिली. म्हणून सांगतें कीं अगदीं गप्प बैस—प्रतिज्ञेत मोठ्यांना अडकवूं नये. ते शीलांकित आहेत. म्हणून पूर्वापार विरोध न दाखवितां गप्प बैस!' एकदां दुर्योधनाला भीष्मांनीं सांगितलें कीं मी पांडवांना मारीन. निःपांडवी पृथ्वी करीन तरच नांवाचा भीष्म-' दुर्योधनानें त्याच वेळीं गप्प बसावयास पाहिजे होते. त्याला वाटलें ही प्रतिज्ञा आपण पक्की करून घेऊं. म्हणून त्या उद्देशानें तो म्हणाला "पण आजोबा, समजा, तुम्हांला तसें नाहीं करतां आलें तर?" यावर ते म्हणाले– "नाहीं तर मी मरून जाईन!" तसेंच झालें आणि दुर्योधन आपल्या एका चांगल्या सेनापतीला गमावून बसला. एकदां एक गृहस्थ मला म्हणाले कीं, 'माझ्या मंदिरांत येऊन एकादें प्रवचन सांगाल कां?' मी म्हणालों सांगेन. पण पुष्कळ दिवस तसें घडलें नाहीं. पुढें दोन तीन वेळां गांठी पडल्या. त्यावेळींहि त्यानें विचारलें आणि मीहि सांगेन म्हणालों. मग एक दिवस तो जरा चिडून बोलला, 'अहो, शास्त्री असून खोटें बोलतां? एक सांगा केव्हां सांगणार तें? मलाहि राग आला. मी उत्तर दिलें, "ऐक सांगतों, या शरिरांत जीव असेपर्यंत केव्हांहि तुझ्या घरीं प्रवचन सांगणार नाहीं., असो. सावित्रीदेवीची राजावर कृपाच म्हणून ती म्हणाली, 'यावेळीं जास्त बोलूं नकोस. जें दिलें आहे तें घे आणि गप्प बैस.' असें सांगून देवी अदृश्य झाली. पुढें राजाला मुलगी झाली. ती सावित्रीदेवीच्या कृपेनें झाली म्हणून तिचें नांव सावित्री असें ठेवलें. ईश्वरी कृपाप्रसादानेंच झालेली ती मुलगी शुक्ल पक्षांतील

चंद्रकलेप्रमाणें वाढूं लागली. मोठी झाली. सुंदर दिसूं लागली. ही देवकन्या असावी, असें लोकांना वाटूं लागलें. ती अत्यंत सुंदर आणि तेजस्विनी दिसे. तें तिचें दिव्य तेज पाहून कोणी तिला मागणी घालीना.

पूर्वी नवऱ्याकडच्या माणसांनीं मुलीकडे जाऊन मुलीला मागणी घालण्याची चाल असे. याचें कारण वरपक्ष याचक आहे आणि कन्या देणारा दान करणारा आहे, म्हणून श्रेष्ठ आहे. नेहमीं दाता हा श्रेष्ठ असल्याकारणानें याचकानें त्याच्या घरीं जावयाचें. अशा तऱ्हेनें मुलाचे बाप देशोदेशीं जात असत. आतां त्याची प्रतिक्रिया झाली आहे कीं, मुलगी घेऊन बाप दारोदार जात असतात. खरी गोष्ट अशी कीं, मुलीच्या घरीं मुलाच्या बापानें जावयाचें, पण तसें सावित्रीला कोणी मागणी घालीनात. कां तर फार सुंदर आहे, तेजस्विनी आहे प्रत्येकाला वाटे नाकापेक्षां मोतीं जड आहे. मुलीचें दुःख असें कीं, परक्या घरीं जाणार आहे; आणि ज्याला द्यावयाची तो त्या मुलीला कसें वागवील कोणास ठाऊक ? घरीं बरोबरीच्या नात्यानें वागणारी मुलगी म्हणजे आपल्या भावाच्या हातांतून आंबा हिसकून घेऊन खाणारी मुलगी दुसऱ्याचे घरीं त्रयस्थ आणि परावलंबी बनते. सासू देईल त्याच आणि तेवढ्याच साली–कोया चोखत बसते. आतां दिवस बदलले आहेत. आतां सून अगोदर खाईल आणि सासूला काय देईल. माझी मुलगी करतां कां ? असें विचारलें तर त्यांत कांहींतरी दोष असण्याचा संभव आहे म्हणून मुलाच्या मंडळींनीं मागणी घालावयाची असा प्रघात असे. असो. सावित्री मोठी होऊं लागली तशी राजाला

काळजी वाटूं लागली. बापाच्या हृदयाला विदारण करते म्हणून मुलीला दारिका असें म्हणतात. 'दारिका हृदयदारिका पितुः'। वेदांत कन्या शब्दाचा अर्थ कमनीया म्हणजे सुंदर अथवा कनेया म्हणजे हिला कोणीकडे न्यावी अथवा हिला कोणाला द्यावी असाच केलेला आहे. म्हणून कन्या. राजाला जास्त काळजी वाटूं लागली. ज्याप्रमाणें मेघ आकाशांत लोंबकळले म्हणजे नदी वाढते, त्यांत भोंवरे पडतात आणि तट त्यांत ढासळतात, तसेंच मुलीचें आहे. ती जसजशी वाढत जाते तसतसे बापाच्या पोटांत गोळे (भोंवरे) पडतात आणि त्याच्या हृदयाचे तट ढासळत जातात. पुष्कळ वेळां मोठेपणा आड येत असतो. तसे राजाला फार क्लेश झाले. त्याच्या मुलीला, ती फार सुंदर आणि तेजस्विनी असल्यामुळें कोणी मागणी घालीनात. तेव्हां क्षत्रिय धर्माप्रमाणें एकच मार्ग खुला राहिला, कीं तिनेंच आपला पति निवडावा. एक दिवस सावित्री दरबारांत आली. सुंदर दिसली. तेव्हां राजा म्हणाला, 'सावित्री, तुला कोणी मागणी घालीत नाहीं म्हणून मी सांगतों. तुला पसंत पडेल तो पति तूं वर. पण लक्षांत ठेव, पतीची निवड करतांना डोळ्यासमोर रूप नको ठेवूं अं! गुणांवर लक्ष ठेव.' रूप हें वयमानाप्रमाणें कमी होत जाईल. तर गुण हे वयोमानाप्रमाणें वाढत जात असतात. गुणाचा परिपाक होत असतो. पहिली बायको असतांना दुसरी करतो हें रूपावरचें प्रेम आहे. पहिली बायको मेली तर तिचे गुण आठवून पुन्हां अशी बायको मिळणार नाहीं असें म्हणून दुसरें लग्न करीत नाहीं याचें नांव गुणांवरचें प्रेम. असो. राजा म्हणाला, 'सावित्री, तुला कोण पसंत पडेल तें मला

सांग आणि मग जो तुझा आवडता वर असेल त्याचा मी विचार करीन. आणि मग माझा निर्णय तुला सांगेन त्याप्रमाणें कर. कारण तुझ्या सुख–दुःखाचा विचार मी अधिक चांगला करूं शकेन.' ती म्हणाली, 'महाराज, इतकी घाई कां?' राजा म्हणाला, 'पोरी, मुलीला लग्नांत न देणारा बाप निंद्य आहे असें शास्त्र सांगतें. लग्न केल्यानंतर बायकोला टाकणारा नवरा निंद्य आहे, बाप मेल्यानंतर आईचें रक्षण न करणारा मुलगा निंद्य आहे; आणि उपवर मुलीचें लग्न योग्य वेळीं न करणारा बाप निंद्य आहे. म्हणून सावित्री, तूं वर पसंत कर आणि मला सांग.' सावित्री वरसंशोधनाला निघाली तेव्हां राजानें वृद्ध आणि अनुभवी मंत्री तिच्याबरोबर दिले. 'फ्रेन्डस्' नाहीं दिले, आणि सांगितले कीं, जा–पतीची सुंदर निवड करून परत ये.' अलीकडे एक तऱ्हा निघाली आहे कीं नवरी नापसंत कां तर म्हणे फ्रेंडला आवडली नाहीं. अरे नवरी कोणाला करावयाची, तुला का फ्रेन्डला? असो, सावित्री आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणें निघाली. तिनें एकच लक्षांत ठेवलें कीं, गुणी वर पाहिजे. टेस्ट आहे.–वर पसंत करतांना डोळ्यासमोर रूप नको ठेवूं अं! गुणावर लक्ष ठेवून वर पसंत कर; हे आपल्या पित्याचे शब्द तिनें बरोबर ध्यानांत ठेवले आणि निघाली. ती ज्या ठिकाणीं राजे आणि ऋषि राहत होते अशा एका रम्य वनांत आली आणि वनामध्यें आलेल्या राजांची सेवा करण्याकरितां कोणी राजपुत्र आले आहेत काय? असा कोणी सुंदर आणि गुणवान् राजपुत्र आला असेल तर त्याला मी वरीन असें

तिनें मनांत ठरविलें. प्रथम ती अशा राजर्षींच्या वनांत आली येथपासूनच तिच्या परीक्षेची सुरुवात आहे.

मुलगा मोठा झाला म्हणजे त्याच्या ताब्यांत राज्य देऊन आपण मोकळें व्हावें असा प्रघात पूर्वी होता. त्याप्रमाणें असे 'रिटायर्ड' राजे त्या वनांत राहत असत. सावित्री त्या वनांत आली त्यावेळीं त्यांत राहणाऱ्या राजर्षींची सभा चालू होती. ती त्या सभेंत गेली–सगळ्यांना नमस्कार केला, सर्व प्रांत हिंडली; दानधर्म केला, आश्रम पाहिले, त्यांत असणारे कांहीं राजपुत्रहि पाहिले आणि काय तिला ठरवावयाचें होतें तें तिनें आपल्या मनांत ठरविलें आणि फिरली परत.

सावित्री वरसंशोधनासाठीं गेल्यानंतर ती परत येण्याचे सुमारास राजाकडे देवर्षि नारद आले होते. त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या आहेत. इतक्यांत सावित्री आली. तिनें आपल्या वडिलांजवळ नारद बसले आहेत, असें पाहून त्यांना नमस्कार केला, मग आपल्या पित्याला नमस्कार केला आणि विनयानें आपल्या बापाच्याजवळ उभी राहिली. नारदांनीं तिला विचारलें, 'कोठें गेली होतीस?' राजालाहि विचारलें, 'राजा, हिला कोठें पाठविली होतीस?' आणि म्हणालें, 'राजा, एवढी मोठी मुलगी झाली आहे पण अजून लग्न कां करीत नाहींस?' राजा अश्वपति म्हणाला, 'महाराज, मी त्याच काळजींत आहे. आपला पति पसंत करण्यासाठींच मीं तिला पाठविली होती. ती आजच परत आली आहे व आपणहि अनायासें येथें आहांत तेव्हां तिची पसंती ऐकून ती कशी काय तें मला

सांगा." राजा म्हणाला, 'सावित्री, कोणता पति पसंत केला आहेस तें आम्हांला सांग.' ती म्हणाली, 'महाराज, ऐका. सार्वभौम राजा, जातीचा क्षत्रिय, पृथ्वीपति पण मागाहून दुर्दैवानें आंधळा झाला. त्याला एक लहान मुलगा होता. मुलगा लहान आणि राजा आंधळा झाला आहे असें पाहून आसपासच्या राजेलोकांनीं चढाई करून त्याचें राज्य घेतलें. मग पुढें हा राजा वनवासांत गेला. त्याचा मुलगा सत्यवान् मीं स्वतःसाठीं वर पसंत केला आहे आणि मनानें प्रथम वरला आहे.

'नगरांत आणि राजैश्वर्यांत जन्मलेला, पण वनांत वाढलेला; काबाडकष्टांत वाढलेला म्हणून साधाच असणार. वनांत आईबापांच्या सेवेंत आपला सगळा वेळ घालवितो आहे. वनवासांत असल्यामुळें उद्धट नाहीं, वनांत राहिल्यामुळें कणखर झालेला असा पति मी मनानें पसंत केला आहे आपली संमति असेल तर त्यालाच वरीन—कारण मी मनानें त्याला प्रथम वरलें आहे.' पसंती झाल्यानंतर त्याला मान न देणें हें अन्याय्य आहे. पण त्या इच्छेच्या पोटांत शील आहे. मनुष्याची संपत्ति आणि नांवलौकिक त्याच्या शीलावर अवलंबून आहेत. एकदां दुष्यंत वनामध्यें आला आणि शकुंतलेला पाहिल्याबरोबर ही स्त्री आपल्याला असावी असें त्याला वाटलें. तसेंच तिलाहि असें वाटलें कीं, हा आपल्याला पति असावा. दुष्यंताला वाटलें कीं, मी क्षत्रिय आहे आणि ज्या अर्थी माझें मन हिच्याकडे ओढलें जात आहे त्या अर्थी ती क्षत्रीयच असली पाहिजे. ऋषींच्या आश्रमांत वाढली असली म्हणून काय झालें? त्यानें विचारलें 'तूं

कोण ?' ती म्हणाली, 'मी विश्वामित्राची कन्या क्षत्रिय आहे.' मग दुष्यंत म्हणाला, 'म्हणूनच माझें मन तुझ्याकडे ओढलें. तुला काय वाटतें ?' 'हांसुनि तीहि म्हणे हो!' पण नाही-शील आहे! ती कांहीं आधुनिक 'कॉलेज' कन्यका नव्हती. म्हणून ती म्हणाली, 'राजा, 'प्रार्थावें प्रणत पारिजातातें, । देवा स्वयें वहावें या निज कारुण्य वारिजा तातें म्हणजे कण्वांची प्रार्थना करा कारण जो त्याच्यांशीं नम्र होतो, त्याचे ते पारिजात म्हणजे कल्पवृक्ष आहेत. दीन होऊन मागणी घाला.' 'तुझी संमति ?' 'हो, माझी आहे संमति. पण बाबांना म्हटलें तर 'नाहीं' म्हणणार नाहींत. मीहि देवाची प्रार्थना करीन कीं, देवा, माझ्या बाबांना दुष्यंत राजाच्या मागणीला नाहीं म्हणण्याची बुद्धि देऊं नको।' यांत शीलाचें सौंदर्य आहे. ती म्हणाली, 'देवाची प्रार्थना करीन.' हांसुनि तीहि म्हणे हो प्रार्थावें प्रणत-पारिजातातें । देवा, स्वयें वहावें या निज-कारुण्य वारिजातातें ॥ देवा, असें कर कीं हें त्यांच्या करुणेंत वाढलेलें कमळ तातांनीं स्वयें देवा म्हणजे राजाला वहावें. म्हणजेच कण्वांनीं दुष्यंताची मागणी कबूल करावी. अशी मी देवाची प्रार्थना करीन. पण तुम्ही मागणी घाला. असें शकुंतला दुष्यंताला सांगते आहे. हें शील आहे. तसें सावित्री सांगते आहे कीं, मी असा वर पसंत केला आहे. पण या वर्णनावरून राजाला कांहींच उमजेना. म्हणून नारदांकडे पाहून राजा म्हणाला, 'महाराज, कसा काय आहे नवरा ?' त्यांच्या कपाळाला आंठ्या पडलेल्या दिसल्या. ते म्हणाले, 'राजा काळजी करूं नकोस आतां या विषयावर आपण उद्यां बोलूं!

# प्रवचन ४ थें

लोकांमध्यें व्यक्तिस्वातंत्र्य म्हणून एक थोतांड निघालें आहे. स्वातंत्र्याचा नुसता उच्चार आहे आणि पारतंत्र्याचा क्रिया चालू आहे. ज्या मुलांमुलींवर त्यांच्या आईबापांची सत्ता आहे ती काढून सरकारकडे देणें, याचें नांव व्यक्ति-स्वातंत्र्य. कोणतीही क्रिया करतांना तिकडे अनेकांचे डोळे लागलेले असतात. त्यांत स्वार्थहि असतो. माना, नका मानूं; पण हें खरें आहे. आपल्याकरितांच सर्व गोष्टी प्रिय आहेत हेंच खरें. 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति ।'

'ही मुलगी तुला देत नाहीं' असें एकाद्याला सांगितलें कीं, मग तो असा प्रचार करतो कीं, 'अहो, ही मुलगी मला सांगून आली होती पण ती मी नाकारली. कारण ती क्षयी आहे'–आईबाप जी चौकशी करतात त्याचें कारण कुलाला कलंक लागूं नये असा असतो. मुलगा-मुलगी एकमेकां-समोर उभीं केली तर त्यांचीं एकमेकांकडे पाहण्याची दृष्टि निराळी असते. 'कन्या वरयते रूपं, माता वित्तं, पिता श्रुतम् । बांधवाः कुलमिच्छान्ति मिष्टान्नमितरे जनाः ।' अशी प्रत्येकाची बघण्याची दृष्टि निराळी असते. प्रथम आकर्षण रुपाचें असतें. लहान मुलीला जर विचारलें, कीं 'बाळ, तुला नवरा कसा हवा ?' तर तीहि आपल्या बाल-बुद्धीनुसार म्हणते कीं, 'मला गोरागोमटा, सुंदर नवरा हवा तिलाहि माकडासारखा नवरा नको असतो.

आई केव्हांहि पैसा पाहाते. तिचें एवढें रुपाकडे लक्ष नसतें. कारण एखादे वेळीं ती एखाद्या सुंदर पण दरिद्री नवऱ्याला पत्करून चुकलेली असते. म्हणून ती म्हणते कीं,

एकवेळ संसारांत रूप नसलें तरी पत्करतें, परंतु पैसा पाहिजे. नवरा जरी काळाभेंद्रा, कृश असला पण मुलगी जर दागिन्यांनीं पिवळी जर्द झाली असेल तर मातेचा आनंद गगनांत मावेनासा होंतो.

पण मुलीपेक्षां व आईपेक्षां बापाची दृष्टि निराळी असते. तो स्वानुभवानें जाणत असतो कीं, आपण पुष्कळ रूपवान् होतों, धनकनकसंपन्न, कोट्याधीश होतो, पण दैवानें झोला दिला, पैशापरी पैसा निघून गेला. आज भिक्षाधीश झालों. शरीरावरची कांतीहि गेली. कांहीं विद्या केली नाहीं. विद्या केली असती तर आज उपयोगाला आली असती. ज्यावेळेस कोणाचा उपयोग होत नाहीं त्यावेळीं समाधानाला विद्याच उपयोगी पडते. व असा विद्यावान् विद्वान् राजापेक्षांहि मोठा आहे. कारण ' स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान् सर्वत्र पूज्यते । ' विद्वान जाईल त्याठिकाणीं राज्य त्याचें असतें. विद्वान् हा एक चेक आहे. सर्व बँका त्याच्या असतात. अर्थात त्याचा चेक कोणत्याहि बँकेवर वटविला जातो. बोलक्या माणसाला जगांत काय कमी पडणार आहे ? ' शुकोप्यशन प्रश्नाति हरेराम इति ब्रुवन् । ' हरेराम म्हणणाऱ्या पोपटाची कशी मौज असते ! त्याला हिरव्या मिरच्या, आणि कितीतरी सुंदर फळें मिळतात. न बोलणाऱ्या पोपटाला घालवून देतात. सारांश, पिता काय पाहतो तर ' पिता श्रुतम्, ' तात्पर्य, ज्याचा जितका निकट संबंध असेल त्याप्रमाणें तो बघत असतो.

बांधव एवढेंच पाहतात कीं मुलगा कुलीन आहे ना ? आपल्या कुलावर दूषण तर आणणार नाहीं ना ? तो रुपवान्,

धनवान्, विद्यावान् असो वा नसो. नाहींतर हे गृहस्थ कोण? तर 'मॉर्निंग कलेक्टर!' मग तुमचा यांचा काय संबंध, तर म्हणे आमचे मेव्हणे बहिणीचे नवरे. यांची जात कोण तर म्हणे महार! असें कांहीं तरी वेडेवाकडें ऐकलें म्हणजे सच्छील बांधवांना दुःख होतें.

बरें, आळींतील मंडळी कोणत्या दृष्टीनें बघतात? ते म्हणतात–'करा मोतीचूर नाहींतर जिलबी!' 'अहो पण, साखर नाहींना?' तर म्हणतात, 'ऐंशी रुपये मण ब्लॅक मार्केट आहेच!'

याशिवाय दृष्टि टाकणारी मंडळी म्हणजे ज्योतिषी. ते म्हणतात, 'अहो, सप्तमांत मंगळ आहे; लग्न जुळणार नाहीं.' उपाध्याय येतो. तोहि म्हणतो, 'या लग्नाला गोत्रज ऋषींची संमति नाहीं. सगोत्र आहे' अशा प्रकारें शंभर टके अगदीं कुंडलीचे छत्तीस गुण जमणें अशक्य आहे. आजपर्यंत तरी कोणाचे जुळले असतील कीं नाहीं कोणास ठाऊक? अर्थात् शक्य तितकें लोकानुरोधानें घ्यावयाचें इतकेंच व असाच जगाचा व्यवहार चालतो व तो शास्त्रमान्यहि आहे. म्हणूनच म्हटलें आहे कीं, 'सर्वेषामविरोधेन लग्नकर्म समारभे। असो; जन्मभर पोसला आणि आतां स्वतंत्र म्हणवितोस; तें कसें चालेल? त्यानें आजतागायतचे पैसे भरून द्यावेत, मग म्हणावें तसें वाटलें तर. पण तसेंही चालणार नाहीं. कारण मटेरियल कोणाचें आहे? मुलांनीं सांगावें आणि वडील माणसांनीं त्याचा विचार करून त्याला पटवून द्यावें हीच खरी गोष्ट आहे. पहिलें आकर्षण रूप, दुसरें पैसा. लहानपणीं मला वाटे, पोस्टमन् व्हावें; कारण त्याच्याजवळ

पुष्कळ रुपये असतात आणि ते तो दुसऱ्यांना वांटीत असतो. असो; मघाशीं सांगितलेल्या सगळ्या दृष्टि खऱ्या आहेत. त्या सगळ्यांचा विचार करून मार्ग काढावयाचा असतो. शिवाय ज्योतिष. अशा अनेक भानगडी असतात. म्हणून शक्य तितकें सगळ्यांची संमति घेऊन कार्य केलें म्हणजे अडचणी कमी येत असतात.

सावित्री आपल्या पित्याच्या आज्ञेनुसार आपल्यासाठीं वर पसंत करण्यासाठीं गेली होती. ती वर पसंत करून परत आली त्याचवेळीं तिच्या बापाकडे नारद आले होते. हा योगायोग चांगला होता. नारदांनीं तिला विचारलें, 'सावित्री, कोठें गेली होतीस'? तेव्हां राजा (तिचा बाप) म्हणाला, 'महाराज, ती— वर संशोधनासाठीं माझ्या परवानगीनें गेली होती.' मग नारद म्हणाले, 'राजा, कसा काय वर आहे?' तेव्हां राजा म्हणाला, 'महाराज, माझें आणि तिचें अजून बोलणें झालें नाहीं,' लगेच तो सावित्री-कडे वळून म्हणाला, 'सावित्री, अनायासें नारदमुनि आले आहेत तर कसा पति तूं निवडला आहेस तें आतां आम्हांला सांग.' ती म्हणाली, 'बाबा, द्युमत्सेन नांवाचा राजा होता. पुढें तो आंधळा झाला. त्याला एक लहान मुलगा होता. राजा आंधळा आणि मुलगा लहान हें पाहून शेजारच्या राजांनीं त्याचें राज्य घेतलें. तो मुलगा नगरांत जन्मलेला आणि वनांत वाढलेला असा आहे. त्याला मीं वरिलें आहे. त्याचें नांव सत्यवान्.' इतका कथाभाग काल सांगितला होता. सावित्रीनें सांगितलेलें या त्रोटक वर्णनावरून राजाला कांहीं समजेना. म्हणून त्यानें नारदांकडे पाहिलें तों त्यांनीं

22८४

कपाळाला आठ्या घातलेल्या त्याला दिसल्या! म्हणून राजानें विचारलें, 'महाराज, इनें पति निवडला नाहीं काय?' नारद म्हणाले, 'राजा, हिनें चांगला पति निवडला आहे. पण त्यांत एक गोष्ट वाईट आहे. मात्र ती तिला माहीत नाहीं; त्यामुळें तिचा नाइलाज आहे. मुलगा चांगला आणि रूप-गुण-संपन्न असा आहे. त्याचें नांव सत्यवान्—सत्यवान् नांव पडण्याचें कारण असें कीं, त्याची आई खरें बोलणारी आहे, बापहि खरेंच बोलतो. म्हणून ब्राह्मणांनीं त्याचें नांव सत्यवान् असें ठेविलें आहें. खरें कोण बोलतो तर ज्याचे आई, बाप आणि गुरु चांगले आहेत तो. आई, बाप आणि गुरु हे कोणाला नसतात? सगळ्यांना असतात; पण ते चांगले असावे लागतात. तसेंच जो मुलगा मातृमान्, पितृमान् आणि आचार्यवान् असतो तो चांगला. आतां मातृमान् पितृमान् आणि आचार्यवान् म्हणजे काय तें सांगतों. जी आई आपल्या मुलाला त्याच्या पांचव्या वर्षापर्यंत स्वतः सगळें शिक्षण देते तो मातृमान्. नंतर पित्याच्या देखरेखी-खालीं ज्याचें शिक्षण होतें तो पितृमान्. 'तुला अगदीं ज्ञान नाहीं. असा दगडासारखा कसा राहिलास? बाप नाहीं का तुला?' असें विचारतात. तसें विद्या शिकला तरी ती कशी वापरावी हें जो गुरूपाशीं शिकतो तो आचार्यवान्. विद्या शिकल्यानंतर ती कशी वापरावी हें कळणें ह्यास शहाणपण असें म्हणतात. तसेंच कोणतीहि गोष्ट कुठें आणि कशी उपयोगांत आणावी हें नीट समजणें यालाहि शहाणपण असें म्हणतात. नाहीं तर विवाहांत प्रेतसंस्काराचे मंत्र

म्हणेल आणि सांगेल कीं, हे वेदमंत्र आहेत. तर तसें नाहीं चालणार. जेथले मंत्र तेथेंच म्हटले पाहिजेत. आईबापांच्या पलीकडील जबाबदारी गुरूवर आहे. पूर्वीच्या काळीं मुलाला शाळेंत घालतांना बाप मास्तरांना सांगत असे कीं, हाडें माझीं आणि मांस तुमचें आहे. म्हणून ज्याचे आई-बाप आणि गुरु हे चांगले आहेत, म्हणजे जो मुलगा मातृमान्, पितृमान् आणि गुरुमान् म्हणजे आचार्यवान् आहे तो चांगला असलाच पाहिजे. म्हणून हीं अशीं नांवें पूर्वीं ठेवीत असत." नारद सांगतात, कीं 'राजा, याप्रमाणें त्याचें नांव सत्यवान् असलें तरी त्याला दुसरेंही एक नांव आहे. त्याला एक नाद आहे.' कोणालाहि असा एकादा नाद असतोच. कांहींतरी 'फॅड' असतेंच. जॉन्सन एवढा मोठा पंडित पण त्याला तारेच्या खांबाला हात लावण्याचा नाद असे. एकादा खांब चुकलासा वाटला तर परत मागें येऊन त्याला हात लावून तो मग पुढें चाले. यांत काय आहे तर नाद किंवा 'फॅड' इतकेंच त्याचें साधें आणि सरळ उत्तर आहे. बिंदी-करितां चिंधी म्हणतात तसे या विद्वानांचे असले नाद त्यांच्या ज्ञानासाठीं सांभाळावे लागतात. असो, नारद सांगतात,' राजा, या राजपुत्राला मातीचे घोडे करण्याचा नाद आहे. कांहीं नाद असे असतात कीं, त्यावरून भविष्य ओळखतां येतें. मातीचे घोडे करणें ह्याचें शास्त्रीय गमक असें कीं, हें राज्यलक्षण आहे. आज दारिद्री असला तरी हरकत नाहीं. पूर्वीं लेखणी, पोथी अशा बऱ्याच जिनसा एके ठिकाणीं टाकून लहान मुलाला जवळ सोडीत आणि सहज त्याचा हात कोणत्या वस्तूवर पडतो तें पाहत असत;

आणि त्यावरून त्याचें भविष्य सांगत. तसें सत्यवानाला लहानपणापासून घोड्याचा नाद आहे. कांहीं मुलांना पूजेचा नाद असतो. लहानपणीं घोडा बघितला कीं रडत असलेला मुलगा थांबतो. पूजेच्या घंटेचा नाद ऐकला कीं मुलाचें रडें बंद होऊन तो त्या घंटेच्या नादांत रमतो. हा कार्य-कारणभाव आईबापांना समजणें शक्य नाहीं. तो जन्मां-तरींचा संस्कार असतो. तसें या सत्यवानाला लहानपणीं घोड्याचा नाद असे. म्हणून याचें दुसरें नांव ' चित्राश्व, असें आहे. ' हें ऐकून राजानें विचारलें, " महाराज, त्याचें नांव आणि नाद हे चांगले आहेत खरें; पण महाराज, सावित्रीनें तो पसंत केला आहे म्हणून जरा औत्सुक्यानें विचारतों कीं तो मातृमान्, पितृमान् आणि आचार्यवान् असूनहि धर्मानें चालणारा, तेजस्वी, बुद्धिमान् आणि शूर असा आहे का ? अजून पहिलें वर्तन आणि तो नाद हीं तशींच चालू आहेत काय ? " नारद म्हणाले,' ' राजा, धन्य तुझी सावित्री. सूर्यासारखा तेजस्वी, बृहस्पतीसारखा बुद्धिमान्, पृथ्वीसारखा क्षमावान् आणि इंद्रासारखा शूर असा वर तिनें पसंत केला आहे. ' राजानें पुनः विचारलें, " महाराज, पण तो दाता आहे कीं नाहीं ? दान ही शोभा आहे. राजा असून दाता नसेल तर तें राजपद व्यर्थ होय. उन्हाळ्यामध्यें पृथ्वीचा ( पृथ्वीवरला ) रस सूर्य शोषून घेतो तो पावसा-साठीं, तसें मोठी मंडळी जें घेतात तें देण्यासाठीं, स्वतःसाठीं नाहीं. राजा जे कर घेतो, ते प्रजेच्या सुखासाठीं. तसेंच महाराज, तो ब्राह्मण्य पाळणारा आहे काय ? " यावर नारद सांगतात, "राजा, तुझा जांवई रंतिदेवासारखा अंगाचें कातडें

सोलून देणारा दानशूर आणि ययातिप्रमाणें उदार आहे. अश्विनकुमारांसारखा सुंदर आहे, धैर्यवान् आहे, सर्वमान्य आहे. आणखी काय सांगूं ?" यावर राजा म्हणाला, "महाराज, इतकें सगळें चांगलें असून सावित्रीनें चूक केली असें कसें म्हणतां ?" नारद सांगतात, "राजा, त्याच्यांत एकच दोष असा आहे कीं, त्यामुळें या सगळ्या गुणांचें मातेरें होणार आहे. तो दोष असा जबरदस्त आहे कीं राजा, त्यापुढें हे सगळे सद्गुण फुकट आहेत. शिवाय तो दोष अटळ आहे. आणि राजा, तो दोष म्हणजे पुढल्या वर्षीं तो मरणार आहे !" हें ऐकून राजा सावित्रीकडे वळून एकदम म्हणाला, "सावित्री, सोड नाद त्याचा. माझी संमति नाहीं. दुसरा वर शोध. हा फार मोठा आणि अटळ दोष आहे, म्हणून याला सोडून दुसरा वर शोध." यावर सावित्री म्हणाली, 'महाराज, आपण नारदांना विचारा कीं, आणिक तर कांहीं दोष नाहीं ना ? तो अल्पायु आहे हा त्याचा दोष नाहीं; तें माझें प्रारब्ध आहे. तेवढ्यासाठीं मी त्याला सोडायला तयार नाहीं. मीं त्याला मनानें वरलें आहे !" ती पुढें म्हणाली, 'बाबा, दगड एकदांच तुटतो, राजे एकदाच बोलतात; स्त्री एकदांच पति वरते आणि पंडित एकदांच सांगतात. हत्तीचा दांत आणि पंडिताचा शब्द जो एकदां बाहेर आला तो पुन्हां आंत जाणार नाहीं. बिभीषण शरण येतांबरोबर रामानें त्याला अभय दिलें. आणि भोंवतालच्या मंडळींनीं गहजब केला तरी त्याचा त्याग केव्हांहि करणार नाहीं असें म्हणाले.

सगळ्या वानरांची समजूत अशी कीं, राम आपलें ऐकणार आहे. ते म्हणाले, ‘ रामा, हा शत्रुपक्षीय आहे, याला अभय देऊं नका, आणि दिलेंत तर आम्ही जाऊं ! ’ राम म्हणाले, ‘ खुशाल जा. माझ्या व्रतापेक्षां मला जास्त कांहीं प्रिय नाहीं. खुशाल मला सोडून जा. दृष्ट-अदृष्ट असे कसेहि प्रसंग माझ्यावर येवोत, माझा शब्द मी मागें घेणार नाहीं. ’ असो, कन्यादान एकदांच होत असतें. सावित्री म्हणाली, ‘ बाबा, तुमच्या सांगण्याप्रमाणें गुणांवर नजर ठेवून सत्य-वानाला मीं मनानें वरलें आहे. दुसरा कांहीं दोष नाहीं ना ? अल्पायु आहे तो त्याचा दोष नाहीं. तें माझें प्रारब्ध आहे. तो दोष म्हणजे त्या दोषाचे परिणाम माझे मी भोगावयास तयार आहे. त्यांत तुम्हांला कसलाही कलंक नाहीं. तेव्हां मनानें वरलेला पति सोडावयाला मी तयार नाहीं. आणि माझी मनोदेवता मला असें सांगते आहे कीं, माझी निवड चुकली नाहीं. अगदीं बरोबर आहे. मी मनानें पूर्ण विचार करून बोललें आहे. त्यांत फरक होणार नाहीं. वाचिक आणि मानसिक अशा दोन क्रिया होऊन गेल्या आहेत. आतां कायिक क्रिया झालीच पाहिजे. माझें मन मला कधींहि दगा देणार नाहीं ! ’ हे सावित्रीचे निश्चयाचे विचार ऐकून राजाची त्रेधा उडाली. तिचें सामर्थ्य आणि तेज इतकें कीं, राजा जास्त बोलूं शकेना. नारदांच्याकडे त्यानें बघितलें. ते म्हणाले, ‘ राजा, तिच्या मनासारखें होऊं दे. तिला सत्य-वानाला देऊन टाक. तिचा निश्चयच तसा आहे, तर ईश्वर

तिचें कल्याण करील.' तें ऐकून राजा म्हणाला, 'सावित्री, तुमचा विवाह होऊं दे. मी संमति देतों.' हें ऐकून नारद निघाले. सावित्रीनें त्यांना नमस्कार केला तेव्हां ते म्हणाले, 'सौभाग्यवती भव' आणि चालले पुढें. राजानें विचारलें, 'महाराज, कोठें जातां?' ते म्हणाले, 'मुलीचा हट्ट पुरविण्यासाठीं बघतों कोशीस करून! राजा, आतां जातों. पण तुम्हांला असा आशीर्वाद देऊन जातों कीं, तुमचें कल्याण असो.' आपणहि आज़ नारदांच्या बरोबरच जाऊं.

## प्रवचन ५ वें

नारद निघून गेल्यानंतर राजा आपल्या मनाशीं विचार करीत होता कीं सावित्रीचा हट्ट आणि हट्टाप्रमाणें नारदांची संमति हें कसें? मोठ्यानें संमति कशी दिली हें समजणें कठिण आहे. स्त्रीच्या हट्टाच्या स्वरूपाकडे लक्ष देऊन त्या हट्टांत काय आहे असा माणूस विचार करील तर त्यांत कांहीं तरी तत्त्व आहे असें दिसून येईल. सावित्रीच्या हट्टांत त्याग आहे. त्यागप्रधान हट्टाला संमति द्यावी लागते. म्हणून नारदांनीं तिच्या पसंतीला संमति दिली. नारदांनीं 'जातों आणि कांहीं कोशीस करून पाहतों' असें सांगितलें तर त्यांत सी. आयू. डी. काय आहे? कार्यावरून असें वाटतें कीं, कांहीं तरी कारण झालें असलें पाहिजे. कारण सावित्री-देवी प्रसन्न झाली त्यावेळीं तिनेंहि असें सांगितलें होतें कीं, देईन तेवढें घे आणि स्वस्थ बैस; कांहीं जास्त मागूं नकोस. तुला सर्व मिळणार आहे. परिणाम असा झाला कीं, सत्यवान् जिवंत झाला. यावरून कांहीं तरी झालें होतें हें खरें. तसेंच तिच्या हट्टाला संमति देऊन नारद निघून गेले यावरूनहि कांहींतरी असावें असें वाटलें.

नारद गेल्यानंतर सावित्रीचें लग्न ठरलें. सावित्रीच्या लग्नाची तयारी चालू झाली. जाणून बुजून व्याही गरीब आहे. खोटेपणा नाहीं; नाहींतर सांगतों मी तारमास्तर आहे, बसावयाला मोटार, हाताखालीं चार माणसें! याचा अर्थ असा कीं हा तारा जोडणारा हमाल असून शहरांतून इकडे तिकडे हिंडणाऱ्या मोटारींतून हा कुली म्हणून जात असतो!

सावित्रीला माहीत होतें कीं, आपला सासरा गरीब आहे. आईचीहि कुरकुर नाहीं. राज्यभ्रष्ट आहे, आंधळा आहे. याबद्दल बिलकूल कुरकुर नाहीं. फक्त एकाच गोष्टीची खुर-खुर कीं जांवई अल्पायु आहे. निवड करणें महाकर्म कठीण आहे. हल्लीं वधू पाहिजे, वर पाहिजे म्हणून जशा जाहिराती येतात आणि त्यांतून वधूवरांचें वर्णन दिलेलें असतें, तसें पुढें असाहि काळ येईल आणि अशा जाहिराती दिल्या जातील कीं, श्रीमंत सासरा पाहिजे. त्याला मुलगी नसली तरी चालेल. असो. या सगळ्यांत सावित्रीच्या आईची कुरकुर नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. याचें कारण एकच कीं, पुरुषांनीं सांगितलें तें बायकांनीं ऐकलें पाहिजे अशी जुनी चाल असे. बापलेकांचें भांडण झाल्यानंतर आई कोणीकडे वळते तरी पण या ठिकाणीं बाप आणि लेक (सावित्री) एक झालीं. त्यांना नारदांची संमति मिळाली. मग हिला म्हणजे या मुलीच्या आईला विचारतो कोण? तरीपण ती जुन्या चालीची असल्यामुळें आपल्या पतीच्या विरुद्ध नव्हती, हें सांगणें जरूर आहे. असो; सावित्रीच्या लग्नाची तयारी सुरू झाली. ब्राह्मण, पुरोहित व ऋषि-मुनि घेऊन सावित्रीचा बाप राजा द्युमत्सेनाच्या आश्रमाला आला. एका वनवाशाच्या आश्रमाला एक मोठा राजा येतो आणि लांकडें फोडणाऱ्या आणि हातांत दर्भ आणि कमंडलु असलेल्या गरीब मुलाला आपली राजकन्या देतो! कसा प्रसंग आहे तें पहा. ते गरीब होते म्हणून राजाहि आश्रमाकडे विनयानें आणि पायानेंच गेला. त्यांतल्या त्यांत विचार असा कीं, तो वरपक्ष आहे. आपण राजे आहोंत तर तो राजर्षि आहे. म्हणून विनयानें

आला. एका वृक्षाखालीं पद्मासन घालून राजा द्युमत्सेन श्रीहरीचें नांव घेत बसला होता. अश्वपतीनें ( सावित्रीच्या बापानें ) नमस्कार केलान् आणि आपलें नांव सांगितलेन्. या राजर्षिनेंहि ( द्युमत्सेनानेंहि, ) त्याचा आदरसत्कार केला आणि आसन देऊन बसावयास सांगितलें. बसल्यानंतर बोलण्याला प्रारंभ झाला. द्युमत्सेन म्हणाला, 'कोणींकडे आलांत राजेमहाराज ?' कारण कांहीं कल्पनाहि नाहीं. त्यांच्या येण्याची. राजा अश्वपतीनें सगळा प्रकार सांगितला. एकच गोष्ट सांगितली नाहीं कीं मुलगा अल्पायु आहे.

आईसमोर मुलाची पत्रिका पाहतांना एकाद्या ज्योतिषानें जर सांगितलें कीं, ८० व्या वर्षी मुलगा मरणार आहे तरी आई ऐकायला तयार नाहीं. मोठ्यांचें हृदय कसें असतें पाहा. राजा अश्वपति हा विवाहसमारंभ करावयास आला आहे. काय कठोर गोष्टी घडणार आहेत हें त्याला पक्कें माहीत आहे; तरी त्याची छटा चेहऱ्यावर नाहीं. थोरांचें हृदय 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।' असें असतें. आपला जांवई एक वर्षानें मरणार आहे हें माहीत असूनहि राजा द्युमत्सेनाशीं अशा कांहीं गोड तऱ्हेनें बोलतो आहे कीं, निराशेची किंवा औदासिन्याची छटाहि त्याच्या बोलण्यांत अगर चेहऱ्यावर दिसत नव्हती. अश्वपति द्युमत्सेनाला सांगतो आहे कीं, 'राजर्षे, मीं आपली सावित्री नांवाची मुलगी आपल्या मुलाला देण्यासाठीं आणली आहे. तिचा स्वीकार करावा.'

द्युमत्सेन म्हणाला, ‘ राजा, अरे, तूं सार्वभौम राजा; मी गरीब आणि माझ्या मुलाला आपली मुलगी देतो म्हणतोस तर तूं काय पाहिलेंस ? अरे, तूं प्रत्यक्ष राजा आहेस तर आम्ही राज्यभ्रष्ट आहोंत. राज्य सोडून वैराग्यानें तपश्चर्ये-साठीं आम्ही वनांत आलेले नसून राज्यभ्रष्ट आहोंत म्हणून वनांत राहत आहोंत. ’

काशीला जाऊन एखादा राहिला म्हणजे म्हणतो, म्हातारपणीं आतां या पुण्यक्षेत्रांतच राहावें आणि येथेंच मरावें असें वाटतें. पण खरें असें असतें कीं, मुलानें याला हांकलून दिलेला असतो आणि बजावलेलें असतें कीं, खबरदार घरीं परत आलात तर ! तशी स्थिति येथें नव्हती. द्युमत्सेन स्वतः सांगतो आहे कीं, ‘ राजा, आम्ही राज्यभ्रष्ट होऊन या वनांत राहत आहोंत. येथें आल्यानंतर तुझ्या मुलीला त्या राजकन्येला वनवास पत्करावा लागेल याचा कांहीं तूं किंवा तिनें कधीं विचार केला आहे काय ?’ अश्व-पति म्हणाला, ‘ महाराज, या सगळ्या गोष्टींचा मीं आणि माझ्या मुलीनें विचार केला असून सुख आणि दुःख हे आकाशांतील ढगाप्रमाणें येणारे जाणारे आहेत. असो. मला आणि माझ्या मुलीला हें सर्व पटलें आहे. गरीबाचा श्रीमंत आणि श्रीमंताचा गरीब असें चक्र एकसारखें चालत असतें हें आम्हांला माहीत आहे. कदाचित् तुम्हांलाहि पुन्हां राज्य मिळेल ! व्यक्तिमत्त्व आणि शील याच गोष्टी आमचेपुढें आहेत’ पदार्थांचीं लक्षणें दोन. तटस्थ लक्षण आणि स्वरूप लक्षण. पोषाख म्हणजे पांढरा कोट, काळी टोपी हें तटस्थ लक्षण. आणि विद्या आणि शील हें स्वरूप लक्षण. तटस्थ लक्षण

जाणारें आणि बदलणारें आहे तर स्वरूप लक्षण न जाणारें आणि कायम टिकणारें आहे. अश्वपति म्हणाला, ' राजर्षे, या सगळ्या गोष्टींचा आम्हीं विचार केला आहे. आम्हांला शील आणि व्यक्तिमत्त्व पाहिजे.' द्युमत्सेन म्हणाला, 'राजा, हा तुझा विचार झाला, पण मुलीचा विचार ? ' अश्वपति म्हणाला, ' राजर्षे, माझ्या मुलीचा विचार माझ्याबाहेर असूं शकणार नाहीं.' ( ती कांहीं आधुनिक मालिनी नव्हे.) आपण असें विचारतां हा मी माझा अपमान समजतों. मोठीं माणसें विचार केल्याशिवाय बोलत नाहींत. टिळकांनीं लिहिलेल्या एकाद्या लेखाविषयीं एकाद्या कंपोज करणाऱ्या कंपॉझिटरनें विचारावें कीं, 'कां हो बळवंतराव, हा शब्द या ठिकाणीं बरोबर आहे काय ? करूं कंपोज ? ' अरे मूर्खा, तूं हें काय विचारतोस ? तें बरोबरच आहे. अरे, त्यांनीं लिहून जें खालीं टाकलें तें सर्व बरोबर असणारच तसें अश्वपति म्हणाला, ' राजर्षे, मी या सर्व गोष्टींचा विचार केला आहे, आणि आशेनें आपल्याजवळ आलों आहे. माझा आशाभंग करूं नका. मी शरण आहे नम्र आहे; माझ्या मुलीचा स्वीकार करा.' व्याह्या-व्याह्यांची ' मॅच ' आहे. द्युमत्सेन म्हणाला, ' राजा, तुझा अपमान व्हावा किंवा करावा हा बिलकूल उद्देश नसून तुला खरी स्थिति कळावी एवढाच उद्देश होता.' असो, द्युमत्सेन पुढें म्हणाला, ' राजा, मी आंधळा आहे म्हणून तुलाच विचारतों कीं, मुलगा आणि मुलगी दोघें हीं अनुरुप आहेत काय ? अश्वपति म्हणाला, ' होय राजर्षे. चित्राश्व आणि सावित्री अगदी उत्कृष्ट जोडा आहे. आपल्याला पाहिजे तें विचारा, अगदीं सरळ सांगतों.

या सगळ्याचें तात्पर्य एकच कीं, माझी मुलगी सावित्री हिचा सून म्हणून स्वीकार करा.' हें ऐकून द्युमत्सेन म्हणाला, 'राजा, खरें सांगू ? तुझ्या मुलीची कीर्ति मी ऐकली होती त्यावेळीं मला वाटलें होतें कीं, माझ्या मुलाला तुझी मुलगी मिळेल काय ? असा विचार माझ्या मनांत येतो न येतो तोंच मी राज्यभ्रष्ट झालों. पण श्रीहरीची मर्जी, तोच विचार आज अशारीतीनें खरा होतो आहे. तरी पुनः पुनः विचारावेसें वाटतें आणि सांगावेसें वाटतें कीं, राजा, पुनः विचार कर.' अश्वपति म्हणाला, 'महाराज, आम्ही पूर्ण विचार केला आहे.' झालें. लग्न ठरलें. यथाविधि ब्राह्मणांना बोलावून राजानें शास्त्रीय पद्धतीनें लग्नविधि केला. लग्नसमारंभ उत्तम तऱ्हेनें पार पडला. अश्वपतीनें पुष्कळ पैसा खर्च केला. दानधर्म केला. सामान दिलें. दक्षिणा दिल्या सर्व समारंभ उत्तम तऱ्हेनें पार पडला. जातांना राजा अश्वपतीनें सावित्रीला उपदेश केला. वास्तविक तिला काय उपदेश करावयाचा ? तिची योग्यता फार मोठी होती हें तो जाणून होता. ऐश्वर्यवान्, सद्गुणी मुलगी जाणूनबुजून आश्रमांत सोडून जातांना त्या राजाच्या हृदयाला काय वाटलें असेल ?

रामाच्या स्वाधीन सीतेला केल्यानंतर ती जेव्हां नमस्कार करावयास आली तेव्हां ती रडूं लागली आणि जनकाच्या डोळ्याला पाणी आलें. तो रडत रडतच सांगूं लागला कीं, 'सीते रडूं नको बाई, पूस डोळे.' असें होतेंच. पण विवेकी असतात ते आपलें दुःख संयमानें लवकर आटोपतात इतकेंच.

वीरश्रीचें सोंग घेतलें तरी प्रसंग विशेषीं त्यांतलें बिंग बाहेर फुटल्याशिवाय राहात नाहीं.

एकदां एक ब्राह्मण आणि एक हंबीरराव नांवाचे शूर गृहस्थ रानांतून जात होते. असे वाटेनें जातां जातां हंबीरराव आपल्या वीरश्रीच्या कल्पित गोष्टी ब्राह्मणास सांगत असे आणि म्हणे, वाघ, सिंह—कांहीं आले तरी भिऊं नका. मी आहे ना तुमच्याबरोबर!' त्याच्या या बोलण्यानें ब्राह्मणालाहि धीर वाटे. एक दिवस खराच वाघ आला. ब्राह्मण घाबरला आणि 'वाघ! वाघ! हंबीरराव धांवा!' असें ओरडूं लागला. हे हंबीरराव होते शेंदाडशिपाई! तेहि घाबरले. त्यांची तुमान सुटली, तलवार पडली, जोडे उडाले, पगडी उडाली, तरी ते म्हणाले, 'अहो घाबरेबुवा! असें बामणतां काय? तेवढी माझीं वस्त्रें आणि अस्त्रें आणून द्या! मग पाहतों काय बिशाद् आहे त्या वाघाची! पण तोंपर्यंत अहो घाबरबुवा! असें बामणूं नका! मी आहें ना! असें बामणतां काय?' असो. राजा जनक सीतेला निरोप देतो आहे. मोठपणा आणि लहानपणा यांच्या बॅलन्समध्यें त्याला बोलावयाचें आहे. प्रसंग आला म्हणजे विकार नैसर्गिक तऱ्हेनें येतातच. पण अशा वेळीं बॅलन्स ठेवून आपल्याला वागावयाचें असतें. त्यावेळीं एवढा ब्रह्मनिष्ठ जनक राजा पण त्याच्यानेंही राहवलें नाहीं. त्याच्या डोळ्याला पाणी आलें. तो म्हणाला, 'सीते, रडूं नको. दुःख आवर. कारण अगोदरच कळवळलेलें माझें मन तुला रडतांना पाहून जास्त कळवळेल. सीते, तूंच आनंदी हो. तरच माझें समाधान होणार आहे. जर असें दुःख होणार

नाहीं तर संसार काय आहे !' साधु-संत हे सुखदुःखातीत आहेत असें नाहीं तर ते संयमी आहेत म्हणून बॅलन्समध्यें राहतात इतकेंच. असें असलें तरी एकादी वेळ अशी येते कीं, तेही गडबडतात. प्रारब्धभोग हे प्रसंगीं हंसवितात आणि रडवितात. प्रारब्धभोग हे आपल्याला रडविणारच; पण ते भोग भोगतांना संत हे बॅलन्समध्यें राहतात हेंच त्याचें खरें मोठेपण होय. जनकाला रडूं येण्याचें कारण सीतेवरील त्याचें अनिवर्चनीय प्रेम! जनकाला दारिद्र्याबद्दल रडूं येण्याचें कारण नव्हतें. कारण तो राजा होता; दशरथहि राजा होता; जांवई राम तोही कांहीं असातसा नव्हता, तर त्यानें शिवधनुष्याचा भंग करून आपली पात्रता सिद्ध केली होती. मग मुलीच्या बापाला रडूं कां येतें ? तर हा निसर्ग आहे. वाटल्यास गूढ चिकित्सामंडळांत याचा जन्मभर विचार करा, आणि चिकित्सा करीत बसा. जनक म्हणाला, 'सीते, इतका वेळ रडण्याचा संकोच वाटत होता, पण आतां अगदीं रडावेसेंच वाटतें. तुला आणखी एक गोष्ट सांगतों. आतां माझ्या हृदयांतून लज्जा निघून गेली आहे; कारण आपला ( बाप आणि लेक ) यांचा वियोग पाहून हा कठोर विश्वामित्र ऋषि कीं ज्यानें अघोर तपश्चर्या करून ब्रह्मर्षि ही पदवी मिळविली, पण आपला वियोग पाहून त्याच्याहि डोळ्यांत पाणी आलें आहे. म्हणून मी रडलों तरी हरकत नाहीं.'

मुलीला जो उपदेश करावयाचा तो तिच्या वागणुकींतच होता. कोणतीहि गोष्ट सांगावी कां लागते ? तर एकादा वीक पॉइंट असतो म्हणून; सावित्रीला तसा उपदेश करण्याचें

कारण नव्हतें. ' संभाळून नीट राहा, ' एवढेंच सांगून राजा अश्वपति मोठ्या आनंदानें परत गेला. सावित्रीनें दागिने नाहीं पाहिलेन्. आपल्याला हवा तसा पति मिळाला याचा तिला आनंद झाला. बुद्धिमान् होता. भटजी, म्हणजे पूजा सांगणारा हुषार गुरुजी कोणता ? तर मुलीनें केलेल्या तयारीप्रमाणें पूजा सांगतो तो–नाहींतर म्हणेल कापूर विसरलाच कां ? या म्हणण्यानें काय होतें तर यजमानाला आणि पूजेची तयारी करणाऱ्याला वाईट वाटतें कीं, हें कसें विसरलें ? असो. म्हणून पूजा साहित्याप्रमाणेंच पूजा सांगितली पाहिजे आणि जेवावयास गेल्यानंतर आहेत तेच पदार्थ गोड करून घेतले पाहिजेत; त्यांत कांहीं खोडी काढल्या तर जेवणाचा आनंद जातो आणि मालक पुनः जेवावयास बोलावणार नाहींत. तात्पर्य, कांहीं तरी वैशिष्ट्य राखावें लागतेंच. राजाच्या पोषाखापेक्षां कमी किंमतीचा पोषाख सभासदांनें घालावा अशी राजनीति आहे. श्रेष्ठ असतो त्याचें कांहीं तरी वैशिष्ट्य असतेंच; याला एकच अपवाद असतो कीं, रूप नाहीं बदलतां येत.

सावित्री आपल्या नवऱ्यापेक्षां सुंदर आहे. तिचा पोषाखही तिच्या सौंदर्याला आणि ऐश्वर्याला साजेसाच होता. पण आश्रमांत राहिल्याबरोबर पतीच्या पोषाखाप्रमाणें वल्कलें आणि भगवीं वस्त्रें तिनें धारण केलीं. किंमतवान् दागिने आपल्या हातानें काढून ठेवले आणि झुळझुळीत महालक्ष्मी बनली. त्याहि पोषाखांत ती साधी आणि सुंदर दिसूं

लागली? किमिवहि मधुराणां मंडनं नाकृतीनाम्। 'जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभते,' तिचें हें बाह्यरूप तथा वनवासी आणि आश्रमीय राहणीला योग्य असेंच रंगलें यांत तिची वागणूक आणि शील इतकें सुंदर दिसलें कीं, ती आतां सासरीं कशी वागते इकडे सगळ्यांचें लक्ष लागून राहिलें आहे. ती राजकन्या खरी, पण आतां या आश्रमांत ती कशी वागते तें आपण उद्यां पाहूं.

# प्रवचन ६ वें

श्रीमंताची मुलगी, राजकन्या सावित्री आश्रमांत कशी वागते हें आपल्याला बघावयाचें आहे. वनामध्यें सावित्रीचें वर्तन.–पहिली गोष्ट तिनें केली ती ही कीं, पतीच्या समान स्वरूपांत गेली. आंत असलेल्या संस्कारांना बाहेरून दुजोरा मिळणार नाहीं तर ते बाहेर येणार नाहींत. नवीन संस्काराचेही परिणाम माणसाच्या मनावर होत असतात; कांहीं कांहीं वस्तु अगर क्रिया नुसत्या पाहून देखील नवीन संस्कार होत असतात, त्याला जपावयाचें असतें काळ हा दुःख विसरवून टाकण्याला मदत करतो. 'Time is the Greatest healer' अशा त्या अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे. दिवसेंदिवस माणसें दुःखी कां होतात ? तर गेल्याचा शोक वृथा न करावा-या वचनाशीं तीं आपल्याला प्रामाणिकपणें ( adjust ) अ‍ॅडजस्ट करून घेत नाहींत म्हणून. मेलेल्या मुलाचा फोटो समोर ठेवतात आणि त्याचे गुण आठवून रडतात. अरे, आपल्या समोर नेहमीं जें चित्र ठेवावयाचें तें श्रीहरीचें असलें पाहिजे. समर्थांचें चित्र, नाथांचें चित्र अशीं आदर्श चित्रें आपल्या समोर असावींत. त्यांच्यासारखें आपण झालें पाहिजे. आपण कां दुःखी होतों ? तर सुख मिळविण्यासाठीं म्हणून ज्या आपण क्रिया करतों त्या सुखाच्या अगदीं विरुद्ध असतात म्हणून. पण सावित्रीनें पहिली गोष्ट तर अगदीं बरोबर केली–म्हणजे पतीच्या वेषाशीं अगदीं जुळता असा पोषाख तिनें केला. समाजांतहि तसेंच असतें. हल्लीं मात्र मोठे कठीण दिवस आले आहेत.

पूर्वी पांचावर धारण बसली असें म्हटलें म्हणजे कठीण दिवस आले आहेत असें आपण समजत असूं. तेच आज आपण एकावर धारण आली तरी जगतों आहोंत! (किमाश्चर्यमतः परम्।) अशा वेळीं श्रीमंतांनीं थाटामाटानें वागणें म्हणजे जे गरीब आहेत त्यांच्या दुःखावर डागण्या देण्यासारखें आहे. दुःखाचा परिणाम क्रोधांत होतो. म्हणून शांति धरावी. प्रारब्धानें आलें हें खरें असलें तरी काळ तसा राहिला नाहीं. दुसऱ्याला खोकला आला तर आपलेंहि कपाळ दुखतें असें सांगावें. लग्नाच्या गोष्टी निघाल्या तर अमक्याचें लग्न झालें, तमक्याचें लग्न ठरलें आहे, असें सांगावें. त्यात मरणाच्या गोष्टी सांगू नयेत. लग्नाच्याच आणि त्याहि शुभ लग्नाच्याच बोलाव्यात. व्यवहार हा परमार्थाचा श्रीगणेशा आहे. व्यवहारांत आलेला तात्कालिक उमाळा ज्याला दाबून टाकतां येत नाहीं तो परमार्थांत शमदमाचा अभ्यास कसा करणार? असो. सावित्रीनें प्रथम आपलीं उंचीं वस्त्रें-प्रावरणें बाजूला ठेवलीं. कां! तर सासरच्या माणसांना वाईट वाटेल म्हणून. या गोष्टींना आपत्तींतच जास्त जपावयाचें असतें. निसर्गतः स्त्री ही अलंकारप्रिय असते असें दिसतें. पुरुषांनीं साधे असावें आणि स्त्रियांनीं सालंकृत असावें यांत शोभा आहे; पण यालादेखील आपत्तींत जास्त जपावयाचें असतें. स्त्री ही घराची शोभा आहे. 'गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते।' घरांत स्त्री नसेल तर घरभर विड्या आणि चहाचा चोथा. आपत्तींत स्त्रीचा वेष शृंगारिक नसावा. कारण पतीला वाईट वाटेल. म्हणून नेहमीं जें जपावयाचें असतें तें आपत्तींत. आपल्या सावित्रीनें असेंच केलें हें मी सांगतों आहे. तें माझें

कर्तव्य आहे. सावित्री सर्वश्रेष्ठ झाली याचें कारण तिनें अतिशय कष्ट सोसले. साठ हजार वर्षे खडतर तपश्चर्या करून विश्वामित्र ब्रह्मर्षि झाले तसेंच खडतर तपश्चर्येनेंच सावित्रीचा सर्वोत्कर्ष झाला. स्वतःच्या पराक्रमानें जो मान होतो तोच खरा. आपल्या स्वतःच्या पराक्रमानें जो मोठा होतो तो केव्हांहि खालीं येत नाहीं. दुसऱ्यांनीं मोठा बनविलेला माणूस त्याचा आधार संपला कीं, खालीं पडतो. गंगा कां मोठी ? तर ती स्वयं मोठी आहे. कवि म्हणतो, गंगे.—

समुत्पत्तिः पद्मारमण पद्पद्मामलनखान् ।
निवासः कंदर्पप्रतिभटजटाजूट भवने ॥
अथायं व्यासंगो हतपतित निस्तारणविधौ ।
न कस्मादुत्कर्षस्तवजननिजागर्ति जगति ॥

—-गंगालहरी २१

( अर्थ—हे जननी गंगे, लक्ष्मीरमणाच्या कमलासारख्या चरणांच्या चकाकणाऱ्या नखांपासून तुझा उगम, मदनाला जिंकणारा जो शिव त्याचे जटेंत निरंतर तुझें वास्तव्य आणि हताश, पतित व जन्मांध यांच्या उद्धाराविषयीं तुझा सतत उद्योग अशी जी तूं, त्या तुला सर्व लोक कशी बरें मोठी मानणार नाहींत ? मानतीलच मानतील ?

तात्पर्य, कवि म्हणतो, ‘ आई गंगे, तुझा उत्कर्ष होतो यांत नवल नाहीं ! तुझें माहेरहि उत्तम, सासरहि उत्तम आणि वागणारी मुलगीहि उत्तम, मग उत्कर्ष कां होणार नाहीं ? झालाच पाहिजे. कारण सर्व बाजू स्वच्छ आणि निर्मळ. कोणत्याहि गोष्टीचा कलंक नाहीं; कलंक असेल

र प्रसंगीं मानहानि केल्याखेरीज राहत नाहीं. एकदा राकमी कर्ण, तो द्रौपदीस्वयंवरास हजर राहिला. हाआंत नुष्य घेतलें आणि मत्स्यवधासाठीं उभा राहिला. तावड- ीव द्रौपदीनें सांगितलें कीं, 'हा सूतपुत्र आहे. यानें जरी मत्स्यवेध केला तरी मी याला वरणार नाहीं.' मानभंग झाला. कर्ण म्हणाला, 'द्रौपदी, मी सूतपुत्र आहे यांत माझा अपराध नाहीं. पराक्रम माझ्या हातचा आहे.

"सूतो वा सूतपुत्रो वा यो वा कोवा भवाम्यहं।
दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ॥"

असा एखादा अपराध सासरीं घडला तर विचारावयासच नको. झालाच त्या माहेराचा उद्धार! कवि म्हणतो, 'गंगे, मुलींनीं जर तुझ्यासारखे वर्तन केलें तर त्याहि तुझ्या- सारख्याच मोठ्या होतील. तूं महाविष्णूची कन्या आहेस. पद्मारमणाच्या स्वच्छ नखांपासून तुझी उत्पत्ति! माहेर चांगलें. तुझें लग्न कोणाशीं झालें? तर महादेवाशीं—म्हणजे सासरहि चांगलें. तुझा वास कुठें? तर त्याच्या डोक्या- वर! तुला डोक्यावर कोणीं बसविली म्हटलें तर ज्यांनीं मदनाला जाळला त्यांनीं. केवढी लाडकी तूं त्यांची! याच्यांत काय निघालें? तर तुझे गुण चांगलें असल्यामुळेंच हें असें घडलें! याचा अर्थ असा कीं, नवरा कितीहि वाईट असला, जमदग्नि असला, तरी त्याच्यावर प्रेम करूनच त्याला वश करून घेतला पाहिजे. विरक्तांच्या मनांतहि लोभ उत्पन्न करणारे तुझे गुण शंकरांना जर विचारलें कीं, 'अहो, आपण विरक्त आणि डोक्यावर काय आहे! तर सांगतात कीं, exception म्हणजे अपवाद आहे. दोन्हीं वंद्य कुळें आहेत

असें असतांना 'सिनेमांत गेली असतीस तर! परंतु तुझें शील उत्तम असल्यामुळें तूं श्रीमंतांची मुलगी असूनहि स्मशानवासी शंकरांचे येथें आनंदानें राहिलीस. तुझा व्यासंग कोणता? तर प्राणिमात्राचा उद्धार करणें हाच तुझा व्यासंग. भगीरथानें आपल्या पूर्वजांच्या उद्धारासाठीं येण्याविषयीं तुझी प्रार्थना केलीन् त्यावेळीं तूं म्हणालीस कीं, 'भगीरथा, माझा वेग कोणी धरावयास तयार आहे काय?' तेव्हां भगीरथानें त्यासाठीं शंकराची आराधना केली. ते प्रसन्न झाले. बसले मांडी घालून. जटेचें पाळें केलें. तूं आलीस आणि त्यांत गुप्त झालीस. मग भगीरथानें शंकराची पुनः प्रार्थना केली आणि म्हणाला कीं, 'महाराज, गंगा कोठें आहे? अहो, मी ती आपल्या पितरांच्या उद्धारासाठीं आणिली आहे!' मग त्यांनीं जटेच्या एका भागांतून ती सोडली. ती एवढी मोठी झाली आहे. गंगेचे गुण असे कीं, शंकरांनाहि तिला सोडवेना! मग इतकें सगळें चांगलें असतांना तुझा उत्कर्ष कां होणार नाहीं? तसें आज आमची चरित्रनायिका सावित्री, तिचेंहि तसेंच झालें आहे. राजकन्या पण राज्यभ्रष्टांचे येथें पडली. आपलें माहेरचें सामान बाजूला ठेवलें आणि पति आणि सासू-सासरा यांच्यासारखा पोषाख केलान्. वल्कलें आणि भगवीं वस्त्रें एवढे दोनच डिझाइन्स. एवढेंच परिधान! तात्पर्य, प्रथम तिनें आपला वेष समान केला, सुटसुटीत केला आणि मग सेवा. सगळ्या गोष्टी थोडक्यांत आणि सुटसुटीत सांगणें याचें नांव काव्य. असें काव्य कालिदासाचें. त्यांनीं शकुंतलेला जो उपदेश केला तो आजहि मुलींना उपयोगी पडणारा आहे. मुलींना

कसें वागवून घ्यावें. त्याविषयीं तुळसीदास महाराजांनीं एक वर्णन केलें आहे.

सीतेची वरात ज्यावेळीं अयोध्येला आली त्यावेळीं सीता सहा वर्षांची होती. ती ज्यावेळीं घरीं आली त्यावेळीं राजा दशरथानें आपल्या राण्यांना सांगितलें कीं, राण्यांनो, ही छोटी सून आपलें माहेर सोडून दुसऱ्या घरीं आली आहे, हें लक्षांत ठेवा. आणि या आपल्या घरीं तिच्या मनात आत्मीयता कशी उत्पन्न होईल, येथें रहाण्यांत तिला आत्मीयता कशी वाटेल, इकडे लक्ष ठेवा. माळी ज्याप्रमाणें तोडलेलें फळ ओल्या फडक्यांत ठेवतो-अशासाठीं कीं, तें रसदार आणि तजेलदार राहावें-त्याप्रमाणें या छोट्या मुलीचें ममतेनें संगोपन करणें आणि तिला नहमीं आनंदी ठेवून या घराबद्दल तिच्या मनांत आत्मीयता उत्पन्न करणें हें आपलें कौशल्य आहे. दुसऱ्याच्या घरीं गेल्यानंतर माणूस थोडासा बिचकतो, म्हणून हिला डोळ्याच्या पापण्या बुबु-ळांना जशा जपतात तसें कौसल्यें, या लहान मुलीला जपा आणि आपल्या घरच्या चालीरीती तिला लागतील असें. म्हणजे अशा तऱ्हेनें तिला संभाळा. ' वधु लरिकिन परघर आयी । राखिय नयन पलखिय नायी ॥ कण्वांनींहि शकुं-तलेला असेंच सांगितलें आहे कीं, शकुंतले, अशा तऱ्हेनें वागणाऱ्या स्त्रियाच घराच्या मालकिणी होणार; हा वशी-करणाचा मंत्र आहे. याप्रमाणें वागणाऱ्या स्त्रिया भाग्यवान् होतात. तर याच्या उलट वागणाऱ्या स्त्रिया कुलटा होतात. आणि कुलाची आधि आणि नवऱ्याची व्याधि होतात. तिला सगळे लोक सोडूं शकतात, पण नवऱ्याला कांहीं

सोडतां येत नाहीं. त्याला तिचें सर्व सहन केलें पाहिजे. असो, चांगलें वागण्यांत विशेष कांहीं आहे काय ? तर फक्त संयम आहे आणि थोडेसें शारीरिक कष्ट आहेत इतकेंच. कष्ट सोसल्याशिवाय कोणतेंही काम नीट होणार नाहीं. आपण इतकीं कामें केलीं पाहिजेत कीं, सासूची कामाची संवय मोडली पाहिजे. म्हणजे कपाटाची किल्ली ती चोरल्या-शिवाय हातीं येईल.

गुरुजनांची सेवा–सेवा ही जादू आहे. मोठ्या माणसांची सेवा हें एक प्रकारचें वशीकरण आहे. त्यांची कामाची संवय मोडली म्हणजे त्यांना दरघडी आपली आठवण झाली पाहिजे. म्हणून नवऱ्याला पहाटे उठून बंब पेटविण्याच्या कामापासून अगोदर सोडावा. पतीच्या अगोदर त्याच्या घरच्या वडील माणसांची म्हणजे गुरुजनांची सेवा सांगितली आहे. देवपूजेच्या अगोदर भूमिपूजा, कलशपूजा, शंखपूजा आणि मग शांताकारम्, पृथ्वीसारखी सासू, कलशासारखा सासरा, शंखासारखा दीर आणि घंटेसारखी नणंद असली तरी सेवेनें त्यांना आपलेसें करून घेतां येतें. एक सून आपल्या मैत्रिणीला शनीच्या पाराजवळ सांगते आहे कीं, 'विमल, काल असें झालें कीं—हे माझ्यावर प्रेमानें थोडें रागावलें.' नणंदेला असा आनंद झाला कीं काय सांगूं ! सासूबाईंनाही असें वाटतें कीं; मेल्यावर मुलानें पिंड नाहीं दिले तरीं चालेल पण त्यानें एकदां सुनेला ठोकली पाहिजे. जर हे माझ्याशीं जरा रागावून बोललें तर यांना वस्त्राचेंही भान न राहतां नाचूं लागतात. असो, म्हणून कन्यांनीं

शकुंतलेला असें सांगितले कीं, बाई सभोंवतालच्या मंडळींना अनुकूल अशीच वागणूक असावी.

शुश्रूषस्वगुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने ।
भर्तुर्विप्रकृताऽपि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः ॥

भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी ।
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः ॥१॥

तुझ्या ज्या सख्या असतील त्यांच्याशीं प्रेमानें वाग. नवरा ही व्यक्ति चांगली पण त्या व्यक्तीला त्या नवरेपणाच्या स्थानामुळें जो एक चेव येतो, एक प्रकारचें बेंड येतें तें वाईट आहे. मैत्रिणी-मैत्रिणी विहिणी झाल्या कीं, भांडल्याच. संबंध हा मोठा वाईट आहे. तसें नवरेपणाचा असा एक अधिकारमद असतो.

तेव्हां शकुंतले, तुझ्या पतीनें तुझ्या मनाविरुद्ध कांहीं जरी केलें आणि त्यामुळें तुला राग आला तरी तो राग क्रियेंत आणूं नकोस अं! प्रत्येकाचे आईबाप प्रत्येकाला प्रिय असतात, म्हणून आपल्या भांडणांत एकमेकांच्या आईबापांचे दोष केव्हांही काढूं नयेत. एकदां तोंडांतून बाहेर पडलेला शब्द कांहीं झालें तरी परत जाणार नाहीं. म्हणून, शकुंतले, सासरीं आपला राग कृतींत आणूं नकोस. आणि आसपासचा परिवार आणि सखीजन यांच्याशीं नेहमीं त्यांना अनुकूल असें वाग. त्यांच्या कार्याविषयीं नेहमीं दक्ष राहा. प्रारब्धांनीं अलोट संपत्ति मिळाली तरी पहिली गरिबी विसरूं नकोस. त्या संपत्तीचा गर्व होऊं देऊं नकोस. असें वागलीस तर ठीक, नाहींतर कुलाला आणि

नवऱ्याला व्याधि असें होईल. म्हणून शकुंतले, सासरीं आतां सांगितलें तसें नीट वाग म्हणजे तूं सगळ्यांची आवडती होशील आणि तुझा उत्कर्ष होईल '–सांगण्याचें तात्पर्य असें कीं, आपली चरित्रनायिका सावित्रीं हिचें वर्तन अगदी तस्सें घडलें आणि म्हणून कण्वांनीं सांगितल्याप्रमाणें या श्लोकांत लिहिल्याप्रमाणें सावित्री सर्वमान्य झाली. ती सर्वमान्य कशी झाली आणि आश्रमांत ती कशी वागली याचें वर्णन उद्या सांगूं.

---

# प्रवचन ७ वें

राजकन्या सावित्री वनांत आणि ऋषींच्या आश्रमांत कशी वागते तें आपणांस पाहावयाचें आहे. तिनें आश्रमांत आल्या-बरोबर दोन गोष्टी केल्या. पहिली गोष्ट म्हणजे ती आपल्या पतीशीं समानरूप झाली. म्हणजे आपला मौल्यवान् पोषाख टाकून तिनें वल्कलें धारण केली. आणि दुसरी गोष्ट म्हणजे सेवावृत्ति पत्करली. सेवा ही अशी गोष्ट आहे कीं, मोठे मोठे ब्रह्मनिष्ठही सेवेनें संतुष्ट होतात. सेवेनें सेवक कृश होतो पण सेव्य वश होतो. आश्रमांत आल्यानंतर सेवावृत्तीचा अवलंब करून तिनें सगळ्यांचा संतोष आणि कृपा संपादन केली. सेवा हा मोठ्यांना वश करावयाचा वशीकरण मंत्र आहे. शिवाय सावित्री इतरही सद्गुणांनीं संपन्न होती. ती अल्पसंतोषी होती, नम्र होती, संयमी होती, आज्ञाधारक होती. एकाद्याला आपलासा कसा करून घ्यावा याची कला सावित्रीला उत्तम साधली होती. ती सर्वांना हवीशी वाटे. तिनें आपला पति, सासू, सासरा इतक्यांचेंच प्रेम संपादन केलें होतें असें नव्हे, तर शेजारीं राहाणारे ऋषि आणि त्यांच्या ऋषिपत्न्या ह्यांनाही आपली सावित्री हवी हवीशी वाटे. आपल्या सौजन्ययुक्त वागणुकीमुळें ती सगळ्यांची आवडती झाली होती. ती राजकन्या असूनही तिनें गरिबीचा संसार उत्तम तऱ्हेनें संभाळून दाखविला. तिनें आपल्या सासूसासऱ्याची सेवा उत्तम तऱ्हेनें केली. कशी केली ती सांगूं ? आपला पति मातृपितृभक्त आहे हें तिनें अगोदरपासूनच ओळखलें होतें. तेव्हां त्याला मदत व्हावी व बरें वाटावें म्हणून आपल्या सासूसासऱ्यांच्या सेवेचा बराचसा भाग

तिनें न सांगतां, न कुरकुरतां उचलला. त्यामुळें सत्यवानालाहि आनंद झाला. आणि त्याच्या मातापितरांनाही बरें वाटलें. तिची सासू अत्यंत वृद्ध झाली होती म्हणून ती तिला अगदीं पाटावरून ताटावर व ताटावरून पाटावर असें करीत असे. त्यामुळें सासूला या सुनेला कोठे ठेवूं–आणि कोठें न ठेवूं असें झालें होतें. सुनेवर ती अत्यंत प्रेम करी. सासऱ्याची सेवा तिनें देवाप्रमाणें केली. त्यांच्या स्नानाची संध्येची, पूजेची, फराळाची तयारी ती अगदीं उत्तम तऱ्हेनें आणि न चुकतां व तत्परतेनें करी. तिच्या वागणुकींत मूर्तिमंत प्रेम दिसत असे. कष्टाची छायाहि तिनें आपल्या चेहऱ्यावर कधीं येऊं दिली नाहीं. मनुष्य म्हातारा झाला म्हणजे त्याची वृत्ति चिडचिडी बनते. त्यामुळें म्हाताऱ्या माणसांची सेवा करून त्यांना प्रसन्न ठेवणें ही खडतर तपश्चर्याच म्हटली तरी चालेल. लहान मुलें ज्याप्रमाणें कांहींहि बोललीं तरी आपण तें बोलणें मनावर घेत नाहीं; त्याप्रमाणें म्हाताऱ्या माणसांच्या बोलण्याकडे व त्यांच्या चिरचिरीकडे विशेष लक्ष न देतां वागण्यास शिकलें पाहिजे. पण ते कठिण आहे, हें नाकबूल करून चालणार नाहीं. म्हाताऱ्या माणसांच्या कुरकुरींत कार्यकारण संबंध नसतो. ज्याप्रमाणें मुलांचें समाधान युक्तीनें करावें लागतें त्याप्रमाणें म्हाताऱ्याचें समाधानहि ते जें जें म्हणतील त्याला नुसते हो हो म्हणूनच करावयाचें असतें. त्यांच्याशीं तंडत बसावयाचें नाहीं व आपली शांतवृत्तीही सोडावयाची नाहीं. आणि त्यांचें चहापाणी, स्नानसंध्या, जेवण, फराळ यांची व्यवस्था मात्र ठीक ठेवावयाची. दरवाज्याचें दार उघडझाप करतांना

जसें कुरकुर करतें पण त्याकडे आपण लक्ष देत नाहीं. त्याप्रमाणें म्हाताऱ्या माणसांच्या प्रत्येक कुरकुरीकडेहि लक्ष देण्याचें कारण नाहीं. तसेंच म्हाताऱ्यांनींहि समर्थांची शिकवण लक्षांत ठेवावी. समर्थ सांगतात—

" पेरिलें तें उगवतें। बोलण्यासारखें उत्तर येतें। तरी मग कर्कश बोलावें तें। काय निमित्त."

तसेंच दुसरा एक कवि म्हणतो—

' दुष्टोत्तरें पुत्रही संग सोडी। '

म्हणून म्हाताऱ्यांनीं हें लक्षांत ठेवून वागावें. गोड शब्दानें गुरें-ढोरेंहि जवळ येतात, मग माणसें कां येणार नाहींत ? मनांपासून केलेल्या सेवेच्या योगाने आणि मधुर भाषणानें सेव्य आणि सेवक या दोघांनाहि संतोष होत असतो. पण हें सगळें करूनहि एक गोड शब्द जर नसेल तर सगळें फुकट आहे. उदाहरणार्थ, ब्राह्मणाला पोटभर जेवावयास घातलें, दक्षिणाहि भरपूर दिली आणि निरोप देतांना गुरुजी, सगळें यथास्थित, ठीक झालेंना ! असें नम्रतेनें विचारण्या ऐवजीं जर असें विचारलें कीं, कां गुरुजी, असें सुग्रास आणि सुंदर जेवण कधीं बाप-जन्मीं पाहिलें होतें काय ? तर सगळें व्यर्थ होय. उलट सासुरवाशिणीला जर नुसते सहानुभूतीचे दोन शब्द आपण बोललों तर आपल्याबद्दल तिच्या मनांत आदरभाव उत्पन्न होतो. गोड भाषण ही एक कला आहे. त्याला किंमत तर कांहीं पडत नाहींच पण त्याच्या योगानें सगळें जग मात्र आपलेसें करतां येईल. पुष्कळ घरांवर ' वेकल्म्, ' सुस्वागतम्, ' अशा नुसत्या पाट्या मात्र लटकत असलेल्या दिसतात, पण

मालकाची वर्तणूक पाहावी तों उद्दामपणाची ! गोड कसें बोलावें हें इंग्रज लोकांपासून शिकावें. तसेंच—" कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तो प्रत्ययास येतें । तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्त ? " हें समर्थांचें वचन जर नेहमीं लक्षांत ठेवलें तर गोड बोलण्याची कला आपल्याला लवकर साध्य होईल. गोड बोलण्यानें मनांतील प्रेमळपणा जाहीर होत असतो. आपली भाषा गोड असावी व वागणूक सौजन्यशील असावी. यासाठीं मन, वाणी आणि शरीर यांची एकी व्हावयाला पाहिजे. यापैकीं एकाचाहि यत्किंचितहि विरोध असतां कामा नये. शरिराला कष्टाची संवय पाहिजे. आणि मनःसंयमापेक्षांही प्रथम वाणीचा संयम अगोदर पाहिजे. कारण मनोविकारांना वाणीचें पाणी मिळत असतें आणि त्यामुळें ते फोफावत असतात. म्हणून मनोविकारांना दाबण्यासाठीं त्यांना वाणीकडून मिळणारा रसच बंद करावयाला पाहिजे; आणि यासाठींच प्रथम मौन शिकावयाला पाहिजे. म्हणजे कार्यविघात होत नाहीं व सारासार विचार करावयास अवसर सांपडतो. या सर्व कला सावित्रीनें हस्तगत केल्या होत्या. आणि म्हणूनच राजकन्या असूनहि वनवासी बनून ती यशस्विनी होऊं शकली. तिनें आपल्या पतीचीहि सेवा अत्यंत एकनिष्ठपणानें केली. त्याच्याशीं ती नेहमीं गोड बोलत असे व घरांतील कामाचा विशेष बोजा त्याच्यावर पडूं देत नसे. त्यामुळें तो नेहमीं तिच्यावर प्रसन्न असे. प्रसंगानुरुप कसें वागावें या ज्ञानाला चातुर्य असें म्हणतात. तें सावित्रीजवळ होतें. म्हणून तिनें सगळ्यांचीं अंतःकरणें आपल्याकडे ओढून घेतलीं होतीं.

आपल्या घरचीं कामें प्रथम आटोपून नंतर ती शेजाऱ्यांनाहि मदत करीत असे. त्यामुळें ती शेजाऱ्यापाजाऱ्यांनाहि आपलीशी वाटे. घरच्या माणसांना ओरडत ठेवून भलतीच देशसेवा करणारी ती आधुनिक तरुणी नव्हती. स्वजनसंतोष प्रथम, हें तिचें ध्येय होतें. असो. अशातऱ्हेनें आपल्या गोड वागणुकीनें सावित्रीनें तेथील सर्व मंडळींवर एक प्रकारची मोहिनी घातली होती.

अशा तऱ्हेनें वरून जरी ती आनंदानें वागत होती तरी आंतून तिला मनःस्वास्थ्य नव्हतें. आपला पति एक वर्षानें मरणार अशी एकसारखी टोंचणी तिच्या हृदयाला लागून राहिली होती. पण धन्य ती सावित्री, कीं आपल्या या परम दुःखाचा मागमूसहि तिनें कधीं कोणाला लागूं दिला नाहीं. यापेक्षां श्रेष्ठ संयम तो कोणता ? आणि यापेक्षां योग म्हणजे तरी अधिक काय आहे ? पतिमरणाची कल्पना मनांत आली कीं, ती सत्यवानाचे मुखाकडे एकसारखी पाहूं लागे व तिच्या मनांत अनंत कल्पना येत. आर्यस्त्री आपला पति वेडावांकडा कसाहि असला तरी त्याची सेवाच करील, पण तो मरावा असें तिच्या मनांतहि कधीं येणार नाहीं. मग सत्यवानासारखा सर्व-गुणसंपन्न पति असतांना आणि त्याच्या मरणाचा दिवस डोळ्यापुढें दिसत असतांना सावित्रीच्या हृदयांत चर्र होत असेल यांत नवल काय ? या काळजीमुळें ती दिवसेंदिवस खंगत चालली. सासूनें तिला विचारलें, 'मुली, तुला काय होत आहे ? माहेरासारखें खाणें-पिणें आमच्या येथें नाहीं म्हणून वाईट वाटतें काय ?' यावर उलट 'मला येथलीं ताजीं फळें फार आवडतात,' असें

कांहीं तरी सांगून ती सासूचें समाधान करीत असे. जसजसे दिवस जाऊं लागले तसतसे नारदांचे शब्द एकसारखे सावित्रीच्या हृदयांत घोळूं लागले. पण तिनें तसें कोणालाहि कळूं दिलें नाहीं. वरवर पहाणाराला ती आनंदीच दिसे. तिच्या मानसिक वेदनांची कल्पना फक्त तिलाच होती. इतरांना त्यांचा नुसता संशयहि येऊं दिला नाहीं. अशा तऱ्हेनें हां हां म्हणतां अकरा महिने निघून गेले. आणि बारावा महिना उजाडला. आणि सर्व दिवस संपून सत्यवानाच्या मरणाचा दिवस जवळ आला. माझा सत्यवान् मला सोडून जाणार या विचारानें तिचें हातपाय गळाले. पण लगेच तिच्या मनांत आलें कीं, ही गोष्ट बाहेर फुटूं देतां कामा नये, कारण वृद्ध म्हातारा म्हातारीला या गोष्टीचा नुसता सुगावा जरी लागला तरी त्यांचे पंचप्राण तत्क्षणीं जातील. व त्याला कारण मी होईन. असे सर्वत्रांचे सगळे क्लेश तिच्या एकटीवर येऊन पडले. पण ती घाबरली नाहीं. तिनें होऊनच आपल्या अंतःकरणाला धीर दिला. उभ्या वर्षांत एक दिवसहि तिला माहेरची आठवण झाली नव्हती, पण ती आज झाली. माझा पिता सावित्रीदेवीचा भक्त आहे. त्या देवीच्याच कृपाप्रसादानें माझा जन्म झाला आहे. तेव्हां ती देवीच अशा प्रसंगीं मला धैर्य देईल आणि माझ्या पतीवर येणारें मरणाचें गंडांतर दूर करील. आतां तिचेच पाय धरले पाहिजेत असें तिला वाटलें. आतां मी तिचे त्रिरात्र–व्रत करतें आणि त्यायोगें जर माझा पति जगला तर त्याच्यासह प्रतिपदेला पारणें करूं नाहींतर प्रायोपवेशन करून त्याच्यासह सहगमन करूं, असें म्हणून तिनें लगेच त्रिरात्र–व्रताला प्रारंभ केला. तिनें

आरंभिलेलें हें व्रत तिच्या सासऱ्याला कळलें तेव्हां त्यानें तिला जवळ बोलावून सांगितलें कीं, 'मुली, तूं हें फार मोठें आणि कष्टदायक व्रत आरंभिलें आहेस.' त्यावर 'हें माझ्या माहेरचें देवीचें व्रत आहे' असें कांहींतरी सांगून वेळ मारून नेलीन्. तिला पुष्कळ बोलावेसें वाटत होतें पण ते सगळे उमाळे तिनें संयमानें दाबलेन्. द्युमत्सेन म्हणाला, 'मुली, सगळ्यांचे कष्टहि तुलाच करावे लागणार तेव्हां हें व्रत तुझ्याच्यानें शेवटपर्यंत निभावेल काय? आणि असे उपवास तूं किती दिवस करणार?' यावर सावित्री म्हणाली, 'महाराज, मनुष्याला संकटांतून-दिव्यांतून पार पडण्याची शक्ति अन्नानें येत नसते तर ती मानसिक निश्चयानें येत असते." "निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंचि फळ, मनुष्याचा निश्चय" नसेल तर त्याचा जीव घाबरूं लागतो. सपाटून भूक लागलेली असली, आपण भुकेनें अगदीं हैराण झालेलों असलों तरी आज एकादशी आहे असें कळतां बरोबर ती भूक सह्य होते. तसें.

" महाराज, माझा निश्चय माझ्या या व्रतांतून मला पार पाडील आणि आपल्या आशीर्वादानें मला कसलाहि त्रास होणार नाहीं. आपण बिलकूल काळजी करूं नका." राजा म्हणाला, "सावित्री, तुझ्या सुकुमार देहाकडे पाहून तूं हें व्रत करूं नयेस असें वाटतें. पण तूं निश्चयानें हें देवाचें व्रत करते आहेस तेव्हां त्यापासून तुला परावृत्त तरी कसें करूं? असो, परमेश्वर हें तुझें व्रत निर्विघ्नपणें पार पाडो! एवढेंच मी त्याच्याजवळ मागणें मागतों." सावित्रीच्या व्रताचे दिवस संपत आले. जो जो दिवस उजाडे तो तसाच

राहील तर बरें असें तिला वाटे. पण तें तिच्या हातचें होतें थोडेंच! चवथा दिवस उजाडला. सूर्यनारायण क्षितिजावर दिसूं लागला. साश्रु नयनांनीं त्याच्याकडे पाहत सावित्रीनें हात जोडले, त्याला नमस्कार केला आणि म्हणाली, 'नारायणा, आज काय रे होणार! नारदांनीं दिवस सांगितला पण वेळ सांगितली नाहीं." दिवस मावळूं लागला तसतशी तिला काळरात्र दिसूं लागली. दिवस मावळतांच तिनें व्रताचें उद्यापन केलें. सावित्रीचें व्रत पुरें झालें याबद्दल सगळ्यांना आनंद वाटूं लागला. तिचे सासूसासरे म्हणाले, "मुली, आतां नैवेद्य ग्रहण करून उपास सोड ना!" त्यावर सावित्री म्हणाली, "महाराज, या व्रताची पारणा सूर्यास्तानंतर करावयाची असते.' तिनें देवाला फुलें वाहून त्याची प्रार्थना केली आणि सासूसासऱ्यांना आणि इतर ऋषिमुनींना आणि ऋषिपत्न्यांना नमस्कार केलेन् आणि त्यांच्याकडून "अखंड सौभाग्यवती हो" असा आशिर्वाद मिळविला. असे नमस्कार ती रोज करीत होती आणि आशीर्वादहि मिळवीत होती. परंतु आज त्या आशीर्वादांनीं तिचें समाधान होत नव्हतें. तिला वाटे कीं, कोणाच्या तरी शब्दाला किंमत येऊं द्या. कोणाचा तरी आशीर्वाद फलद्रूप होऊं द्या आणि माझ्या सत्यवानाचें मरण टळूं द्या. तिला वाटे कीं, मोठ्यांचे आशीर्वाद खोटे कसे होतील? म्हणून ती ऋषींना पुन्हां पुन्हां नमस्कार करी आणि सांगे महाराज, पुन्हां आशीर्वाद द्या. ऋषि म्हणत सावित्री, तूं काळजी करूं नकोस. तुझें कधीं अकल्याण होणार नाहीं असें आमचा अंतरात्मा सांगतो आहे,

आणि तें कधींहि खोटें होणार नाहीं. सर्वांचे आशीर्वाद घेऊन सावित्री घरीं आली. ती सत्यवानाला एक क्षणहि सोडीना. ती टक लावून एकसारखी त्याच्याकडे बघूं लागली, तो कोणीकडे जरी गेला तरी त्याच्या मागें मागें जाऊं लागली. तें पाहून सत्यवान् म्हणाला, "सावित्री, आज तूं अशी एकसारखी माझ्याकडे पाहातेस कां? आणि अशी माझ्या मागें मागें कां फिरते आहेस? तूं आतां जेवून घे ना!" त्यावर सावित्री सांगते, "महाराज, माझ्या बाबांनीं असें सांगितलें आहे कीं, या व्रताचें पारणें सूर्यास्त झाल्यानंतर सोडावें म्हणजे सूर्यास्त झाल्यानंतर जेवावें; म्हणून सूर्यास्त झाल्यावर मी उपवास सोडणार आहे." सावित्री वर वर असें सुंदर बोलते आहे पण तिच्या मनांत एकसारखें कांहीं तरी खुटखुटतेंय पण त्यांतलें कांहीं बाहेर तर बोलतां येत नाहीं, अशी तिची मोठी चमत्कारिक परिस्थिति झाली.

रोजच्याप्रमाणें सत्यवान् हातांत परशु घेऊन फुलें-फळें, कंदमुळें आणि लांकडें आणण्यासाठीं आश्रमांतून बाहेर पडला. सावित्रीनें तें पाहतांच ती त्याच्याकडे धावली आणि तिनें त्याला अडवलें. आणि म्हणाली, "महाराज, आज आपण एकट्यानीं बाहेर जाऊं नये. मला बरोबर न्या. मी आज तुमच्याबरोबर आल्याशिवाय राहणार नाहीं." प्रथमतः सत्यवानाला वाटलें आज सावित्री जरा रंगांत येऊन विनोद करते आहे. पण ज्यावेळेस ती फारच हट्ट घेऊन बसली त्यावेळीं तो म्हणाला, "सावित्री, तुझी खरोखरच वनांत येण्याची इच्छा असेल तर वडिलांची व आईची परवानगी घे. शिवाय सावित्री, मी जो अरण्यांत जातो आहे तो कांहीं

विहारासाठीं, मृगयेसाठीं किंवा मजेसाठीं जात नसून नेहमींप्रमाणें लांकडें, फळें व फुलें आणावयास जातों आहे! अग, अरण्यांत हिंडण्यांत सौख्य आहे असें का तुला वाटतें? तिथें किती तरी हिंस्त्र पशु, कांटेकुटे वगैरे अनंत अडचणी असतात. तूं अजून अरण्य बघितलें नाहींस. सावित्री, वन म्हणजे कांहीं नजरबाग नव्हे! तुला तर सावलींतल्या आश्रमांतले कष्ट सहन होत नाहींत, मग वनांतले त्रास तूं कसे सहन करशील?"

सावित्री म्हणाली, "महाराज, आपण बरोबर असलांत म्हणजे मला कसलाहि त्रास होणार नाहीं, ग्लानि येणार नाहीं, अगदीं कांहीं कांहीं होणार नाहीं; आपल्याबरोबर अगदीं आनंदांत राहीन मी. तुम्ही यांवर कदाचित् असें म्हणाल कीं, कांहींतरी काळ वेळ बघावयाला पाहिजे का नको? तर महाराज, उत्साहापेक्षां आणखी सुंदर मुहुर्त कोणता असणार? 'उत्साह अंगिरा प्राह,' असें तुमचें ज्योतिषशास्त्र सांगतें ना? म्हणून महाराज, आज मला आपल्याबरोबर न्या. मी आज आपल्या बरोबर येणार, मी आज आपल्या बरोबर आल्याखेरीज राहणार नाहीं." सावित्रीची ती इच्छा आणि उत्सुकता पाहून सत्यवान् म्हणाला, "सावित्री तुला बरोबर घेऊन जावं आणि मजेंत फिरावं असं मलाहि वाटतं. पण बाबा काय म्हणतील? म्हणून प्रथम तूं त्यांची परवानगी मिळव. पण माझं नांव सांगूं नकोस. म्हणजे तुझंही कार्य साधेल व माझीही हौस भागेल. सावित्री, मी अजून स्वतंत्र नाहीं. आईबापांच्या ताब्यांत आहे. मी त्यांचा बंदा आहें. मी त्यांची सेवा

करतों आणि मला त्यांतच भूषण वाटतें. मतस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य या नांवाखालीं आपल्या म्हाताऱ्या आई-बापांची हेळसांड करणारा मी नाहीं. मातृमान् आणि पितृमान् मुलगा म्हणवून घेण्यांत मला आनंद आणि अभिमान वाटतो. म्हणून सावित्री, माझ्याबरोबर यावयाचें असेल तर तूं माझ्या आईबापांची परवानगी विचार आणि ते जा म्हणाले तर माझ्याबरोबर चल. पण परवानगी विचारतांना माझें नांव मात्र सांगूं नकोस अं ! मला पाठवा अशी विनंति कर." सत्यवानाच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच आणि त्याची ती आपल्या आईबापांवरील श्रद्धा आणि भक्ति पाहून तिला रडूं आलें. तिला वाटलें कीं, इतका चांगला नवरा--आणि मरणार ! आतां काय करूं असें तिला वाटलें.

सत्यवानानें सांगितल्याप्रमाणें सावित्री आपल्या सासऱ्याकडे परवानगी विचारण्यास गेली. तिनें प्रथम जाऊन नमस्कार केला, विनयानें खालीं बघत बाजूला उभी राहिली आणि हळूंच आजच्या दिवस यांच्याबरोबर जाऊं कां ? अशी परवानगी विचारली. सासऱ्यानें तिच्या सासूला विचारलें कीं, काय ग, जाऊं दे का हिला ? म्हणजे अनायासेच पुनः सासूची निराळी परवानगी विचारण्याची गरज राहिली नाहीं. सासू म्हणाली, जाऊं द्या. त्यावर सासरा म्हणाला, " पण काय ग सावित्री, तो जातो आहे म्हणूनच तूंही जाते आहेस ना ? मग त्यालाच आज जाऊं देत नाहीं म्हणजे झालें. मग तोहि जाणार नाहीं आणि तूंहि जाऊं नकोस ! " सावित्री त्यावर हंसत हंसत म्हणाली, " पण महाराज, संध्याकाळच्या पूजेला फुलें नाहींत आणि फळेंहि

आणावयास हवींत; तेव्हां त्यांनाहि जाऊं द्या आणि मलाहि आजच्या दिवस त्यांच्याबरोबर जाण्याची परवानगी द्या." ती पुढें म्हणाली, " मी जरा कंटाळलें आहे, जरा बाहेर जाऊन आलें तर तितकेंच बरें वाटेल, व मन प्रसन्न होईल. आजपर्यंत मी कधींही माहेरची आठवण काढली नाहीं अगर ह्यांच्याबरोबर जाऊं का असेंही विचारलें नाहीं. पण खरें सांगतें, आज मला जावेंसें वाटतें म्हणून विचारतें आहे कीं, जाऊं कां?" राजा म्हणाला, " सावित्री, तुझी जाण्याची इच्छाच दिसते तर तूं जा. पण हें बघ, लवकर परत या अं! आणि हें बघ, एकमेकांना सोडून कुठें फार लांब जाऊं नका अं! सत्यवानाला संभाळ. एकमेकांवर रागावूं नका, भांडूं नका बरं! ये बरं बाळ, आणि मघाशीं सांगितल्याप्रमाणें दोघेंहि जा पण लवकर दिवसाउजेडीं परत या अं!" सावित्रीनें परवानगी तर मिळविली. आतां ते वनांत जाऊन काय करतात ते आपण उद्यां पाहूं.

## प्रवचन ८ वें

असंभाव्य गोष्टही विनयानें-सेवेनें प्राप्त होऊं शकते. विनय आणि सेवा ह्या गोष्टी अशा आहेत कीं, त्यांच्या योगानें न बोलणारा ईश्वर, सेवा करणाऱ्या भक्ताशीं, बोलूं लागतो. दास्य म्हणजे सेवा, हें वशीकरणाचें फार उत्तम साधन आहे. साध्य गांठण्यासाठीं माणसानें साधनें उत्पन्न केलीं पाहिजेत. लोण्यासाठीं ताक घुसळण्याचे श्रम आपण नाहीं कां करीत? साध्य साधण्यासाठीं केव्हांहि श्रम केलेंच पाहिजेत. हें सर्वसामान्य तत्त्व आहे. वनांत जाण्यासाठीं आपल्या दोघांना परवानगी मिळेल असें सत्यवानाला वाटलें नाहीं. पण सावित्रीनें आपल्या सेवेनें त्यांना म्हणजे सासूसासऱ्यांना अगदीं आपलेसें करून घेतलें होतें. त्या दोघांच्या वनांत जाण्याला सासूची परवानगी नव्हती असें दिसतें. कारण सासरा सांगतो आहे कीं, तिला परवानगी दे. तिनें आपल्या विनयानें परवानगी मिळविली. ती यशस्विनी झाली. आणि अगदीं पहिल्याच प्रसंगाला यशस्वी झाल्यामुळें आतां पुढें होणारच होणार. ती तपस्विनी होती म्हणून यश तिला मिळालेंच पाहिजे. डॉक्टर चांगला असेल पण म्हणे हाताला यश नाहीं तर काय उपयोग? विद्वान् भीक मागतो आणि मूर्ख लक्षाधीश आहे–भाग्यवान् आहे हे अपवाद मानले तरी सर्वसाधारण नियम असा कीं, प्रयत्न करणाराला यश मिळालें पाहिजे. सुभद्रा गर्भार असतांना तिनें कुंतीला नमस्कार केला. तेव्हां कुंती म्हणाली, "मुली काय आशीर्वाद देऊं, याचा विचार करतें आहे. पुत्रवान् हो, असें म्हणावे, तर ते मुलगे असें वागतात कीं, असलें पुत्र झाले नसते तरी बरें

असें वाटतें. म्हणून सुभद्रे, सर्वसाधारण असा आशीर्वाद देतें कीं, भाग्यवान्, मातृमान् आणि पितृमान् अशा सुंदर मुलाला जन्म दे. माझीं मुलें सुंदर आहेत, विद्वान् आहेत पण भीक मागतात आणि भिक्षेसाठीं भांडतात. तेव्हां काय सांगूं ? आतां 'भाग्यवंतंप्रसूयेथा मा शूरं माच पंडितम्। तुला होणारा मुलगा भाग्यवान् होऊं दे, यांत सर्व आलें. जास्त चिकित्सा करावयाला गेला माणूस कीं, फसलाच. लग्न होईल कीं नाहीं अशी चिकित्सा करीत बसलें कीं फसलेंच. म्हणे नवरी दीड इंच जास्त उंच आहे ! असें करतां करतां तिचें लग्न होऊन जातें आणि हा तसाच राहतो ब्रह्मचारी ! भाग्य हें जन्मांतरीचें पुण्य आहे. आमची सावित्री भाग्यवान् आहे म्हणून यशस्विनीहि आहे. राजकन्या आहे; पण वनवासी झाली आहे. तिच्या पतीचा आज मरण्याचा दिवस आहे. तिला वनांत जाण्याची परवानगी मिळाली आहे पण "विदूयता हृदयेन हसन्तीव । याठिकाणीं दुःखी हृदय हें कारुण्य-द्योतक आहे तर हसन्ति हें शृंगार द्योतक आहे. सत्यवान् आणि सावित्री हें तरुण जोडपें वनांत जात आहे आणि करुण आणि शृंगार अशा दोन रसांची रेस त्यांच्यामध्यें चालू आहे. शृंगार रसांत उल्हास आहे तर करुण रसांत ग्लानि आहे. बायकोबरोबर जाणें, फिरावयाला रानांत जाणें हें चांगलें आहे कीं वाईट आहे हें कळणें, निदान आजकाल तरी कळणें कठीण आहे– सत्यवानाच्या हृदयांत शृंगाररस आहे तर सावित्रीच्या मनांत करुणरस आहे. सावित्री ही दुःखी आहे हें सत्यवानाला कळत नाहीं आणि तीहि पण आपल्या पतीबरोबर मारून मुटकून हांसत हांसत चालली आहे.

एकाच शरिरावर शृंगार आणि करुण या दोन रसांची चढाओढ चालली आहे. तो तिला जंगलाची माहिती देऊं लागला. अरण्य दाखवीत दाखवीत चालला आहे आणि तो सांगतो आहे,-" हा आम्रवृक्ष, हा मोर, हा कोकीळ, ही नदी पहा कशी झुळझुळ वाहाते आहे! ही वेली पहा कशी त्या वृक्षाला चिकटली आहे." सावित्री सांगते आहे कीं, महाराज अगदीं बिलगून वर चालली आहे आणि हा वृक्ष हलतो आहे. म्हणजे तिला दूर हो म्हणून सांगतो आहे. पण महाराज, ती दूर सरत नाहीं, उलट वाऱ्यामुळें अगदीं बिलगून चालली आहे; दूर सरतच नाहीं. अगदीं गोठ्यांत बांधलेली गाय जशी बाहेर आल्यावर बुजते तशी वर्षभर आश्रमांत राहून भिडस्त बनलेली सावित्री आज आपल्या नवऱ्याशीं मोकळेपणानें बोलतांना लाजते आहे. सत्यवान् तिला वनशोभा आणि त्यांतले पशुपक्षी दाखवितो आहे तर ती त्याला पायांपासून डोक्यापर्यंत न्याहाळून घेते आहे. तो म्हणतो आहे कीं, तूं मला पाहाते आहेस कां ही वनश्री पहाते आहेस? पण या प्रश्नाकडे तिचें लक्ष नाहीं. कारण नारदांचें शब्द मनांत आहेत कीं, 'एक वर्षानें हा मरणार आहे;' ते शब्द खोटे होणार नाहींत. म्हणून सत्यवान् जरा बसला कीं, सावित्री लगेच विचारी कीं, महाराज, कां बसलांत? पतीच्या मागोमाग चालली आहे आणि हळहळ जाते आहे. मनांत कल्पना येऊन हृदय फाटतें आहे. सत्यवान् म्हणाला, "सावित्री, आतां आपण फुलें, फळें आणि इंधन काढूं अं!" सावित्री म्हणाली, "महाराज, मी काढतें, आपण बसा." सत्यवान् म्हणाला, "अं हं! तें नाहीं

चालणार ! तूं नुसती बोलत बैस माझ्याजवळ." असें म्हणून त्यानें तिला जवळ ओढून बसविली तेथें; आणि तो फळें काढूं लागला. फळानें एक तुंबा भरला आणि म्हणाला एक काम झालें. पुरुष स्वयंपाक करूं लागले आणि भात खालीं उतरला म्हणजे म्हणतात एक काम झालें. तसें तो म्हणाला, एक काम झालें. मग तो बोलत बोलत फुलें काढूं लागला. परडी भरलीन् आणि म्हणाला, "दोन कामें झालीं!" मग त्यानें हातांत परशु घेतलान् आणि लांकडें तोडण्यास आरंभ केलान्. कांहीं लांकडें तोडलीन् आणि घाम पुसूं लागला. जरा वेळानें त्याचें डोकें दुखूं लागलें आणि हातांतील परशु पडला. तें पाहून सावित्री धांवत धांवत आली. तिला पाहून सत्यवान् म्हणाला कीं, "सावित्री, मला फार श्रम झाले म्हणून परशु हातांतून निसटला आणि डोकें दुखूं लागलें. घाबरूं नकोस. माझ्या सगळ्या अंगाला कंप सुटला आहे आणि श्रमानें जीव गुदमरल्यासारखा वाटतो आहे. आणि शूळ मारल्यासारखें डोकें दुखतें आहे. यासाठीं सावित्री, तूं अशी अगदीं जवळ बैस. तुझ्या मांडी-वर डोकें ठेवून मी जरा पडतों. म्हणजे मला बरें वाटेल. मी लवकर उठलों नाहीं आणि थोडी झोंप लागली तर मला उठव. नाहींतर आपल्याला घरीं जाण्याला उशीर होईल, आणि आईबाबा वाट पाहात बसतील." सावित्रीनें त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतल्याबरोबर त्यानें डोळें फिरविलेन्. सावित्रीला नारदांचें बोलणें आठवलें. हा दिवस, ही जागा, ही वेळ, आणि ज्या काळाला भीत होतें तो काळ आला

असें तिला वाटलें. सत्यवानाचे हातपाय गार झाले आहेत, ती त्याच्या अंगावरून हात फिरवीत कांहीं विचार करते आहे इतक्यांत मागें वळून पहाते तों एक दिव्य पुरुष मागें उभा असलेला तिला दिसला. लाल कपडे नेसलेला, धिप्पाड आणि दिव्य पुरुष, डोक्यावर जटा आणि सोन्याचा रत्नमय किरीट आहे, फेंट ब्ल्यू निळसर अशी अंगकांति आहे, लाल डोळे आणि हातांत पाश घेतलेले आहेत आणि गंभीर वृत्तीनें सत्यवानाकडे पाहात असलेला असा दिव्य पुरुष तिला दिसला. सावित्रीनें ताबडतोब त्याला नमस्कार केलान् आणि मनांत म्हणाली कीं—हा देव असला पाहिजे कारण दिव्य कांति आणि पाय जमिनीला लागलेले नाहींत. पूर्वींच्या कांहीं कल्पना फार सुंदर असत. किती गोड कल्पना कीं देव पाऊस पाडतो ! पण आतां तें नाहीं, आतां आलें शास्त्रीय ज्ञान. छोटी शकू सांगतें कीं, बाई म्हणतात कीं, उन्हानें पाण्याची वाफ होते, वाफेचे ढग बनतात; आणि वाऱ्याच्या योगानें त्या ढगांचें पाणी होऊन पावसाच्या रूपानें तें पुनः पृथ्वीवर पडतें. मी म्हणतो एकादे वेळीं हें असेल खरें. पण समजा, कीं, पाऊस नाहीं पडला तर ही बाई पाण्याची वाफ करून जरुर असलेला पाऊस पाडूं शकेल काय ? मग देव पाऊस पाडतो आणि एकादे वेळीं पाऊस नाहीं पडला तर आपण त्याचीच म्हणजे देवाचीच प्रार्थना करावी ही कल्पना वाईट आहे काय ? तसें सावित्रीला वाटलें कीं, हा देव आहे आणि तिनें त्याला नमस्कार केलान् आणि हेंच तिला उपयोगी पडलें. ती त्या आकृतीपुढें हात जोडून उभी राहिली आणि म्हणाली, “ महाराज, आपण देव आहांत असें वाटतें. ही

आपली मानवी कन्या आपल्याला नमस्कार करते आहे." असें म्हणून तिनें त्या आकृतीला नमस्कार केलान् आणि विचारलेंन्, "आपण कोण ? कां आलांत ? हें सांगण्याची आपली इच्छा असल्यास सांगावें, अशी आपल्या या मुलीची विनंती आहे, आग्रह नाहीं." ती आकृति म्हणाली, "होय सावित्री, तुझा तर्क बरोबर आहे. मी देव आहे आणि कोणाशीं बोलत नाहीं पण तूं पतिव्रता आहेस म्हणूनच तुझ्याशीं बोलतों आहे. मी यम आहे." त्यावर सावित्री विचारते, "मग येथें कशाला आलांत ?" यम सांगतो, "हा सत्यवान्–तुझा पति–याला नेण्याकरितां आलों आहे, याचें आयुष्य संपलें आहे. मी याला बांधून नेणार आहे." एका गोष्टीचा निवाडा झाला, कीं, आलेला पुरुष यम आहे. सावित्री पुढें विचारते, कीं, 'महाराज, पण मग एवढ्या-साठीं आपण स्वतः कां आलांत ? महाराज, आपले दूत येत असतात अशा प्रसंगीं. मग स्वतः कां आलांत ?" यमाच्या लक्षांत राहिलें नाहीं कीं आपण कोणत्या कामगिरीवर आलों आहोंत आणि त्यानें सहज सांगितलें कीं, सावित्री "तुझा पति सत्यवान् धर्मवान् आहे, पुण्यवान् आहे. अशा वेळीं हें काम माझे दूत नाहीं करूं शकणार !" श्रीरामचंद्रानीं बिभीषणाला आणण्यासाठीं वानरेंद्र सुग्रीव पाठविला. साधा वानर नाहीं पाठविला तर वानरेंद्र पाठविला. तोडीचा माणूस पाहिजे. राम म्हणाले, सुग्रीवा, तुलाच गेलें पाहिजे, योग्यतेप्रमाणें क्रिया पाहिजे. राजा मेला तर चंदन आणि तूप यांत जाळतात. कारण श्रेष्ठत्व आहे. यमानें हा शिष्टाचार पाळला. तो म्हणाला, "सावित्री तुझा पति फार

मोठा माणूस आहे. म्हणून त्याला नेण्यासाठीं मी स्वतः आलों आहे." दुसरी कबुली घेतलीन् कीं, तुझा नवरा फार मोठा माणूस आहे असें म्हणून यमानें सत्यवानाच्या गळ्याभोंवतीं पाश टाकले आणि त्याचें सूक्ष्म म्हणजे लिंग शरीर बाहेर काढलें. तें बाहेर काढतां बरोबर सत्यवानाचा तो मोठा स्थूलदेह प्रेत झाला. हें दिसण्यासाठीं दिव्य दृष्टि लागते. देहांतून जीवात्म्याला बाहेर काढून यम त्याला घेऊन जाऊं लागला. मग तें स्थूल शरीर प्रेत झालें. लांकूड झालें. यमाच्या हातांत तो सत्यवानाचा लिंगदेह दिसतो आहे. तो लोकांच्या दृष्टीला दिसत नाहीं. पण आपल्या सावित्रीला दिसतो आहे, कारण ती पुण्यवान् आहे. यम आपल्या पतीला घेऊन जातो आहे, हें पाहून तें स्थूल देहाचें प्रेत तसेंच तेथें ठेवून सावित्री चालली यमाच्या मागें. ती तपस्विनी होती. यम थोडासा दूर गेल्यानंतर मागें वळून पाहातो तों सावित्री आपल्यामागें येत आहे असें त्यानें पाहिलें. यमाच्या मागें त्याच्याबरोबर जिवंत माणूस चाललें आहे असा हा पहिलाच प्रसंग! किती चमत्कारिक आणि सुंदर दृश्य!! तिला पाहून यम म्हणतो, "सावित्री, कोठें चाललीस? फीर माघारीं आणि याचें क्रियाकर्मांतर कर, म्हणजे याच्या ऋणांतून तूं मुक्त होशील. म्हणून सावित्री, मागें फिर." सावित्री— "महाराज, कोठें जाऊं मी आतां? आणि काय करूं म्हणतां? कीं मी आपल्या पतीची क्रिया करूं? आणि त्याच्या ऋणांतून मुक्त होऊं? पण महाराज, हें आपण असें कसें सांगतां! कारण मी आपला

पति तुमच्याजवळ जिवंत पाहात असतांना क्रिया कसली करूं ? शिवाय महाराज, पतिव्रता पतीच्या ऋणांतून कधीं तरी मुक्त होते काय ? म्हणून महाराज, जिकडे माझा पति तिकडे मी जाणार. मला बाबांनीं असें सांगितलें आहे कीं, सावित्री, आतां जिकडे तुझा पति तिकडे तूं अं ! म्हणून महाराज, आपण त्याला नेत आहांत तिकडेच मीहि येणार यांत माझ्या हातून चूक तर नाहींना होत ?"

यम म्हणाला 'सावित्री, त्याचें प्रारब्धकर्म संपलें. आतां मी नेईन तिकडे त्यानें आलेंच पाहिजे. कारण असा सनातन धर्म आहे.' त्यावर सावित्री— होय महाराज, तें मला माहीत आहे. महाराज, मी तपश्चर्या केली आहे. गुरुभक्ति केली आहे आणि देह झिजवून देवाची आणि वडील माणसांची सेवा केली आहे आणि त्यांचें आशीर्वाद घेतले आहेत. शिवाय अगदीं कडकडीत रीतीनें त्रिरात्रीचें सावित्री देवीचें व्रत केलें आहे. हें जर खरें असेल तर मी आपल्या पतीच्या मागें जाणार. इतकें बोलून शेवटीं एक सुंदर वाक्य बोलली, म्हणाली, महाराज, आपल्या कृपाप्रसादानें मी चाललें आहे म्हणून माझी वाट कोणीही रोकूं शकणार नाहीं महाराज, माझा पति आपल्या ताब्यांत आहे त्या निमित्तानें तरी आपली संगति घडते आहे. पण महाराज मी असें ऐकलें आहे कीं यमलोक फार लांब आहे, म्हणून महाराज, वाट चालतां चालतां आपल्याशी दोन शब्द बोलूं कां ? एक दोन प्रश्न आपल्याला विचारूं कां ? आतां मी आपली मित्र (मैत्रिण) झालें आहे. हें ऐकून यम आश्चर्यचकित झाला.

यम म्हणतो, सावित्री, आपली मैत्री कशी ?

सावित्री— महाराज, मोठ्यांच्या बरोबर सात पावलें चाललें तर त्यांच्याशीं मैत्री होते ना ?

लग्नांत तरी सप्तपदी करतात म्हणजे काय ? तर, दोघांना म्हणजे वधू-वरांना सात पावलें बरोबर चालावयास सांगतात. मग वधूला एका दगडावर उभी करतात आणि वर तिला सांगतो कीं, हे मैत्रिणी, या दगडाप्रमाणें अचल अशी माझ्या घरीं गृहलक्ष्मी होऊन राहा. स्त्री ही संसारमित्र आहे म्हणून सावित्री यमाला सांगते कीं, महाराज, आपण मित्र आहांत आणि मित्राला वाटेल तें विचारतां येतें. म्हणून एक दोन प्रश्न विचारूं का ? तें ऐकून यमराज म्हणाले— सावित्री, तुला काय विचारावयाचें आहे तें खुशाल विचार.

सावित्री म्हणाली—पण महाराज, माझा म्हातारा पुराणिक आतां दमला आहे म्हणून त्याला विचारून मला काय विचारावयाचें आहे तें उद्यां विचारीन.

# प्रवचन ९ वें

यमधर्माबरोबर सावित्री जाते आहे. तिनें एकच परवानगी यमधर्मापासून मोठ्या खुबीनें मिळविली होती कीं, महाराज, कांहीं प्रश्न विचारूं कां ? कार्य जर करून घ्यावयाचें असेल तर कांहीं श्रम केलेच पाहिजेत. थोडी पड घेतलीच पाहिजे. सावित्री कशी बोलते आहे तें पाहा. गोड गोड बोलून कार्य कसें करून घ्यावें हें इंग्रजांपासून शिकावें. तसेंच यमधर्मापाशीं गोड गोड बोलून सावित्रीनें काय साधलें ? तर, त्याच्या हातून आपल्या पतीची मुक्तता. तिनें यमधर्मापासून आपला पति कसा परत मिळविला तें आपण पाहूं.

यम म्हणतो—"सावित्री, तूं इतक्या लांब कशी येशील ?"

सावित्री म्हणाली—महाराज, धर्माचें आणि नीतीचें वाहन असल्यावर प्रवासाच्या लांबीचा प्रश्नच काय ? मी, घरीं तरी जाऊन रडतच बसणार ना ? त्यापेक्षां महाराज, आपली सत्संगति घडेल तेवढीच. मग—

यमधर्म म्हणाला, ठीक आहे सावित्री, तुला काय विचारावयाचें असेल तें विचार.

मनुष्याच्या योग्यतेनुरूप प्रश्न विचारले पाहिजेत नाहींतर मला विचारतात कीं, कां हो शास्त्रीबुवा, आज सिनेमा कोणता आहे ? मंगळागौर कां हरतालिका ? असो पुस्तकांतून वाचण्यापेक्षां प्रत्यक्ष मोठ्या माणसाच्या तोंडून ऐकणें जास्त श्रेयस्कर.

सावित्री म्हणाली, " महाराज, आपण फलदाते आहांत, तेव्हां आपल्याशींच चार्चा करावी असें वाटतें. आपल्याला

कांहीं विचारावेसें वाटते." यम म्हणाला, "सावित्री, विचार, तुला काय विचारावयाचें असेल तें विचारून घे. यावर सावित्री विचारते, "महाराज, मनुष्याचें ध्येय काय ? महाराज, मी आपल्याला फार त्रास देणार नाहीं. माझा प्रश्न ठीक असेल तर नुसतें तर हो म्हणा, नाहींतर एकाच शब्दांत सांगा कीं, तसें नाहीं."

खाणें-पिणें, निद्रा हें पशूंमध्येंही आहे. जो अन्यत्र नाहीं, असा एक विवेक येथें म्हणजे मनुष्य जन्मांत आहे, म्हणून मनुष्याला मोठेपणा आहे. आपल्या जन्माचें ध्येय ब्रह्मदेवानेंच ठरविलें आहे. त्यांत कधीं कधीं भ्रम होतात. हे भ्रम दोन प्रकारचे आहेत. संवादीभ्रम आणि विसंवादीभ्रम. चांदी वाटून चांदी मिळाली (सांपडली) तर संवादीभ्रम, आणि चांदी वाटून टिन सांपडलें तर विसंवादीभ्रम. मिळून दोन्ही भ्रमच आहेत हें लक्षांत ठेवा. नवस जे पूर्ण होतात त्याला संवादीभ्रम असें म्हणतात, नवस पुरा होणें हा कष्टसाध्य चान्स आहे. छातीठोकपणें कांहीं सांगतां येत नाहीं. मनुष्याचा उद्देश ज्याठिकाणीं सफळ होतो म्हणजे नवस पुरा होतो, तो संवादीभ्रम. या भ्रमांतून मनुष्य कधींहि बाहेर पडत नाहीं. प्रथम म्हणतो, मॅट्रिक तर होऊं दे. मग मॅट्रिक पास झाला, आतां काय ? ततःकिम् ? मग म्हणतो जाऊं दे कॉलेजांत पुढें बी. ए. झाला. पुनः ततःकिम् ? हा झगडा सुटत नाहीं. असो, ज्यांनीं हा साडेतीन हातांचा मानवी देह उत्पन्न केला, त्यानेंच त्याचें ध्येय ठरविलं आहे. आणि त्या उद्देशाप्रमाणें त्यानें शिदोरीही बांधून दिली आहे. ब्रह्मदेवानें सगळी सृष्टी उत्पन्न केली.

पण त्याला संतोष नाहीं झाला. म्हणून त्यानें मनुष्ययोनि निर्माण केली. गाईची पूजा केल्यानें तुम्ही स्वर्गाला जाल, पण गाय पशूच राहील. परोपकार हे थोतांड आहे. आत्मोद्धाराकरितां आलेला हा जीव पुनः आपल्या स्वरूपांत मिळावा हाच मनुष्यजन्माचा खरा उद्देश, दुसरें काय? बावनकशी तुकड्यांतून पडलेला हा तुकडा पुन्हां त्यांत मिळवावयाचा आहे. त्यासाठीं कामक्रोधादिक विकारांनीं मळलेला हा तुकडा विवेकाच्या भट्टींत जाळून त्यावरचा मळ दूर करून पुन्हां शुद्ध सोन्यांत तो मिळविणें म्हणजेच जीव आणि शिव यांचें ऐक्य करणें हें मनुष्यप्राण्याचें आद्य कर्तव्य आहे. शंकराच्या देवळांत शिरलेल्या शेळीनें त्याला म्हणजे शंकराला लक्ष प्रदक्षणा केल्या तरी तिला त्याचें पुण्य नाहीं. आणि शंकराच्या डोक्यावरचा बेल खाल्ला तरी तिला त्याचें पाप नाहीं, तेलकट भांडें स्वच्छ करण्यासाठीं चोथा आणि विटकर यांची जरूरी आहे. पण जें भांडें स्वभावतःच स्वच्छ आहे त्याला विटकर नको असून नुसता हात फिरविल्याबरोबर तें स्वच्छ होणारे आहे. तसें या मनुष्य-देहांत बुद्धि आहे आणि म्हणून विचारप्राधान्य असा हा देह आहे. ब्रेन हा मनुष्यप्राण्यांत परिपूर्ण आहे तर इतर प्राण्यांत तो अपुरा आहे. मग हा मनुष्य देह कशाकरितां दिला? तर यानें आत्मस्वरूपांत जाऊन पुनः मिळावें हा उद्देश. म्हणून या जन्मांत माझा उद्धार कशानें होईल हा विचार केला पाहिजे. आणि तो बरोबर आहे अगर नाहीं तें पाहिलें पाहिजे. म्हणजे आत्मविचार करणें हें मनुष्याचें पहिले कर्तव्य आहे.

राजाला वैद्यानें औषध दिलें तर राजदूतांसमक्ष प्रथम वैद्यानें तें थोडें चाटून पाहावें लागतें. कारण कदाचित् पॉयझन असले तर? एका वैद्यानें—तो राजवैद्य होता—आपल्या बटव्यांतील सर्व औषधें टाकून म्हणजे उगाळून राजासाठीं एक औषध तयार केलें. निम्में राजाला दिलें आणि निम्में आपण घेतलें, इकडे राजेसाहेबांना जुलाब होऊं लागले तेव्हां वैद्यबुवांना बोलावण्यासाठीं राजदूत आले. म्हणाले, राजेसाहेब घाबरले आहेत, मरताहेत, तर लवकर चला. हा म्हणाला, अरे, मी कुठें जगतों आहे? मी ही मरतोंच आहे. तेव्हां मी कांहीं आतां येत नाहीं. आत्मरक्षण प्रथम व नंतर परोपकार.

आपल्या सोंवळ्याओंवळ्याला नांवें ठेवतात. पण डॉक्टर किती सोवळें करतात! त्यांचा ऑपरेशनच्या वेळचा पोषाख पहा! हें सर्व रोगासाठीं नसून आत्मसंरक्षणासाठीं आहे. आत्मनाश करून घेऊन परोपकार करणें हें सृष्टिकर्त्याला मान्य नाहीं. ब्राह्मण असेल आणि संध्या न करतां गोसेवा करीत असेल तर धार्मिकदृष्ट्या ती मान्य नाहीं. प्रथम आत्मकल्याण मग परोपकार! तुकाराममहाराज म्हणतात— 'तुका म्हणे आतां उरलों उपकारापुरता' आतां म्हणजे आपलें काम साधून घेतल्यानंतर–मग राहिलों उपकारापुरता. तसें अगोदर आत्मज्ञान, मग परोपकार. धार्मिक आत्मनाश उपयोगाचा नाहीं. आत्महित साधून घेण्याचें एकादें मॉडेल तयार करून घेतलें पाहिजे. तें मॉडेल म्हणजे मनुष्य देह आहे. गाय आहे, ठीक आहे. दूध देईल आणि तिची सेवा केलीत तर तुम्हांला पुण्य लागेल. तिला काय त्याचें? त्याचें

तिला आत्मज्ञान नाहीं. घोडा आहे, कावाडकष्टी आहे. राजलक्ष्मी आहे. पण त्या योनींत आत्मज्ञान नाहीं. मनुष्य देह हाच एक असा देह आहे कीं, त्यांत नराचा नारायण बनवा नाहींतर वानर बनवा, देव बनवा नाहींतर कुत्रा बनवा यांत सर्व कांहीं आहे. हें असें सुंदर स्टेशन आहे कीं, येथून ब्रह्माचें अवलोकन करण्याची बुद्धि या देहांत आहे. नरांनीं विचार केला तर त्याचा नारायण होईल नाहींतर वानर होऊन जाईल. नर किंवा वानर. एक रुळाचा सांधा चुकला कीं ॲक्सिडेंट ठेविलेलाच आहे. असो! सावित्री म्हणते, 'महाराज, या मनुष्य देहाचा उद्देश आत्मप्राप्ति एवढाच ना?' यम म्हणाला, 'हो'.

जसा एकादा बॅरिस्टर आपल्या भाषणानें जज्ञाला मारून टाकतो तसें आपल्या प्रश्न विचारण्याच्या शैलीनें आणि भाषणानें सावित्रीनें यमधर्माला मारून टाकलें होतें. तत्त्व-ज्ञानानें आत्मप्राप्ति करून घेणें हाच स्वधर्म आहे. हिंदूंनीं हिंदु राहाणें हें स्वराज्य आहे. स्व न बिघडवितांना जें राज्य मिळविणें त्याचें नांव स्वराज्य. स्वधर्म याचा अर्थ स्वचा धर्म. जीवात्म्याचें राज्य म्हणजे अप्रातिहत राज्य करणें. याचें नांव ब्रह्मस्वरूप होणें. तसें ज्ञान झालेली मंडळी म्हणतात, आम्ही ब्रह्मीयाचे बाप!

सावित्री विचारते—" महाराज, ही विचारसरणी बरोबर आहेना?"

यमधर्म सांगतात—होय.

सावित्री—आत्मस्वरूप विज्ञानानेंच प्राप्त होतें ना? आणि तसें असेल तर मग त्याच्या पायऱ्या असतील?

यमधर्म म्हणतात—होय.

सावित्री विचारते—महाराज, माडीवर जावयाचें तर वर जातांना जे अडथळे असतील ते दूर करून पायऱ्या चढूनच गेलें पाहिजे ना? म्हणजेच महाराज, विषयांची समजूत घालीत वर जाणें हेंच मार्गानें जाणें होय ना? ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास हे चार आश्रम म्हणजेच चार पायऱ्या ना?

यमधर्म म्हणतात—होय.

सावित्री विचारते–ब्रह्मचर्याश्रम म्हणजे विद्याभ्यास आणि ब्रह्मचर्याश्रमांत विद्याभ्यास करून जो निदिध्यास केला त्याचें आचरण करण्याचें ठिकाण म्हणजे गृहस्थाश्रम, बायको बोलल्यानंतर राग येतो कीं नाहीं? हें पहावें अशा प्रसंगांनीं वृत्ति थोडी शांत होते. म्हणजेच वृत्तींना संयम शिकविण्याची जागा म्हणजेही गृहस्थाश्रम. मग वानप्रस्थाश्रम. तेथें फक्त बायकोच जवळ असते त्यावेळीं आपण किती विषयत्याग केला आहे हें कळतें. मग संन्यासाश्रम. त्या आश्रमांत, अहं ब्रह्मास्मि असा विचार करतां करतां तसें होऊन जाणें. हो, संयमी आहे त्यालाच आत्मप्राप्ति होते. मन आणि इंद्रियें ज्याच्या ताब्यांत आहेत तो आत्मवान् आणि तोच आत्मज्ञान करून घेऊं शकतो. अरे, चोवीस तास भटका पण निदान एक तास तरी आत्मज्ञानप्राप्तीसाठीं प्रयत्न करा. शरिराला जितकें नाजूक कराल तितकें तें नाजूक होईल, त्याला थोडेसें कणखर बनविलेंच पाहिजे. व्यावहारिक कार्यांत म्हणजे व्यवहारांत देखील हा संयम पाहिजे. अनात्मवान् जे आहेत त्यांना आत्मज्ञान होणें शक्य नाहीं.

वनामध्यें राहाणारे ते वानप्रस्थ. पण निव्वळ वनामध्यें राहण्यानें कांहीं आत्मज्ञान होत नाहीं. होय ना महाराज ?

यम म्हणतात—होय.

कारण आश्रमाचा 'बंगला' बनतो पुनः जडभरतानें सगळें म्हणजे आप्तेष्ट राज्य वगैरे सोडलें. आणि हरिण पाळलें त्यावर माया बसली. त्याचें म्हणजे जडभरताचें दुर्दैव ! तें हरीण पाण्यांतून वाहात आलें. याला दया आली. ती खोटी ठरली. तिनें म्हणजे त्या दयेनें त्याचा स्वतःचा घात केला. म्हणून तुकाराम-महाराज सांगतात कीं, 'दया, क्षमा, शांति,' या जर पांडुरंगाच्या आड येत असतील तर त्या मला नकोत. तसं तें हरणाचें पोर याच्यापुढें वाहात आलें. त्यानें तें वर आणलेन्, छाटीनें पुसलेन्, इतकेंच करून सोडून द्यावयास पाहिजे होतें. पण हा त्याला दूध पाजूं लागला. त्याला दूर्वा घालूं लागला. मोहांत सांपडला आणि फसला. त्याच्या नादांत स्नानसंध्या तुटली. आसपासच्या लोकांनीं सावध केला, तेव्हां म्हणाला, शरणागताचें रक्षण करणें हा धर्म आहे. उपदेश करणें सुलभ आहे पण त्याप्रमाणें वागणें कठीण आहे. शिवाय, जग तुम्हांला नीट वागूं देणार नाहीं. शिवाल म्हणून सांगितलें तर म्हणतो शिवलों तर बोला. बरं शिवल्यावर बोललें तर म्हणतो, शिवलो आतां काय ? बोलून तें थोडेंच परत येणार आहे ? याला आत्मबचाव म्हणतात. आणि व्यवहारासाठीं असें करावें लागतें. कृष्ण ज्यावेळीं शिष्टाईला गेले त्यावेळीं विदुर म्हणाला कृष्ण, तुझा अपमान होईल" तेव्हां कृष्ण म्हणाला, पण विदुरा, आत्मबचावासाठीं मला हें सर्व केलें पाहिजे.

लोकांनीं मला नांवें ठेवूं नयेत, दोष देऊं नये हा उद्देश आहे.

असो. आपली जडभरताची गोष्ट चालू आहे. होतां होतां त्या हरणामुळें जडभरताचा इतका अधःपात झाला कीं, तो बेभान झाला. म्हणजे मी कोण? राज्य सोडून अरण्यांत कशाला आलों व काय करतों आहे? याचीही त्याला शुद्ध राहिली नाहीं. मोठा झाल्यावर एक दिवस तो हरीण हरिणीच्या मागें लागून जातींत पळाला आणि जडभरत त्याची वाट पहात बसला. अरे! पशु आहे तो. जाईना! आपल्या जातींत गेला तर बिघडलें कोठें? पण प्रत्येकाला विचारी कीं, अहो, माझा हरीण पाहिलांत कां कोठें? अरे, तो गेला हरिणीच्या मागें. तर म्हणे तो आतां सहवधु पायां पडावयास येईल. अरे! हरिणी मिळाल्यानंतर तो परत येईल कां? पण इतकेंही न समजून हरिण हरिण म्हणतां म्हणतां पुढल्याजन्मीं स्वतःच हरिण झाला. मग कळलें कीं, सगळें फुकट आहे. यावर सावित्री म्हणते कीं, ब्रह्मचर्याश्रमांत ज्ञान होणार नाहीं. ज्ञान होण्यासाठीं माती तुडविली पाहिजे म्हणजे कष्ट केले पाहिजेत. आणि त्यासाठीं गृहस्थाश्रम पाहिजे. टाकी लावल्याशिवाय दगड तयार होत नाहीं आणि त्याला देवपण येत नाहीं. तसें नुसतें वनांत राहाणाऱ्यांनाही ब्रह्मज्ञान होत नाहीं. ब्रह्मज्ञानाची भूमिका तयार होण्याचें स्थान म्हणजे गृहस्थाश्रम, होय ना महाराज!

यमधर्म म्हणाले, 'हो.' सावित्री म्हणाली, महाराज, मी हा गृहस्थाश्रम पसंत केला आहे. धर्माचरण करण्यासाठीं ही गोष्ट ठीक आहे कां?" यमधर्म म्हणतात—होय.

सावित्री किती सुंदर मांडणी मांडली आहेस ? सावित्री विचारतें कीं, "महाराज, यांत चूक नाहींना ?" यमधर्म सांगतो, "सावित्री, यांत बिलकूल चूक नाहीं. किती गोड बोलतेस ? मी फार खुष आहे. तुझ्या बोलण्यांत विनय किती ! उच्चार किती सुंदर ! आणि भाषा शास्त्रीय ! सावित्री, मी फार खूष आहे. काय देऊं सांग ? वर माग ! पण एक अट कीं, सत्यवानाशिवाय काय वाटेल तें माग.

सावित्री म्हणाली, "महाराज, तुम्हांला काय द्यावयाचें तें द्या. पण तेंच कसें मागावें याचा विचार करून उद्यां मागेन."

## प्रवचन १० वें

यमधर्म आणि सावित्री यांचा संवाद चालू आहे आणि सावित्रीचा विनय, तिची ती साधी पण शास्त्रीय भाषा आणि मुद्देसूद मांडणी यावर खूष होऊन यम तिला वर देतो आहे. दोन सच्छील व्यक्ति एके ठिकाणीं आल्यानंतर कसे सुकर व्यवहार होतात हें या दोघांच्या संभाषणावरून आपल्याला समजेल. आत्मज्ञान प्राप्तीच्या साधनांचा अभ्यास करणें आणि त्यासाठीं शरिराला आणि मनाला योग्य वळण लावणें यासाठींच गृहस्थाश्रम आहे, होय ना महाराज? असें यमाला विचारून सावित्री त्याच्याकडून कबुलीजबाब घेते आहे, नव्हे, ती गोष्ट यमाला कबूल करावी लागली. अशा तऱ्हेनें यमाचे सगळे कबुलीजबाब घेऊन मग तिला जें काय विचारावयाचें आहे तें ती त्याला जज्‌मेंटमध्यें सांगणार आहे. नाहींतर आपल्या सरकारची रीत अशी कीं, आपण धर्माचे नियंते, लोकांनीं धर्मानें वागावें असें सांगणारे, असे जाहीरनामे काढणारे, पण भाषा कायदेशीर आणि फसवेगिरीची. लोकांनीं धर्मानें वागावें असा जाहीरनामा काढावा आणि कोणी अधर्मानें वागल्यास त्याला प्रतिकार नसावा अशी त्याची रचना आहे. जेवल्याबरोबर धांवत जाणें हें चूक आहे, त्यानें मरण येतें असें वैद्यशास्त्र सांगतें. हें सरकारलाहि मान्य आहे. पण सरकारी दप्तरांची व्यवस्था अशी—वेळ अशी— कीं, माणसाला एकदांहि वेळेवर अन्न मिळूं नये. त्यानें भलत्या वेळींच जेवलें पाहिजे, आणि जेवल्याबरोबर पोटापाठीमागें धांवत गेलें पाहिजे.

भुक्तोपविशत स्तुंदम् । शयानस्यच पीनता ॥
आयुश्चक्रममाणस्य । मृत्युर्धावति धावतः ॥ १ ॥

जेवल्याबरोबर झोंपतो तो लठ्ठ होतो. जेवल्याबरोबर जो हळु हळु आणि डुलत डुलत शतपावली घालतो त्याचें आयुष्य वाढतें आणि जेवल्याबरोबर जो धांवत जातो त्याच्यामागें मृत्यु लागतो, असें शास्त्र सांगतें. शास्त्राला नुसती मान्यता द्यावयाची व लोकांचे आचार शास्त्रविरुद्ध होतील असें करावयाचें. असो, उन्मत्त अशा इंद्रियांना वळण लावण्याचें काम गृहस्थाश्रमांत होतें. गृहस्थाश्रमाला गृहस्थ आणि बाई पाहिजे आणि येथें तर यमधर्म सावित्रीचा पति घेऊन चालला आहे. ती त्याच्याशीं गोड गोड बोलते आहे आणि त्याला विचार करावयालाही वेळ न देतां आपल्याला हवीं तशीं कबुली उत्तरें त्याच्यापासून वदवून घेते आहे. आपण सिगारेट ओढणारे नसलों तरी मोहक दिसणारी जुन्या बाजारांतील सिगारेटची केस विकत घेतों ना ? कारण आपण तिच्या मोहकपणाला भुलतो. तसे शब्द गोड असले म्हणजे ऐकणाराही भुलतो आणि मग शिव्यादेखील मनाला लागत नाहींत, तसा यम गोड शब्दांवर भुलला आणि म्हणाला, सावित्री, किती गोड बोलते आहेस ! प्रतिपादन चांगलें, भाषा शास्त्रीय आणि वाणी गोड फार उत्तम बोललीस. वर माग.

कांहींहि न देतां भाषा गोड कशी बोलावी हें इंग्रजांपासून शिकावें. "त्यासि कृप म्हणे कर्णा, सुज्ञांहीं ऐकतांच डोलावें। ऐसेंचि बोलणें जरि तरि पुरुषानें दहांत बोलावें ॥

मारुतीची आणि रामचंद्राची प्रथम भेट झाली त्यावेळीं सुग्रीवानें मारुतीला सांगितलें होतें कीं, राम कोण आहे? कसा आहे? याचा तपास करून ये. त्या प्रथम मुलाखतीच्या वेळीं मारुतीनें इतकी सुंदर भाषा वापरली कीं, राम म्हणाले, लक्ष्मणा, पहा किती पुष्कळ वेळ बोलला. पण एकही अपशब्द तोंडांतून आला नाहीं. विनयानें आणि कसें सुंदर बोलला! राम त्याच्या गोड आणि विनयशील भाषणावरच भुलले आणि चट्दिशीं खरी गोष्ट त्याला सांगून टाकली. तसें यमधर्म कशावर प्रसन्न झाला तर "सुज्ञांही ऐकताच डोलावें" अशा सावित्रीच्या गोड भाषणावर. चला म्हटलं, आतां चलायचं ना? नाहींतर चला उठा! बसलांत काय? अर्थ एकच पण भाषेंत फरक. तात्पर्य भाषा गोड असावी.

यमधर्म म्हणाला—सावित्री काय वाटेल तें माग. पण एकच लक्षांत ठेव कीं, सत्यवानाशिवाय—

सावित्री म्हणाली— ठीक आहे. असें म्हणून तिनें प्रथम आपल्या स्वतःसाठीं अगर आपल्या बापासाठीं कांहीं एक मागितलें नाहीं. तर आपल्या सासऱ्याला डोळे मागितलेंन्. ती म्हणाली, "महाराज, माझा सासरा आंधळा आहे, तो पुनः डोळस व्हावा. राजा व्हावा आणि सूर्याप्रमाणें तेजस्वी व्हावा." असें मागणें मागितलेंन्.

यमधर्म म्हणाला—" ठीक. दिलें मी. सावित्री, तुझ्या चेहेऱ्यावरून असें दिसतें कीं, तूं दमली आहेस; तेव्हां आतां परत जा.

सावित्री म्हणाली—महाराज, मला थकवा आला म्हणतां ? छे ! छे ! माझे पति आपल्याजवळ आहेत. शिवाय आपल्या संगतींत मी चाललें आहे. मग श्रम कसले महाराज माझी गति तीच आहे कीं, जी माझ्या पतीची.

यमधर्म विचारतात—म्हणजे ? सत्यवानाला मी जिकडे नेईन तिकडे तूं येणार !

सावित्री म्हणाली—हो. हो. पण महाराज, आणखी कांहीं प्रश्न विचारूं कां आपल्याला ? महाराज, संतसंगति गोड असते ना हो ? संत लवकर मित्र बनतात. आणि मोठ्यांची संगति कधीं निष्फळ जात नाहीं, असें म्हणतात, हें खरें कां हो ?

यमधर्म म्हणतात—होय सावित्री, मोठ्यांची संगति कधींहि फुकट जात नाहीं. म्हणून वेद, शास्त्रें आणि पुराणें असें सांगतात कीं नेहमीं मोठ्यांच्या बरोबर असावें. सहज बोलतां बोलतां ते चांगली चांगली शिकवण देतात, उत्तम गोष्टी सांगून बुद्धि देतात, कुमति हरतात, भावभक्ति देतात, ज्ञान देतात. संतसंगति प्रत्यक्ष देवदर्शनापेक्षांही श्रेष्ठ आहे. निर्व्याज प्रेम म्हणून ज्याला म्हणतात तें संतसंगतींत लाभतें. तें प्रेम कसें करावें हें, ते म्हणजे संत सांगतात. कधींहि न पुरणारी इच्छा त्यांच्या संगतींत पुरी होते. ते आत्मविचार सांगतात. ब्रह्माला जाणून देतात, अशी संतसंगतीची महति आहे. ते कांहींहि न घेतां नेहमीं दोन हातांनीं सारखे देतच असतात.

सावित्री (हळूच) म्हणते—मग महाराज, अशी आपली संगति मला मिळत असतां आपण मला दूर कां लोटतां ?

मोरोपंत कवि म्हणतात कीं, नारायणा, स्तुति हें असें विष आहे कीं, तूंच एकटा तें पचवूं शकतोस. लोभी माणूस देखील निंदा पचवूं शकतो, पण तो स्तुति नाहीं पचवूं शकत. जरा स्तुति केली कीं म्हणतो अरे, चहा आणा रे! तसें सावित्रीचें भाषण ऐकून यमधर्म म्हणतो, सावित्री, फार गोड बोलतेस अं! मनाला अनुकूल, विनयशील आणि विद्वानांच्या बुद्धीला शोभणारें असें तुझें भाषण ऐकून मी फार प्रसन्न झालों आहे. त्याची कांहीं तरी प्रतिक्रिया झाली पाहिजे. म्हणून सावित्री, आणखी एक वर माग. म्हणजे दुसरा वर माग. पण एकच गोष्ट लक्षांत ठेव कीं माझ्याजवळ असलेल्या सत्यवानाच्या जीवितापेक्षां दुसरें कांहींहि माग.

सावित्री म्हणाली—ठीक आहे. मग तिनें हात जोडले आणि म्हणाली, महाराज, माझ्या सासऱ्याचें गेलेलें राज्य त्याला मिळावें आणि तो उन्मत्त होऊं नये. तो धर्मनिष्ठ असावा. यावर, यमधर्म म्हणाला—सावित्री, दिलें. मग आतां जा परत. यावर सावित्री (जरा लडिवाळपणानें) म्हणते, महाराज, असे सारखे जा जा काय हो म्हणतां? महाराज आपण सगळ्यांना आपल्या ताब्यांत ठेवता म्हणून आपल्याला यम म्हणतात, होय ना? हें खरें आहे काय?

यम म्हणतो—होय सावित्री, खरें आहे तें.

सावित्री म्हणते—महाराज, आणखी कांहीं विचारूं?

यम म्हणाला—हो विचार.

सावित्री विचारते—"महाराज, मघाशीं आपण एवढेंच सांगितलेंत कीं, संत मोठें असतात. पण महाराज, त्यांचा

मोठेपणा कशांत असतो. तें सांगावयाचें राहिलें. तेव्हां आतां सांगा कीं, संतांचा मोठेपणा कशांत असतो?

यम म्हणतो—सावित्री, तो त्यांच्या शब्दांत आणि हृदयांत असतो.

पायीं न चालणारा तो संत असे नव्हे. हा वाद रंगनाथ-स्वामी आणि रामदास यांचे वेळेपासून आहे. परमार्थी माणसाला जरीचा रुमाल कशाला? अरे, मग त्याला जटा-कमंडलू तरी कशाला? अरे बाहेरचा वेष कसाही असो, ते सत्यवचनी असतात आणि त्यांचें हृदय चांगलें असतें. म्हणूनच त्यांचा मोठेपणा बाह्य विषयांत नसून त्यांच्या शब्दांत आणि हृदयांत असतो. चिरकाल चालत आलेला साधूंचा धर्म असा आहे कीं, कोणत्याहि प्राण्याचा द्रोह न करणें. आणि कोणी कठोर शब्द बोलला, तरी दुःखी प्राण्या-वर अनुग्रह करणें. अशी एक गोष्ट सांगतात कीं, समर्थ रामदासस्वामी एका खेडेगांवात भिक्षेसाठीं एका घरांत गेले. आणि नेहमींच्या पद्धतीप्रमाणें एक मनाचा श्लोक म्हणून 'जय जय रघुवीर समर्थ' अशी गर्जना त्यांनीं केली. आणि म्हणाले, माई, भिक्षा घाला. घराची मालकीण कांहीं दुःखानें गांजली होती. ती पोतेरें घालीत होती. याचा शब्द ऐकून तशीच बाहेर आली आणि आपल्या दुःखाच्या भरांत समर्थांना दोन शिव्या हसडून फुकट भिक्षा मागायला लाज नाहीं वाटत? असें म्हणून हातांतलें पोतेरें तिनें समर्थांच्या अंगावर फेकलें. समर्थांनीं तें पोतेरें घेतलें बाईला नमस्कार केला आणि त्या घरांतून जे बाहेर पडले ते गेले थेट नदीकडे. एकीकडे तोंडानें मनाचे श्लोक चालले आहेत

आणि दुसरीकडे असा प्रकार कां घडावा ? याचा मनामध्यें विचार चालला आहे. अशा स्थितींत स्वारी नदीवर पोहों-चली. झोळी घाटावर ठेवली आणि तो पोतेऱ्याचा बोळा घेऊन समर्थ नदींत गेले आणि तेथें तें पोतेरें स्वच्छ करूं लागले. जसें जसें इकडे पोतेरें स्वच्छ होऊं लागलें तसें तसें तिकडे बाईचा राग शांत होत जाऊन आपल्या हातून घड-लेल्या दुष्कृत्याबद्दल तिला पश्चात्ताप वाटूं लागला. समर्थांनीं तें फडकें अगदीं पांढरें स्वच्छ केलें आणि स्वतः स्नान करून मिळालेली तेवढीच भिक्षा घेऊन परत मठांत आले. पूजेची तयारी केली. त्या धुतलेल्या स्वच्छ फडक्याचा कांकडा केला आणि तुपांत भिजवून देवापुढें लावला. आणि कळ-कळून आपल्या रामरायाची प्रार्थना केली कीं, रामा, जसा या कांकड्याच्या उजेडानें या खोलींतील अंधार नाहींसा केलास तसा त्या मातुश्रीच्या हृदयांतील गर्व आणि अज्ञान-अंधःकार नाहींसा कर. रामा, तिचें दुःख नाहींसें कर आणि तिला सद्बुद्धि दे. अशी रामाची प्रार्थना त्यांनीं केली. गांजलेल्यांसाठीं अशी प्रार्थना संत करतात. संत इतके दयाळू असतांना लोक त्यांना नांवें ठेवतात याचें कारण चांगल्या वस्तूंची त्यांना किंमत नसते इतकेंच. लोक कसेंही असले तरी त्यांच्यासाठीं "सर्वेऽत्र सुखिनःसन्तु" अशीच प्रार्थना संत करतात. जगन्नाथ पंडित गंगेला म्हणतात, "आई लोकांचें कल्याण व्हावें एवढीच माझी इच्छा. याउपर तुला वाटेल तें तूं कर. तूं कोण आणि मी कोण सांगूं ? मी अनाथ आहे तर तूं जगाची माता आहेस. मी विगलितगति असा झालों आहे, तर अधःपात ज्यांचा झाला आहे अशांना

ऊर्ध्व गति देणारी तूं आहेस. मी भवरोगी आहे तर, त्या रोगावर रामबाण चालणारी सिद्धौषधी तुझ्याजवळ आहे. मी तहानेलेला आहे तर तूं अमृताची नदी आहेस. मी तुझें पोर आहे तर बाबांच्याही वर असणारें अपील–कोर्ट म्हणजे माझी आई तूं आहेस. हें तुझें माझें नातें लक्षांत ठेवून तुला माझें काय करावयाचें असेल तें कर.

सावित्री विचारते—महाराज, आम्ही दुष्ट असलों तरी शत्रूवरही दया करणारे संत असतात. म्हणून दीन होऊन संतांच्या चरणीं जो लागला, त्याच्या इच्छा ते दीनवत्सल संत पुऱ्या करतात, असें म्हणतात हें खरें कां हो ?

यमधर्म सांगतो—सावित्री हो. हो. हें काय तूं विचारतेस ! सावित्री तूं असें सुंदर बोलतेस कीं, तहानेल्याला मधुर सुवासाचें गार पाणी जसें गोड लागतें तसें बोलणें फार गोड आहे आणि तुझी संगति अति आनंददायक आहे. चल. माझ्याबरोबर. सावित्री मी फार प्रसन्न आहे. म्हणून सत्यवानाशिवाय तुला काय हवें असेल तें माग. तें ऐकून सावित्री म्हणाली,—होय कां महाराज ? ठीक. माझा बाप पृथ्वीपति आहे, पण त्याला पुत्रसंतति नाहीं; म्हणून महाराज, त्याला औरस, आज्ञाधारक, सद्गुणसंपन्न, धर्मानें चालणारे आणि कुलाची कीर्ति वाढविणारे असे शंभर पुत्र असावेत.

मागावयाचेंच मग तें थोडें का ? नाहींतर मागा म्हटलें तर काय मागतो तर म्हणे तांदूळ गोळा करावयाला फडकें द्या ! अरे, शेत का मागत नाहींस ? देणाऱ्याची ऐपत पाहून मागितलें पाहिजे. हें सगळें ओळखून सावित्रीनें मागितलें

कीं, माझ्या बापाला दीर्घायु आणि संतानकर अशीं शंभर मुलें असावींत त्यावर

यमधर्म म्हणाला—सावित्री, ठीक आहे, ही गोष्ट माझ्या हद्दीच्या बाहेरची नाहीं. कुलाचें संतान वाढविणारे आणि तेजस्वी असे शंभर मुलगे तुझ्या बापाला होतील. तर सावित्री, तूं आतां जा.

सावित्री म्हणते—कांहो महाराज, सारखे जा, जा काय म्हणतां? मघाशीं म्हणालात ना? तो तुझी संगति गोड लागते आणि म्हणून माझ्याबरोबर चल! तर मी तुमच्या-बरोबर येणारच. पण एवढेंच करीन कीं, तुम्हांला त्रास न देतां मला अजून ज्या एक दोन गोष्टी विचारावयाच्या आहेत त्या मात्र आतां उद्यां विचारीन.

## प्रवचन ११ वें

यमधर्म म्हणतात, सावित्री, तुला श्रम होऊं नयेत यासाठीं तुला मी वाटेल तें देण्यास तयार आहे. तुझ्या बापाला शंभर मुलें दिलीं जा! फार लांब आलीस. जा आता परत!

यावर सावित्री म्हणते—महाराज, फार लांब आलीस असें म्हणतां तर लांब आणि जवळ याची व्याख्या काय? प्रत्यक्ष आपल्या माणसांत असल्यानंतर लांब काय आहे? वियोगाचें दुःख आहे. येथें तर मी आपल्या पतीबरोबर आहे. आणि बापाबरोबर आहे. अशी एक म्हण आहे कीं, आपघर कीं बापघर. माझ्यापासून आपल्याला कांहीं कष्ट होत असतील तरच मी लांब जावयास तयार आहे.

यावर यम म्हणतो—छे! छे? पोरी, तुझ्यापासून मला कष्ट नाहींत. उलट गोड बोलतेस त्यामुळें आनंद वाटतो.

सावित्री म्हणते—महाराज, माझें मन फार लांब लांब धांवतें आहे. मी आपल्याबरोबर आहे मग श्रम कसले! आणि कंटाळा तरी कसला!"

मन हें ॲडव्हान्स मॅनेजर आहे. सर्कस अगर नाटक मंडळी एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जावयाची असली म्हणजे एक ॲडव्हान्स मॅनेजर पुढें जाऊन सगळी तयारी करीत असतो. तसें आपलें मन हे प्रत्येक गोष्टींत पुढें धांवत असतें. जशी कंपनी असते तशी पुढल्या मुक्कामाची तयारी होत असते. म्हणून महाराज, तुम्ही चला पुढें मग माझें मन कोठें जातें आहे तें सांगेन.

यमही ज्या ठिकाणीं जाऊं शकत नाहीं अशा वैकुंठाला आपल्या पतीला नेण्याचा तिचा विचार आहे. पण तो विचार ती अद्याप बोलून दाखवीत नाहीं.

सावित्री म्हणते—महाराज, आपलीं किती तरी नांवें आहेत.—यमराज, पितृधर्मराज, वैवस्वत (सूर्यपुत्र) अशा अनेक नांवांनीं ओळखले जाणारे आहांत आपण. तसेंच तुम्ही आपल्या पित्याप्रमाणें प्रतापवान् आहांत सूर्याजवळ असा कांहीं भेदभाव आहे काय? कीं, एकादा चांगला असला तर त्यालाच तो प्रकाश देईल आणि दुसऱ्याला देणार नाहीं म्हणून! आपल्या भयानेंच लोक धर्मनिष्ठ राहातात. गरीब आणि श्रीमंत अशी विषम असणारी प्रजा समतेनें कशी राहाते? तर आपण दंडधर आहांत, आपलें भय त्यांना आहे म्हणूनच ना? गणपति, शंकर, उंदीर, साप, नंदी, भूतप्रेत आणि डाकिणी, शाकिणी, षडानन आणि त्याचें वाहन मयूर हे सगळे अगदीं विरुद्ध प्रकृतीचें असतांना एकमेकांच्या दाबांत कसे राहात असतात? तर, हे सगळे एका धर्माच्या म्हणजे आपल्या भयानें, आपापली कामें बिनबोभाट तऱ्हेनें करीत असतात."

असें एक धार्मिक भय होतें. तें निघून गेलें. आणि आतां सगळेंच मोकळें रान झालें आहे.

नव्याण्णव दरिद्री आणि एक श्रीमंत–मारामारी व्हावयाला वेळ नाहीं; पण पूर्वीचें धार्मिक बंधन गेलें असलें तरी आधुनिक पोलीसचें भय आहे. आणि त्यामुळें सगळे व्यवहार व्यवस्थित चाललेले दिसतात. सावित्री जुन्या मताची होती.

सावित्री म्हणाली—महाराज, एकद्याचें सर्वस्व हरण करूं नये असें म्हणतात, आणि हें बंधन पाळून भिन्नभिन्न प्रकारचे लोक समान धर्मानें कां राहातात ? तर आपण धर्माचे राजे आहांत. वाईट वागणाऱ्याला शास्त्रविरुद्ध वागणाऱ्याला आपण शिक्षा करतां म्हणूनच ना ?

यमधर्म म्हणाले—होय सावित्री.

यावर सावित्री म्हणते—तसेंच महाराज, माणसांनीं नेहमीं वेद शास्त्र यांत सांगितल्याप्रमाणें आचरण करावें म्हणजे त्याची फसवणूक होणार नाहीं.

मनुष्याची बुद्धि सर्वच ठिकाणीं काम करील असें नाहीं. उदाहरणार्थ, लहान मुलें सिनेमाला जाण्यासाठीं वाटेल त्या अटी कबूल करतात कीं—मी चालेन, रडणार नाहीं, झोंपणार नाहीं वगैरे वगैरे, पण तसें बिलकूल घडत नाहीं. असें आपल्याला वाटतें कीं, मी बदलणार नाहीं (माझीं मतें बदलणार नाहींत) पण आपण बदलतों. बुद्धिप्रामाण्य म्हणून आपण कांहींतरी करतों. मग आपलीं मते बदलतात आणि त्याप्रमाणें क्रियाहि बदलतात म्हणून भगवान् सांगतात, अर्जुना, माणसानें कसें वागावयाचें तर—"तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते—" म्हणजे शास्त्राच्या आज्ञेप्रमाणें माणसानें चालावें म्हणजे त्याची फसगत होणार नाहीं. काय करावें आणि काय न करावें हें नेहमीं एखाद्या ॲथारिटीनें सांगितलें पाहिजे. अकार्याला कार्य आणि कार्याला अकार्य केव्हां ठरवावयाचें तर शास्त्र तसें सांगेल तेव्हां मुलगा झाल्यावर अशौच कां ? हें तर्कांत बसत नाहीं. पण शास्त्र सांगतें म्हणून तें पाळावयाचें. मरण अशौचामध्यें इकडे तिकडे शिवतां

येत नाहीं, कांहीं क्रिया करतां येत नाहींत; पण जनन-आशौचामध्यें सगळ्या क्रिया करतां येतात आणि सगळी-कडे ओंवळ्यांतून शिवतां येतें तसें यांतही विचार असा कीं, निष्क्रिय विचार मनांत आणावयाचे नाहींत आणि जे क्रियेत येणारे विचार आहेत ते देखील शास्त्राच्या कसोटी-वर घासून घेतले पाहिजे. कारण एकदां क्रिया घडून गेल्यानंतर मग येथें उपाय नाहीं. बंदुकींत गोळी आहे अगर नाहीं हें पाहावयाचें असेल तर बंदुकीची नळी वर करून बंदूक झाडून पाहिलें पाहिजे. नाहींतर आत्मघात होईल. म्हणून नेहमीं शास्त्राच्या संमतीनें वागणें हें चांगलें. साधारण-पणें त्याची परंपरा अशी सांगतां येईल कीं, श्रुति, स्मृति शिष्टाचार आणि मग आपली आवड. याचें तात्पर्य असें कीं, मनांत आलेल्या गोष्टी एकदम करतां येतात. तर आपल्या क्रियेला श्रेष्ठ माणसांची संमति असावी लागते. कारण तीं श्रेष्ठ माणसें समदृष्टि असल्यामुळें त्यांच्या हातून तर अन्याय घडणार नाहींच आणि आपल्यालाहि ते अन्यायाच्या मार्गाकडे जाऊं देणार नाहींत. याबद्दलची महाभारतांतली एक गोष्ट अशी—

प्रल्हादाचा नातू आणि दुसरा एक राजा यांचेमध्यें लग्ना-साठीं वाद उत्पन्न झाला—म्हणजे त्या मुलीला कोणीं वरावें असा तो वाद होता. तो वाद सोडविण्यासाठीं आला प्रल्हादाकडे. तेव्हां प्रल्हादानें निरपेक्षबुद्धीनें आपल्या नातवाच्या विरुद्ध निकाल दिला.

सावित्री म्हणते—महाराज, जगांमध्यें आपण समदृष्टि ठेवून वागतां, मग आपल्यावर विश्वास ठेवणें चुकीचें ठरेल

प्रा. क्र. ६८७८ ... ग्रॉ. दि
वि. ... ... ...


काय ? तर नाहीं–आपल्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. संत निःपक्षपाती असतात. " सर्वेऽत्र सुखिनःसन्तु " अशी त्यांची निरपेक्ष भावना असते. म्हणूनच लोकांचा त्यांच्या-वर विश्वास बसतो. तसें महाराज, आपण प्राणिमात्रांचे सुहृद आहांत. आपल्या हातून केव्हांही अन्याय होणार नाहीं. मग मी आपल्यावर विश्वास ठेवला तर त्यांत माझी चूक आहे काय ?"

यम सांगतो—सावित्री, नाहीं नाहीं यांत चूक नाहीं. सावित्री, किती गोड बोलतेस तूं. आजपर्यंत असले सुंदर विचार मीं कधींही आणि कुठेंही ऐकले नाहींत. मुली, फार संतुष्ट झालों आहे. काय वाटेल तें माग. पण ती एक अट अजून कायम आहे कीं फक्त सत्यवानाशिवाय काय वाटेल तें माग अं ! आतां चौथा वर माग.

सावित्री म्हणाली—महाराज, माझ्यावर आपलें किती प्रेम आहे ? ठीक आहे. आपण वर माग म्हणतां तर मागतें. आपल्या इच्छेविरुद्धहि मागत नाहीं. पण महाराज, माझी हौस पुरवाल ना ?

यमधर्म म्हणतात—हो. हो. सावित्री, तुला हवें तें माग.

सावित्री म्हणाली—महाराज. मला बलवीर्यशालीं अशीं शंभर औरस मुलें असावींत.

यमधर्म म्हणाला—सावित्री, मी प्रसन्न झालों आहे. तुला शंभर औरस मुलें होतील अं ! जा आतां. फार लांब आलीस. फीर मागें.

यावर सावित्री म्हणाली—हो, जातें अं ! पण महाराज, एक प्रश्न सहज आठवला म्हणून विचारतें कीं, या जगाला

आधार काय ? आणि ब्राह्मणाचें जसें शिवलीलामृत आणि गुरुचरित्र राहिलें तरी चालेल पण संध्या राहतां कामा नये, तसें संतांचें असें कोणतें व्रत आहे कीं, तें, संतलोक सोडूं शकत नाहींत ?

यावर यम म्हणतो—सावित्री, जग हें सत्यावर (सत्वर) आधारलेलें आहे आणि सत्य हाच संतपणाचा पाया आहे. सत्याचा सर्वत्र विजय असतो. अश्वत्थाम्याच्या मरणाची गोष्ट, म्हणे धर्मराज खोटें बोलला म्हणून जय झाला तर असें नव्हे तर द्रोणाचार्यांनीं धर्मराजाच्या सत्यवक्तेपणावर विश्वास ठेवला.

यावर सावित्री विचारते—महाराज, संत असें म्हणतात कीं, ज्या ठिकाणीं सत्य आहे तो शाश्वतधर्म आहे आणि म्हणून ते नेहमीं सत्याला चिकटून असतात हें खरें ना ?

यम म्हणतो—होय सावित्री, अगदीं खरें. भीष्मांनीं नाहीं कां आपलें मरण सांगितलें कीं, तुम्ही जर शिखंडीला पुढें कराल तर मी त्याच्यावर कांहीं बाण सोडणार नाहीं, आणि मग एकतर्फी बाण खाऊन मरून जाईन. प्रारब्ध आहे. संत खरें असतें तेंच सांगतात. त्यामुळें त्यांच्या चित्ताला व्यथाही होत नाहीं आणि दुःखही होत नाहीं.

यावर सावित्री विचारते—मग महाराज, संतांच्या संगतींत कधीं तरी दुःख होईल काय ?

यम म्हणतो—छे ! छे ! सावित्री, संतांच्या संगतींत कधींही दुःख होणार नाहीं.

सावित्री पुढें विचारते कीं, महाराज, संसाराच्या संगतींत परमार्थाचा अंकुर उत्पन्न करतात ते संत ना ?

यम म्हणतो—होय सावित्री, संतसंगति केव्हांहि निष्फळ होत नाहीं. आणि म्हणून संतांचें भय कोणालाहि वाटत नाहीं. संतांना मोठेपणा सत्यामुळें येतो. मोठे झालेल्या संतांत असत्य दिसून आलें तर त्यांचा अधःपात होतो. जलाचा धर्म शीतल, प्रवाही आणि आनंद देऊन शांत करणें असा आहे. तसें जर नसेल तर त्यांत कांहींतरी बिघाड आहे असें समजावें. तसे संत हे नेहमीं अधिष्ठित असतात. आणि संतांच्या संगतींत राहणारा सच्छील माणूस केव्हांहि दुःखी असणार नाहीं.

यावर सावित्री विचारते—महाराज संतांचे शब्द नेहमीं खरे होतात असें म्हणतात तें खरें काय ?

यम म्हणतो—होय सावित्री, संतांचा शब्द देवालाही खरा करून दाखवावा लागतो.

यावर पुन्हां सावित्री विचारते—महाराज, आर्यधर्मांचा पाया सत्य आहे असें समजून संत त्याचें आचरण करतात हें खरें काय ?

यम म्हणाला—सावित्री, या तुझ्या प्रश्नाचें उत्तर ताबड, तोब देतां येणार नाहीं. म्हणून मी विचार करून या प्रश्नाचें उत्तर उद्यां देईन.

# प्रवचन १२ वें

संत आणि त्यांचा प्रमुख धर्म सत्य आहे खरें ना ? असें सावित्री विचारते आहे. त्यावर यम सांगतो—सावित्री, सत्य म्हणजे न बदलणें, हा ज्यांचा धर्म आहे ते संत. गीता ही केव्हांहि पहा. तिच्यांतील तत्त्वें त्रिकालाबाधित आहेत.

आरसा नेहमीं तुमचें प्रतिबिंब म्हणजे जसे तुम्ही असाल तसेंच दाखविणार. एक होता चित्रकार. तो आपल्या कलेंत प्रवीण होता. म्हणून त्याला कृष्णांनीं आपलें चित्र काढण्यास सांगितलें आणि बजावलें कीं, चित्र उत्तम निघाल्यास मोबदला भरपूर मिळेल. तो चित्रकार अविश्रांत श्रम करून चित्र काढी, पण प्रत्येकवेळीं कांहीं तरी दृश्यफरक दृष्टीस पडे. अशा तऱ्हेनें तो दमला. त्याला कांहीं सुचेना. मग एक दिवस तो अगदीं रडकुंडीस येऊन सचिंत बसला असतांना त्या वाटेनें जाणारे नारद त्याला भेटले. त्याला सचिंत पाहतांच नारदांनीं त्याच्या चिंतेचें कारण विचारलें. चित्रकार म्हणाला, 'श्रीकृष्णाचें चित्र काढावयाचें आहे, आज एक वर्ष सारखे श्रम चालले आहेत; पण चित्र कांहीं साधत नाहीं. नारद म्हणाले, इतकेंच ना ? असें कर कीं, आज नवीन तसबीर म्हणजे चित्र काढूं नकोस आणि उद्यां कृष्णाकडे जाण्याचे अगोदर माझ्याकडे ये. मजजवळ एक 'अप टु डेट' अशी कृष्णाची तसबीर आहे, ती तुला देईन. ती घेऊन तूं श्रीकृष्णाकडे जा. आणि आपलें बक्षीस मागून घे.

दुसरें दिवशीं तो चित्रकार नारदाकडे गेला तेव्हां त्यांनीं मखमलीच्या फडक्यांत गुंडाळून एक आरसा त्या चित्रकाराला दिला. आणि त्याला सांगितलें कीं, तूं वाटेंत ही

तसबीर उघडून पाहूं नकोस. पण गेल्याबरोबर श्रीकृष्णाला मात्र सांग कीं, आज आपण देणार असलेला भरपूर मोबदला मला मिळाला पाहिजे. आणि असें सांगून मग ही तसबीर त्यांच्या हातांत दे. त्या चित्रकारानें अगदीं सांगितल्या-प्रमाणें केलें. श्रीकृष्णांनीं त्या मखमलीच्या फडक्यांत गुंडाळलेला आरसा पाहतांच श्रीकृष्ण त्या चित्रकाराला म्हणाले, गड्या आज तुला कोणी तरी गुरू भेटलेला दिसतो.

कृष्णाच्या हातांतून आरसा दिसेपर्यंत त्या चित्रकारालाही ही कसली तसबीर आहे हें माहीत नव्हतें. श्रीकृष्णांनीं त्या चित्रकाराला भरभूर मोबदला दिला. असो सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, शास्त्र हें आरशासारखें असलें पाहिजे. केव्हांहि पाहिलें तरी खरें असेल तसें दिसलें पाहिजे. तसें संत सांगतात तें सत्य त्रिकालाबाधितच असलें पाहिजे. आज आपली कशावरही श्रद्धा नाहीं म्हणून हे असले दिवस आज आपल्याला पाहावे लागत आहेत. तीं शास्त्रें आजही हयात आहेत, संतही सांपडतील, पण आपला विश्वास कोठें आहे ? सत्य हाच संतांचा धर्म आहे, होय ना महाराज ? असें सावित्री विचारते आहे.

त्यावर यमधर्म सांगतो, होय सावित्री, तुझें म्हणणें अगदीं बरोबर आहे. सत्याच्या पालनांत स्वतःचा देहहि येत असेल तर तोहि कापल्याशिवाय ते राहाणार नाहींत.

एकदां असें झालें कीं, सनत्कुमार श्रीविष्णूंच्या दर्शनाला जात असतांना पहाऱ्यावर असणाऱ्या जय-विजयांनीं त्यांना

अडथळा केला. तेव्हां सनत्कुमारांनीं त्यांना 'राक्षस व्हाल' असा शाप दिला ही गोष्ट विष्णूंना कळली तेव्हां ते म्हणाले, ठीक झालें. यांत मी कांहीं करूं शकत नाहीं. कारण माझ्या दर्शनाला येणाऱ्या लोकांना त्यांनीं बंदी का म्हणून करावी? इतकेंच नव्हें तर ते म्हणाले कीं, माझ्या हातून माझ्या भक्तांचा जर असा एकादा अपराध घडेल तर मी आपला तो हात कापून टाकीन. म्हणून माझ्या गणांना संतांनीं शाप दिल्याबद्दल मला वाईट नाहीं वाटत. कारण संत हे तत्त्वनिष्ठ असतात. तत्त्वानिष्ठ असणें हा संतांचा म्हणजे मोठ्या लोकांचा धर्म आहे.

एका इतिहास लेखकानें छत्रपति शिवाजी महाराजां-बद्दल कांहीं गैरशिस्त मजकूर लिहिला होता. प्रथम त्यास तो मजकूर परत घेण्याबद्दल सांगण्यांत आलें—तो नाहीं म्हणाला. तेव्हां ती तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्याकडे गेली. त्यांनीं सांगितलें कीं, जर हें विधान परत घेतलें जाणार नाहीं तर त्याचीं तीं पुस्तकें शिक्षणक्रमांतून रद्द केलीं जातील. मग त्या ग्रंथकर्त्यानें आपलें तें विधान परत घेतलें. याचें कारण तो तत्त्वानिष्ठ नव्हता, तर पैसानिष्ठ होता. सत्पुरुषांनीं केलेला उपदेश आणि त्यांनीं दिलेलें ज्ञान, आणि दान हीं केव्हांही वृथा होत नाहींत. रक्षणाचीं साधनें ते अशीं देतात कीं, पुन्हां कोणाजवळहि रक्षण मागण्याचा प्रसंगच येत नाहीं. तेच एकटे रक्षण करणारे आहेत. राजा नव्हे. कारण राजा हा प्रसंगाला सगळ्यांना बोलावितो. संत हे असे देतात कीं, जी वस्तु त्यांनीं दिली त्यांत घेणाराला प्रसाद आणि मान या दोन्हींची प्राप्ति होते.

संतांनीं दिलेल्या दानांत प्रसाद आणि मान असतो. ते जें देतात ते प्रसन्न होऊन देतात म्हणून त्यांचा तो प्रसाद होतो, आणि ते जें देतात तें अपूर्व असतें, म्हणून घेणाराचा तो मान असतो. गरजू माणसें दिलेलें कसलेंहि दान घेतात पण त्यांत प्रसाद आणि मान नसतो. दान देणें फार कठीण आहे. दान म्हणजे आपलें स्वत्व काढून आपल्या हातांनीं त्यावर दुसऱ्याचें स्वत्व चढविणें, याचें नांव दान. दया, दान, हीं माणुसकीचीं लक्षणें आहेत. बोल्शेव्हिझमचीं हीं शास्त्रीय स्वरुपें आहेत. पण एकदां तो डोळे वटारून हें तुझें नाहीं, माझ्या बापाचें आहे, टाक माझा हिस्सा, असें म्हणतो. आणि येथें तूं माझा भक्त आहेस असें म्हणून डोळ्यांत अश्रु आणून आपणच बंधुभावानें त्याला तें द्यावयाचें. त्याला योग्य असे देश, काल, वर्तमान असावें लागतें. त्याला सात्त्विकज्ञान असें म्हणतात. कांहीं फलाच्या आशेनें दिलेलें जें दान तें राजस दान. आणि अपात्रीं केलेलें जें दान तें तामस दान. पण संतांनीं दिलेलें दान या कोणत्याही प्रकारांत येत नाहीं. कारण ते जें दान देतात त्यांत त्यांची कोणतीहि इच्छा नसते. कोणावांचून ज्यांचें अडत नाहीं अशा संतांनीं दिलेलें दान घेण्याचें भाग्य असावें लागते. दिलेल्या दानाचा केव्हांहि उच्चार करणार नाहींत आणि उलट घेणाऱ्याचेच आभार मानतील.

यमधर्म (पुढें) म्हणतात—सावित्री, ते अशी वस्तु देतात कीं कायमचें कल्याण करतात. संताना एकच कमीपणा वाटतो कीं, आपल्याकडे आलेला माणूस त्याची इच्छापूर्ति न होतां जर तो दुसऱ्याकडे गेला तर मात्र ते स्वतःला

लांछन समजतात. त्यावर सावित्री म्हणते—मग महाराज, मी आपल्या दाराशीं आल्यानंतर आणि आपण मला वर-प्रदान दिल्यानंतर आतां या सावित्रीनें दुसऱ्याच्या दाराशीं कां जावें ?

यमधर्म म्हणतो—सावित्री, फार सुंदर बोलते आहेस—धर्म-युक्त बोलते आहेस. तुझे शब्द आणि बोलणें किती गोड ! असें वाटतें कीं, एकसारखें तुझ्याशीं बोलत राहावें. तुझें बोलणें नुसतें गोडच असते. असें नाहीं तर त्यांत सगळा शास्त्रार्थ भरलेला असतो. पहिल्यांदा तुझ्याबद्दल फक्त प्रीति वाटत असे पण आतां माझ्या मनांत तुझ्याविषयीं भक्ति-उत्पन्न झाली आहे आणि आदर उत्पन्न झाला आहे.

झालें. यमधर्म गडबडला व म्हणाला, पतिव्रते, मी फार प्रसन्न आहे, काय मागावयाचें असेल तें माग—नेहमी प्रमाणें सत्यवानाशिवाय काय हवें असेल तें माग असें नाहीं म्हणाला.

सावित्री म्हणाली—महाराज, वर मागूं ? सरसकट वर माग असें सांगत आहात. महाराज, वाटेल तो वर मागूं ?

यमधर्म म्हणाला—होय सावित्री, वाटेल तो वर माग.

ठीक आहे. महाराज, तर मग आपल्या ह्या मुलीला तिचा सत्यवान् परत द्या ! महाराज, मी जिवंत प्रेत आहे आणि सत्यवान् प्रत्यक्ष प्रेत आहे. अशीं हीं दोन्ही प्रेतें जिवंत करा.

यमधर्म म्हणतो—सावित्री, हें कसें होईल ?

सावित्री म्हणते—"महाराज, हें आपल्याला देतां येत नसेल तर माझ्यासाठीं नका देऊं तर आपले शब्द खरे करण्यासाठीं द्या.

पेचांत आला. ती पुढें म्हणाली, महाराज, आपण मला आतांच सांगितलें कीं, संत सत्यासाठींच जगतात आणि सत्य हाच त्यांचा धर्म आहे. तेव्हां आपणहि संत आहांत, म्हणून आपले शब्द खरे होण्यासाठीं मी जें मागितलें तें मला द्या. महाराज, मला शंभर औरस मुलगे होतील असें म्हणालांत तें खरें करा. मला औरस मुलगे पाहिजेत दत्तक नकोत. दत्तक घेतलेला मुलगा रद्द होण्याचा संभव असतो, म्हणून मला शंभर औरस मुलगे हवेत. ते देतों म्हणालात तें खरें करा.

सातारचे सुप्रसिद्ध वकील दादासाहेब करंदीकर यांच्या फौजदारी खटले जिंकण्याच्या नैपुण्याबद्दलची दत्तकाची एक गोष्ट सहज आठवली ती सांगतों—एका बाईनें एक मुलगा दत्तक घेतला. त्याचे कागदपत्र आणि विधिविधा-नही यथान्याय झालें पण पुढें आपल्या नातलगांच्या नादीं लागून ती बाई, तो मुलगा मी दत्तक घेतला नाहीं असें म्हणूं लागली. म्हणून मग त्या मुलाच्या बापानें म्हणजे ज्यानें आपला मुलगा त्या बाईला दत्तक दिला होता त्यानें आपल्याजवळ असलेल्या पुराव्याच्या आधारावर फौजदारी कोर्टांत दत्तकाच्या विश्वासघाताबद्दल खटला भरला. बाईनें खोटा पुरावा तयार करून आणि उत्तम वकील देऊन ती अगदीं तो खटला जिंकण्याच्या बेतांत होती. त्या पायीं तिच्याजवळ असलेली सगळी रोकड संपली होती. आज आपण हा खटला अगदीं निःसंशय जिंकणार ह्या विश्वासानें त्या वकिलाला घालण्यासाठीं हार-तुरे आणि इतरांना वाटण्यासाठीं पाटीभर पेढे वगैरे आणून ठेवले होते. पण

त्याच दिवशीं त्या मुलाच्या बापालाहि कांहीं सद्बुद्धि सुचून आपणही निदान आज तरी चांगला वकील द्यावा असें वाटलें तो गेला दादासाहेब करंदीकरांचेकडे. अशा तऱ्हेचे फौजदारी खटले चालविण्यांत दादासाहेबांचा हातखंडा असे असा त्यांचा लौकिक होता. तो ऐकून हा मुलाचा बाप त्यांच्याकडे गेला. त्याच्या नशिबानें त्यांना त्या दिवशीं थोडीशी सवडही होती. त्यानें खटल्याची साद्यंत हकिकत त्यांना सांगितली आणि आपल्याजवळचे कागदपत्र त्यांना दाखविले. दादासाहेबांनीं चट्दिशीं ओळखलें कीं, या माणसाचे कागदपत्र खरे असून बाईची कोर्टांत मांडलेली बाजू आणि तिनें दिलेला पुरावा सपशेल खोटा आहे. त्यांनीं कोर्टांत हजर राहण्याचें कबूल केलें. दोन्ही बाजूच्या वकिलांचीं भाषणें होऊन खटला अगदीं बाईच्या बाजूनें झालाच असें प्रत्येकाला वाटूं लागलें. इतक्यांत कोर्टाच्या परवानगीनें दादासाहेब थोडेसें भाषण करण्यासाठीं म्हणून उभे राहिले आणि त्यांनीं आपल्या भाषणाची भाषा अशी कांहीं मजेदार ठेवली कीं, जणुं कांहीं ते बाईचेच वकील आहेत. त्या मुलाच्या बापालाहि वाटलें कीं, दादासाहेब हें काय बोलताहेत ! दुर्दैव आपलें ! असें मनांत म्हणून तो अगदीं खिन्न होऊन बसला होता. दादासाहेबांचें हें भाषण संपत आलें होतें. शेवटीं ते म्हणाले, मला आतां दोन चारच वाक्यें बोलावयाचीं आहेत आणि बाईंना फक्त एकच प्रश्न विचारावयाचा आहे. तेवढ्याचे त्यांनीं चट्दिशीं उत्तर द्यावें आणि कोर्टानीं तशी परवानगी द्यावी इतकीच माझी विनंती आहे.

मग दादासाहेब पुढें बोलूं लागले—बाईंनीं पहिलें दत्तक-पत्र अमान्य करण्यासाठीं केलेली खटपट खरोखर वर्णनीय आहे. त्यासाठीं त्यांनीं खर्चहि खूप केला आहे आणि खटला त्यांनीं जवळजवळ जिंकल्यासारखा आहे. मला त्या-बद्दल आनंद वाटतो फक्त मला त्यांना एकच विनंती करा-वयाची आहे कीं, या केसमध्यें त्यांना पडलेलीं दगदग, त्यांचा खर्च झालेला पैसा, आणि परिश्रम हें सगळें लक्षांत घेऊन त्यांनीं पुन्हां असल्या दत्तकाच्या भानगडींत पडूं नये. बाईला वाटलें, फार सुंदर सांगताहेत. त्या एकदम उठून म्हणाल्या महाराज, या एकाच खटल्यानें माझ्या सगळ्या पैशाचं वाटोळं झालं आहे. आतां प्राण गेला तरी पुन्हां असल्या भानगडींत मी पडणार नाहीं. दादासाहेबांनीं लगेच जज्जसाहेबांना बाईचें हें म्हणणें नोट करून घ्यावयास सांगितलें आणि खटला जिंकला !

असो, आपला विषय असा, तुला शंभर औरसपुत्र होतील असा यमधर्मानें सावित्रीला आशीर्वाद दिला पण अद्याप त्यानें सत्यवानाला सोडलें नव्हतें.

यावर सावित्री विचारते– महाराज, शंभर औरस मुलें होतील असा आशीर्वाद देतां आणि माझ्या पतीला तर आपण घेऊन चाललांत ! तेव्हां ही संगति कशी लावा-वयाची ! महाराज, मी अडवतें आहे असें नाहीं तर शंका विचारतें आहें इतकेंच. माझ्याबद्दल विचारीत असाल तर माझे काय ? मी तुमच्याबरोबर येऊन यमलोकांत राहिलें असतें. पण त्यांचे आईबाप वृद्ध आहेत आणि ते त्यांचे एकुलते एक पुत्र आहेत. म्हणून विनंति करतें कीं, मी

आपली कन्या आहें. कन्यादान करा. आपलें बोलणें खरें करा. आणि मुलीला सुखी करा. आणि सत्यवानाचे आई-बापांना त्यांचा मुलगा द्या.

यम म्हणतो—सावित्री तुझ्या विनयानें प्रसन्न झालों आहे. हा घे तुझा पति. असें म्हणून त्यानें सत्यवानाच्या भोंवतालचें पाश काढले आणि मोठ्या आनंदानें त्याला तिच्या स्वाधीन केला. आणि म्हणाला, सावित्री, धर्म, शास्त्र, आणि अर्थ यांनीं युक्त असें वक्तव्य मला ऐकविलेंस मी फार प्रसन्न झालों आहे. सावित्री हा घे तुझा पति. असें म्हणून सत्यवानाला तिच्या स्वाधीन केला. त्यावर सावित्री म्हणते, महाराज, यांना अपघात झाला होता असें समजूं देऊं नका.

यमधर्म म्हणाला—ठीक. जा, तसें होईल. याला आतां चारशें वर्षं आयुष्य लाभेल. तुला शंभर मुलें होतील. त्यांना राज्य मिळेल. तुझ्याहि मुलांचा वंश वाढेल. घ्या. अनंत हस्तें कमलावरानें देतां तुम्ही दोन हातांनीं किती घ्याल ? सहस्रशीर्षा-असें त्याचें स्वरूप आहे. तो द्यावयाला तयार झाल्यावर काय कमी आहे ? किती घ्याल ? यमधर्म म्हणाला सावित्री सगळे दिलें. तुझ्या बापाला शंभर मुलें होतील. त्याच्या वंशाचें नांव 'मालव' असें राहील. सावित्री आणखी काय पाहिजे ?

सावित्री म्हणाली—महाराज, आतां कांहीं नको. आतां फक्त एकच इच्छा कीं, आपल्या या मुलीवर अशीच निरंतर कृपा असावी. असें म्हणून तिनें नमस्कार केला आणि

यमधर्मानें तथास्तु म्हणून तो निघून गेला.

आतां यापुढें असा प्रश्न आहे कीं, मेलेल्याला जिवंत करण्याचा अधिकार यमाला आहे काय ? मेलेल्याला जिवंत करण्याचा अधिकार कोणाचा ? तर त्याचें उत्तर असें कीं, हें सगळें नाट्य आहे. जो जिवंत होतो तो खरा मेलेलाच नसतो. म्हणजे त्याला महामृत्यु आलेलाच नसतो. पण योगायोगानें तो कांहीं वेळ मेल्यासारखा वाटतो इतकेंच. योगायोगाचें तुमच्या माहितीचें उदाहरण सांगूं ? वर संशोधनार्थ वाटेल तितकें हिंडतो, पण शेवटीं शेजारच्या खोलींतल्या मुलाला मुलगी देतो. मग हिंडला कां ? तर योगायोग ! इतकेंच सांगतां येईल. सावित्रीचा योगायोग असा होता कीं, इतक्या सगळ्या पर्वण्या होऊन तिला हें मिळवावयाचें होतें. प्रथम सावित्रीदेवीनें असें सांगितलें होतें कीं, राजा, तुला, एकच मुलगी देतें. जास्त मागूं नकोस. तर त्याचा संबंध असा होता. तात्पर्य इतकेंच कीं, मोठ्यांचें मुकाट्यानें ऐकत असावें, त्यांतच लहानांचें कल्याण असतें.

एक व्हाइसरॉय चार्ज सोडतांना दुसऱ्या व्हाइसरॉयला एक कॉन्फिडेन्शिअल बॅग देत असतो तींत जरूर ती सगळी माहिती असते. राज्यकर्त्यांना अशा गोष्टी कराव्याच लागतात. तसें वरही म्हणजे स्वर्गांत देखील एक राज्य आहे. आणि या मृत्युलोकच्या राज्याचीं सगळीं सूत्रें तेथून हलविलीं जातात. राजा अश्वपतीच्या कर्माचीं सूत्रें अशातऱ्हेनें हलवावयाचीं होतीं याचें कारण जसें उष्णतेशिवाय शीत-

लाची किंमत कळत नाहीं, तसें कोणतीहि गोष्ट स्वकष्टानें मिळविल्याशिवाय तिची योग्य किंमत कळत नाही. असो, यमधर्म सावित्रीला आशीर्वाद देऊन आपल्या लोकाला गेला. आणि सावित्री आपल्या पतीला घेऊन परत फिरली, आतां ती काय करतें तें आपण उद्यां पाहूं.

---

## प्रवचन १३ वें

सावित्रीला वरदान देऊन यम आपल्या लोकाला गेला आणि सावित्री परतली. पुनः रानामध्यें ज्या ठिकाणीं पतीचें प्रेत पडलें होतें त्याठिकाणीं आली. जीवात्मा परत येतांबरोबर सर्व इंद्रियें वगैरें जागच्याजागीं बसण्यास उशीर लागतो. निजलेल्याला एकदम जागें करूं नये असें सांगतात याचें कारण इंद्रियांची शक्ति जरा सुप्त झालेली असते आणि त्यांत तें चैतन्य परत यावयाचें त्याला थोडा वेळ लागतो. तेज एकरूप असते पण त्याच्याशीं संयोग होणाऱ्या वस्तू-बरोबर म्हणजे कांचेबरोबर तें बदलत असतें. तसें ही ज्ञान-शक्ति, तिचा संयोग ज्या ज्या इंद्रियाशीं होईल म्हणजे ज्या ज्या इंद्रियांत ती शिरेल त्या त्या इंद्रियांचीं कार्यें घडत असतात. वासना म्हणजे इंद्रियें पाहाण्याचीं वासना ज्या इंद्रियांत असते त्याला डोळे असें म्हणतात. दहा इंद्रियांत असणारी ही वासना ज्या इंद्रियांचें काम असेल त्या इंद्रियांत आपोआप प्रवेश करते. पाहण्याची इच्छा झाली कीं ती डोळ्यांत येते. यालाच संस्कार असेंहि म्हणतां येईल. एकतास एके ठिकाणीं जुळलेलीं हजारो मंडळी नंतर नेमकीं आपापल्या घराकडे जातात, हें कसें घडतें ? तर याचें कारण संस्कार.

सगळ्या वासनांचा गोल सुषुप्तीमध्यें अज्ञानांत असतो. वासनांपासून भोगेच्छा उत्पन्न झाली कीं, त्या चळवळ करावयास लागतात. औषधें कांपौंड झालीं म्हणजे काय आहे तें समजणार नाहीं. पण पोटांत गेल्याबरोबर तीं निर-निराळी ओषधें आपआपली कार्यें करावयास लागतात. तसें

जीवात्मा सुषुप्तीमध्यें गेल्यानंतर आई-आई नाहीं, हा पापी नाहीं, पुण्यवान नाहीं, तर सर्व एकी भवन्ति म्हणजे सर्व वासना एके ठिकाणीं होतात किंवा सुप्त आहेत अशा दिसतात. पण भोक्तृत्व आलें कीं, त्या सुप्त वासना जागृत होतात आणि आपापल्या जागेंत हळू हळू जाऊन बसतात. लहान मुलांना, राजेलोकांना आणि देवांना कुरवाळीत आणि गाणीं म्हणत उठविण्याची प्रथा आहे. देवांना उठविण्याचीं जीं गाणीं म्हणायची त्यांना भूपाळ्या असें म्हणतात. याचें कारण असें कीं, सुप्त शक्ति जागृत होऊन पुनः कार्यप्रवृत्त होण्यास थोडा वेळ लागतो. असो, जीवात्मा आपला वासनात्मक प्रपंच देहांत राहूनच करीत असतो. हें सांगण्याचें कारण असें कीं, सत्यवानाचे लिंग शरीर (सोल) तें स्थूलदेहाच्या बाहेर गेल्यानंतर इंद्रियें सुकून गेलीं होतीं आणि पुन्हां त्या शरीरांत स्वस्थानीं जात असतांना हळू हळू जात होतीं, सावित्री परत आली आणि तिनें आपल्या पतीचें डोकें मांडीवर घेतलें आणि त्यावरुन हळुच हात फिरमग त्यांत हळू हळू चैतन्य आलें. सुषुप्तीत काय अवस्था असते, तें आपलें आपण तपासून पाहिलें पाहिजे. मला गाढ झोप लागली म्हणजे काय होतें हें थोडासा तपास केला म्हणजे कळतें. आणि समजते कीं, कांहीं नाहीं. अशा आनंदमय स्थितींत आपण होतों. गुरुची जरुरी असते ती अशावेळीं कन्सेन्टसाठीं. गुरुनें सांगितलें कीं, ठीक, बरोबर जातों आहेस चल पुढें, म्हणजे समाधान वाटतें. याची आवश्यकता सर्वांनाच आहे. मनुष्य एवढ्याचसाठीं आपल्या मताला प्रमाणें देत असतो कीं, कालिदास असें म्हणतो,

मोरोपंत असें म्हणतात; म्हणजे विद्वानांचेही तेंच मत आहे. असें सांगितल्याशिवाय आपण केलेली गोष्ट चांगली आहे असें समाधान होत नाहीं. याला रोजच्या व्यवहारांतलें आणि अगदीं अशीच तुमच्या ओळखीची गोष्ट सांगूं ? स्वयंपाक चांगला झाला असला आणि आपण दोन घांस जास्त जेवलों असलों तरी, स्वयंपाक चांगला झाला आहे, असें जर म्हटलें नाहीं, तर करणाऱ्याला बरें वाटत नाहीं. बुद्धिप्रामाण्य मानणारे देखील असली संमति मिळविण्याची खटपट करतात, कारण त्याशिवाय समाधान होत नाहीं. तसेंच परमार्थांतही आपण ज्या मार्गानें जात असतों तोमार्ग बरोबर आहे. असें सांगणारा जो तो गुरु. त्यानें आपला मार्ग बरोबर आहे, असें म्हटलें म्हणजे समाधान वाटतें. तसें सावित्रीनें आपल्या पतीचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें होतें, आणि त्या जड देहांत हळू हळू चैतन्य येत होतें, तें पाहून तिला समाधान वाटत होतें कारण सुषुप्तींतून जागृतींत येतांना म्हणजे येत असतांना, आत्मा सावकाश येत असतो. म्हणजे हळू हळू जागा होत होत माणूस पूर्ण जागा होतो ही शास्त्रीय पद्धत तिला माहीत होती. निज-तांना देखील सुषुप्तीची क्रिया म्हणजे झोंपेचा अंमल हळू हळूच येत असतो म्हणजे आत्मचैतन्य परत येऊन त्याच्या सत्तेनें सगळीं कामें सुरू होईपर्यंत त्यांत आनंद वाटत नाहीं. कारण आनंद हा आत्मस्वरूप आहे. उसाचा रस गोड आहे म्हणजे काय ? तर गोडी ही आत्मरूप आहे. वरचीं टरफलें काढून टाकून गाभ्यांतला (आत्म्यांतला) रस तेवढा काढून घेतला पाहिजे. आणि वरचीं टरफलें आणि चोयट्या

फेंकून दिल्या पाहिजेत. कारण रस जो आहे तो गाभ्यांत आहे. तसें आत्मानंद जो आहे, तो आपल्यापाशींच आहे, पण त्याच्यावरचीं वासनांचीं टरफलें फेंकून देऊन त्याची गोडी घेण्यास शिकलें पाहिजे. त्याला साधनांची जरूरी आहे. झोंप चांगली यावी म्हणून आपण मच्छरदाणी लावतों. पण हुकमी झोंप आणणें ही क्रिया खरी. पण त्याला मोठ्यांच्या उपदेशाचें आणि साधनांचें साहाय्य लागतें. तसेंच झोपेंतून उठवितांना माणसाला हळू हळू उठवितात. असें कां? याचे संकेत शास्त्रांत सांपडतात. ते सिद्धप्रयोग असतात. आणि मैलाच्या दगडाप्रमाणें तुम्हांला पुढें जाण्यास मदत करतात. ही कर्मकथा कां आठवली? तर सावित्री आपल्या नवऱ्याचें प्रेत घेऊन बसली होती. त्यांतून कांहीं वेळ आत्मा निघून गेल्यामुळें तें जरा ताठून गेलें होतें. जसें त्याला निजविलें होतें, त्याच तऱ्हेनें त्याला आपल्या मांडीवर पुन्हां घेऊन सावित्री त्याला कुरवाळूं लागली. हळू हळू तो सावध होऊं लागला. आणि पूर्ण सावध झाल्यानंतर त्याला असें वाटलें कीं, आपण फार लांबचा प्रवास करून आलों आहोंत. असें कां वाटतें? हें त्याला समजेना. मनुष्यसंगतींत म्हणजे कोणाच्या तरी बरोबर आपण फिरावयास गेलों कीं, किती लांब जातों हें समजत नाहीं. पण इंद्रियें सांगतात म्हणजे पाय दमतात, भूक लागते आणि मग आपल्याला वाटतें कीं, आपण दमलो आहोंत तसें सत्यवानाला दमल्यासारखें वाटलें. असें कां वाटतें? तें समजत नाहीं; त्यालाहि तसेंच होत होतें म्हणून तो सावित्रीला म्हणाला, मला किती झोंप लागली?

मला कां जागें केलें नाहींस ? सावित्री म्हणाली, महाराज आपल्याला कशी सुंदर झोंप लागली होती. कारण आश्रमांत म्हाताऱ्या आईबापांचे देखत आपल्याला अशी माझ्या मांडीवर निजून कधीं झोंप घेतां येत नव्हती. सत्यवान म्हणाला, सावित्री, पण मला जागें कां केलें नाहींस ? मला स्वप्न पडलें कीं, माझ्या उशाशीं एक काळा माणूस येऊन माझ्या गळ्याला फांस लावून नेत होता. सावित्री म्हणाली, महाराज, आपण माझ्या मांडीवर फार वेळ निजलां होतांत हें खरें.

सत्यवान् म्हणतो, सावित्री, हातापायांत शक्ति नाहीं. असें कां होतें आहे ?

सावित्री सांगते, महाराज, आपण दमलां आहांत. मी उठवितें आपणाला.

सत्यवान् म्हणाला, उठतों, पण शक्ति नाहीं. उठवेना. रात्र अगदीं किर्र झालेली आहे. काय करावें तें अगदीं समजत नाहीं. आजच्यासारखें डोकें कधीं दुखलें नाहीं. आज आपण वनभोजन करूं अशी इच्छा होती म्हणून जेवलोंहि नव्हतों. त्यामुळे जास्त थकवा आला असेल. पण सावित्री, पुन्हां विचारतों, तो पुरुष कोण होता ? जें दिसलें तें खरें होतें का स्वप्न होतें ? तूं त्याच्याशीं बोलत होतीस. तुमचा झगडा चालला होता. एवढें मात्र आठवतें. हें खरें काय ? यावर सावित्री म्हणते—महाराज, या गोष्टी आतां येथें नकोत, त्या आपण घरीं जाऊन बोलूं या. काय हकीकत घडली तें तुम्हांला उद्यां सांगेन. कारण असें पहा कीं, जर आपण आतां येथें जास्त रमलों तर तुमचे आईबाप

काय म्हणतील? सूर्यास्त झाला, रात्र झाली; मला देखील या ठिकाणीं आतां भीति वाटूं लागली आहे. कांहीं सुचत नाहीं.

सत्यवान म्हणतो— सावित्री, मला देखील तसेंच होत आहे. पण आतां रात्रीं जावयाचें कसें? हाहि तेवढाच गंभीर प्रश्न आहे.

सावित्री म्हणते, महाराज, आपण हीं लांकडें पेटवून त्यांचीं नशाल करूं आणि तिच्या उजेडांत जाऊं.

सत्यवान म्हणतो, सावित्री, पण माझे पाय लटपटत आहेत. तेव्हां आपण रात्रभर येथेंच राहूं आणि सकाळीं जाऊं. यावर

सावित्री म्हणते—महाराज, आपण जर आतां नाहीं गेलों तर आपले आईबाप घाबरतील. कारण आपण त्यांची दृष्टि आणि काठी आहांत. याकरितां आपण जर रात्रीं गेलों नाहीं तर ते प्राण सोडतील. म्हणून मी तुम्हांला नेतें, चला.

आईबापांची आठवण होतांबरोबर आई म्हणून, सत्यवान् रडूं लागला. सावित्री त्याच्याजवळ गेली. पदरानें त्याचे डोळे पुसले. समजूत केली. तें दृश्य पाहावयाला दुसरें कोणी नव्हतें.

ती ( सावित्री ) म्हणाली—महाराज, चला.

तिनें त्याचे केंस सांवरले आणि कांखेंत हात घालून त्याला उभें केलें. उभें केल्यानंतर त्याला आपण जमा केलेल्या लांकडाची आणि फळाफुलांची आठवण झाली. आणि त्याबद्दल तो विचारूं लागला. तेव्हां सावित्री म्हणाली,

महाराज, हें सर्व तूर्त येथेंच राहूं दे. आणि उद्यां तुम्ही घेऊन जा.

काय काय ठेवलें ? तर फळांचा तुंबा, लांकडें फुलें वगैरे पण एक गोष्ट नाहीं विसरली. ती मात्र बरोबर घेतली आणि ती म्हणजे परशु म्हणजे कुऱ्हाड.

एका खांद्यावर कुऱ्हाड घेतली आणि नवऱ्याला घेऊन जाऊं लागली. त्यावेळीं आपली सावित्री लक्ष्मीसारखी तेजस्वी दिसूं लागली. नाजूक तिचें शरीर, पण डाव्या खांद्यावर कुऱ्हाड आहे आणि दुसऱ्या खांद्यावर पतीचा हात घेऊन सावकाश आपल्या दमलेल्या पतीला सहन होईल अशा बेतानें चालली होती. कशी शोभली ? तर जसा मदोन्मत्त हत्ती डुलत डुलत जातो तशी ती गजागामिनी फिरे जंगलांतून निघाली आहे.

सत्यवान् म्हणतो—सावित्री, माझा उद्धार केलास, मला असाच घेऊन चल. मला रस्ता माहीत आहे. मी तुला रस्ता दाखवितों त्या रस्त्यानें मला घेऊन चल. चंद्रप्रकाशामुळें आतां थोडा थोडा रस्ता दिसूं लागला आहे. ज्या रस्त्यानें आपण आलों त्याच रस्त्यानें परत जावयाचें आहे. आतां एक पळसाचें झाड येईल. त्याठिकाणीं उजव्या हातानें जो रस्ता जातो त्या रस्त्यानें चल. म्हणजे आपण लवकर घरीं जाऊं. यावर

सावित्री म्हणते—महाराज, आपण असें अधीर होऊं नका. मी तुम्हांला सावकाश नेतें आहे. आपलें डोकें दुखत होतें आणि आपल्याला अशक्तपणा वाटत होता म्हणूनच

विचारतें कीं, महाराज, आतां आपण कसें आहांत ? नाहींतर एकरात्र आपण या पळसाच्या झाडाखालीं राहूं.

सत्यवान् म्हणतो—सावित्री, राहण्याचा विचार नको. आपण चालूं लागूं.

असा त्यांचा परस्पर संवाद चालला आहे. ते काय करतात तें आपण उद्यां पाहूं.

---

# प्रवचन १४ वें

निभतें आहे तोपर्यंत ठीक. या पलीकडे अहंकाराला जागा नाहीं. म्हणून नीतिशास्त्र असें सांगतें कीं, चांगल्या गोष्टीला मुहूर्त नाहीं. चोरी करावयाची असली तर मुहूर्त बघा. कोणतीहि क्रिया करावयाची असली तर तिचा आरंभ चांगला असावा. मन हें क्रियात्मक आहे. नंदादीप अखंड चालू आहे असें आपण म्हणतों पण प्रतिक्षणीं ती ज्योति भिन्न भिन्न होत असते. आपल्याला तसें वाटत नाहीं याचें कारण त्यांत विजातीयपणा दिसत नाहीं इतकेंच. गंगा सारखी वाहते आहे, आपण तिची पूजा करतों. आणि गंध वाहून फूल वाहीपर्यंत पहिली गंगा कोठल्या कोठें जाते. पण आपल्या गंगापूजनांत त्यायोगें अडथळा येत नाहीं. कारण त्याठिकाणीं भावनात्मक गंगा आहे. आणि म्हणूनच ती आहे तेथेंच आहे असें आपण समजतों. ही भावना केव्हां बदलेल आणि केव्हां मध्यें काय होईल हें सांगतां येत नाहीं. म्हणून सक्रिया आचरणांत म्हणजे क्रियेंत येईल तेव्हां खरी. म्हणून काळ, वेळ, श्रम हें न पाहातां जेवढें शक्य असेल तेवढें सत्कर्म आचरून ठेवा. करून ठेवा. कारण सत्कर्म केव्हांहि फुकट जाणार नाहीं. स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् । म्हणून परमार्थ करावयाला मुहूर्त बघूं नका. जेवढें होईल तेवढें पदरांत पाडून घ्या. मन बदलण्याचा घटको घटकीं संभव असतो. याकरितां मनांत आलेली चांगली गोष्ट करून टाकावी. कोणत्या वेळेला काय होईल हें सांगतां येत नाहीं. आपण देवदर्शनासाठीं म्हणून निघालो आणि सिनेमा पाहून परत आलों असें घडेल. इतकेंच नव्हे तर,

ठेंच लागून मेलों असेंहि होईल. इंधन म्हणजे लांकडें, फळें आणि फुलें आणण्यासाठीं वनांत गेलेला सत्यवान घरीं परत आला हेंच महद्भाग्य! त्यावेळीं सावित्री जर त्याच्याबरोबर नसती तर त्याचें प्रेतच घरीं आणावें लागलें असतें! सत्यवान विजयी असो! सावित्री सौभाग्यवती होवो!! पण यांत एक पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हें आधिभौतिक सुख आहे. म्हणजे जाणारें आहे. तसेंच हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्या आधिभौतिक सुखाचा जो आनंद तोच ईश्वरांश होय. कारण ईश्वर हा आनंदरूप आहे. हीं आधिभौतिक-विषयिक सुखदुःखाचीं टरफलें काढून फेंकून देऊन ज्याला मनाची आनंदमय स्थिति जास्त जास्त वाढवितां येईल तोच खरा. आणि प्रयत्नानें ही साध्य होते. उदाहणार्थ, शब्दाचा अर्थ, अर्थांत म्हणजे अनुभवांत आला म्हणजे शब्द टरफल ठरला. दुसरें उदाहरण बदाम म्हणजे काय? तर वरचें पिवळें टरफल, बीं आणि चोथा; या सगळ्याशिवाय जो रसरूपानें पोटांत गेला आणि रक्त बनून शरीरपोषणाला उपयोगी पडला तो बदाम. तसें शब्दाचा अर्थ जो पटला आणि वठला म्हणजे आचरणात आला तोच खरा. तसेंच नामरूपांवरून गुणांमध्यें जो रंगला तो खरा. श्रवण करतां करतां श्रवणरूप व्हावें। हेंचि देवासि मागावें। असें ज्याचें होईल तोच खरा.

एकदां असें झालें कीं, मीराबाई कृष्णलीला पाहावयास बसल्या. समोर कृष्णाची भूमिका करणारा मुलगा नट आहे; आणि आपण पाहातों आहों तें नाट्य आहे हें त्या विसरल्या. आणि कृष्णाची आई यशोदा त्याला मारूं लागली; त्यावेळीं या आपल्या जागेवरून उठून माझ्या कृष्ण परमात्म्याला

मारणारी तूं कोण ? देवाला आपण मारूं नये; हें कसें तुला कळत नाहीं ? असें म्हणून यशोदेचा पार्ट करणाऱ्या त्या नटाला मारूं लागल्या. भगवंताचा अनुभव झाल्यानंतर जें जें भेटे भूत तें तें मानिले भगवंत. असें झालें पाहिजे; तसें झाले म्हणजे या बाह्य आणि दृश्य जगताची किंमत नाहीं हेंच शिकावयाचें आहे, हेंच व्हावयाचें आहे. जसें पोहणें आलें म्हणजे भोपळ्याची किंमत नाहीं, तसें जें जें भेटे भूत । तें तें मानिलें भगवंत । असें झालें म्हणजे दृश्य जगताची किंमत नाहीं. पण याचा अर्थ असा नव्हें कीं, अगदीं प्रथम पासूनच असें करावयाचें असतें. असो ज्याला आपण आनंद असें म्हणतों तो आनंद नसून हर्ष आहे. साबणाचा फेंस आहे. आनंद हें ईश्वरी स्वरूप आहे. हर्ष म्हणजे—गजकर्ण खाजवितां मजा आला, इतकाच त्याचा अर्थ. माणूस लग्नांतहि दमतो आणि प्रेत यात्रेंतहि तसाच दमतो. पण प्रत्येकातली भावना निराळी असते. हर्ष आणि विषाद, सुख आणि दुःख हीं मेहुणें ( दांपत्यें ) आहेत. एकाशिवाय दुसरें नाहीं. हेंच खरें. सुखाला बोलाविलें कीं, सुखाबरोबर दुःख आलेच. त्यांची जोडी फुटणार नाहीं. ज्यावेळेला जें यावयाचें तें येणारच. दंपती ( मेहुण ) सांगितल्यानंतर किंमत नवऱ्याची जास्त का बायकोची जास्त असें विचारलें तर काय सांगाल ? तर ती एकच आहे, सारखीच आहे. असेंच सांगितलें पाहिजे. तसें आनंद आणि दुःख यांची किंमत एकच आहे. कारण एकाशिवाय दुसरें राहात नाहीं. आणि दुसऱ्याशिवाय पहिल्याची किंमत नाहीं. असा त्यांचा अन्योन्य संबंध आहे.

सावित्रीला आपला नवरा जिवंत झाला तो आपल्या पराक्रमानें जिवंत झाला म्हणून आनंद झाला. काय त्या आनंदाचें वर्णन करावें ? आनंदाची परम सीमा झाली. पण तो हर्ष होता–त्यांत एकच उद्वेग उत्पन्न झाला कीं, आतां लवकर कसे घरीं जाऊं ? मॅट्रिक पास झाला, रिझल्ट पाहिला, आनंद झाला, पेढे वाटले; येथपर्यंत ठीक ! पण लगेच–पुढें काय ? असा पेंच प्रश्न आहेच ! म्हणून सुखदुःख मानीव आहे. केवळ अध्यात्मिक दृष्टीनें (दृष्टीचा) माणूस या जगाचा विचार करूं लागला तर असें दिसून येईल कीं, हा गाडा ढकलावयाचा आहे इतकेंच. कितीहि केलें तरी असेंच राहणार; हें कळले म्हणजे हें सगळें नश्वर आहे असें कळतें. आणि त्यापासून उत्पन्न होणारें जें समाधान त्यालाच आनंद असें म्हणतात. तोच म्हणून सुखांत राहूं शकतो कीं, जो सर्व परिस्थितींत सारखाच असतो. ज्या पदार्थावर तो प्रेम करतो तोच कापून टाकला पाहिजे. हर्ष, विषाद, भय आणि उद्वेग, ह्यांपासून जो दूर झाला तोच खरा. प्रेमाचें लक्षण काय म्हटलें, तर या छातीच्या आंत कोणी-तरी कुरतुडतें आहे असें वाटतें. आपला नवरा परत मिळाला असा आनंद सावित्री झाला तर अपरात्र झाली, आई बाबा काय म्हणतील ? याचा उद्वेग सत्यवानाला झाला. सावि-त्रीचा आनंद आणि सत्यवानाचा उद्वेग आणि त्या उद्वे-गानें दोघेंही दुःखी झालीं तसें सुख आहे. पण प्रेमाची आठवण झाली कीं, म्हणते बचन नाहीं आणि दुःखाला चोलावते.

सुख अनुभवितां येत नाहीं आणि दुःख दूर करतां येत नाहीं तर हें कसें करतां येईल, तें तत्त्वज्ञानानें समजतें. नाहींतर नेहमीं माणूस संदेहांत मरत असतो. सत्यवान आणि सावित्री यांच्या मनांत वर सांगितल्या प्रमाणें आनंद आणि उद्वेग आहे तर सत्यवानाच्या म्हाताऱ्या आई-बापांना आज दोन दुःखें आहेत. आपला मुलगा गेला आहे म्हणून एक दुःख तर आज कधींहि आश्रमाबाहेर न जाणारी सावित्रीहि त्याच्याबरोबर गेली आहे हें दुसरें दुःख कोणाचेंहि पाऊल वाजलें कीं, सत्यवान! सावित्री अशा आईबापांच्या हाका सुरू झाल्याच आणि कोणी ओ दिली नाहीं कीं, प्रत्येकाला विचारीत कीं, आला कां हो सत्यवान? मग उत्तर मिळे कीं नाहीं आला. शेवटीं हताश झालीं आणि म्हातारा आणि म्हातारी त्यांना शोधण्यासाठीं स्वतः आपल्या आश्रमाच्या बाहेर पडलीं कुश-कंटक दर्भाचे कांटे (दर्भाच्या बुडख्याचे) पायांत मोडताहेत. त्याकडे लक्ष न देतां म्हातारा म्हातारी उन्मत्ताप्रमाणें त्या वनांत आपला मुलगा आणि सून यांच्या शोधार्थ धांवूं लागलीं त्यांची ती अवस्था पाहून शेजारची आणि आसपासची आश्रमवासी ऋषि मुनि मंडळी त्याचें सांत्वन करण्याचा उद्देशानें त्यांच्या भोंवतालीं येऊन बसली अशानें विकार थोडा कमी होतो. आधणाच्या पाण्यांत शीतल जल घातलें तर तें कोमट होतें. तसें आसपासची ऋषि मंडळी जमली आणि त्यांच्या मनाच्या शांततेसाठीं चार प्राचीन इतिहास सांगून त्यांनीं त्यांचें समाधान केलें. जरा वेळ समाधान झाल्यासारखें वाटे पण पुन्हा आठवण होई. शेवटीं असा प्रसंग आला की, दुःख असह्य झालें

आणि म्हातारा–म्हातारी ओरडूं लागले कीं, अरे सत्यवान् आणि सावित्री ! कोठें आहांत, ? इतक्यांत एका ब्राह्मणानें येऊन सांगितलें कीं, राजा, सत्यवान आणि सावित्री दोघेंही खुशाल आहेत. सावित्री पूर्ण सौभग्यवान् आहे आणि तिचा पति सत्यवान खुशाल आहे. तो ब्राह्मण हें आनंदाचें वर्तमान सांगत आहे इतक्यांत राजाला डोळे आले. त्यानें ती मंडळी पाहिली. भोंवतालचे ऋषि म्हणाले–राजा, तुला डोळे आले, ही शुभ गोष्ट आहे. तुझ्या मुलानें तुला ही दृष्टि मागितली असली पाहिजे. असा संवाद चालला आहे. इतक्यांत सत्यवान आणि सावित्री त्या ठिकाणीं येऊन पोहोंचली म्हातारा–म्हातारी धांवले, मूढ झाले. सत्यवान आणि सावित्री या दोघांनीं त्यांना आणि जमलेल्या सर्व मंडळींना नमस्कार केला. सत्यवान त्या लोकांत बसला आणि सावित्री आपल्या सासूच्या जवळ जाऊन विनयानें उभी राहिली. लोकांनीं सत्यवानाला विचारलें कीं, बाळा, तुम्हांला यावयाला इतका उशीर कां झाला ? लौकर कां नाहीं आलांत ? म्हातारा-म्हातारी रडत आहेत ना? सत्यवान म्हणाला, महाराज मी फळें फुलें तोडलीं. आणि लांगडें तोडावयास लागलों. थोडींशीं लांकडें तोडलीं आणि माझें डोकें दुखूं लागलें. डोक्यांत असह्य अशा वेदना होऊं लागल्या, डोकें फार दुखूं लागलें म्हणून मी सावित्रीच्या मांडीवर थोडा वेळ निजलों तर इतका वेळ झाला.

मग अशा अपरात्रीं कां आलांत ? त्यांनीं विचारलें त्यावर सत्यवान म्हणाला कीं, महाराज, माझ्या वृद्ध मातापित्यांना आणि तुम्हांला त्रास आणि कष्ट होऊं नयेत म्हणून

नाहींतर मी खरोखरीं दमलों आहे. मग गौतमानें विचारलें कीं, बाळ सावित्री, आतां तूं सांग कीं द्युमत्सेनाला डोळे कसे आले ?

सावित्रीनें हात जोडले, सगळ्यांना नमस्कार केला आणि म्हणाली महाराज काय सांगूं ? मला कांहीं सुचत नाहीं. पण आपली आज्ञा आणि सर्वांची इच्छा म्हणून जें सुचेल तें सांगतें ऐका—आमचें लग्न ठरलें. त्यावेळीं हे सत्यवान एक वर्षानें मरणार असें नारदांनीं सांगितलें होतें.

पण मी यांना अगोदरच मनानें वरलें असल्यामुळेंच आमचा विवाह झाला. येथें आल्यानंतर मी दिवस मोजीत होतें. आणि यांच्या प्रत्येक हालचालीवर माझें लक्ष होतें माझ्या हिशोबाप्रमाणें तो दिवस उजाडला आणि म्हणून मी आपल्या सासु–सासऱ्यांची परवानगी घेऊन त्या दिवशीं सत्यवानांचे बरोबर वनांत गेलें. ठरल्याप्रमाणें यांचा मरण-काल आला. यमानें यांचे प्राण हरण केले. हे मेले आणि यम जाऊं लागला तेव्हां मी त्या यमधर्मांच्या पायां पडले, त्यांचें स्तवन केलें आणि त्यांनीं प्रसन्न होऊन या मुलीला तिचें सौभाग्य परत केलें. आणि अशा तऱ्हेनें मी यांना परत आणलें. यमाशीं वादविवाद केला असें नाहीं सांगितलें तर मी यमराजाचें स्तवन केलें असें सांगितलें. सावित्री पुढें म्हणाली कीं, महाराज यमराज प्रसन्न झाले आणि त्यांनीं मला पांच वर दिले. प्रथम चार वर देईपर्यंत त्यांनीं एक जबरदस्त अट घातली कीं सत्यवानाशिवाय काय हवें तें माग. सत्यवानाशिवाय त्यांनीं मला स्वर्गही दिला असता तरी तो मला नकोसा होता. पण मोठ्यांचें मन

दुखवूं नये आणि त्यांनीं जें दिलें असेल त्यांत प्रथम समाधान मानावें, आणि मग हळू हळू जास्त मागावें त्यांची ती अट मी मान्य केली आणि पहिल्या वरानें मी आपल्या सासू-सासऱ्यांना डोळे आणि संपत्ति मागितली. दुसऱ्या वरानें त्यांचें गेलेलें राज्य त्यांना परत मिळावें असें मागितलें. माझ्या बापाला मुलगा नव्हता म्हणून तिसऱ्या वरानें मी आपल्या बापाला कुलशीलवान आणि वंशवृद्धि करणारे असे शंभर औरस पुत्र मागितले. चौथ्या वरानें यमराज पूर्ण प्रसन्न आहेत असें पाहून मी स्वतःसाठीं औरस असे शंभर पुत्र मागितले; आणि कृपाप्रसादाच्या आधारावर मी आतां सत्यवानाला परत मागणार इतक्यांत त्यांनींच मला कांहींही अट न घालतां वाटेल तें माग असें सांगतांच मी आपलें सौभाग्य परत मागितलें! आणि त्याच्या कृपेनें आणि आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादानें त्यांनी तें मला परत दिलें. मला शंभर मुलें आणि सत्यवानांना चारशे वर्षें आयुष्य दिलें. महाराज, इतकें मिळवून मी आलें आहे आणि अशा तऱ्हेनें आज आम्ही दोघें आपल्यापुढें उभीं आहोंत. आणि म्हणून आम्हांला येण्यास थोडा उशीर लागला. याबद्दल आपण सर्वांनी आम्हांला क्षमा करावी आणि आशीर्वाद द्यावे अशी माझी आपल्याला विनंति आहे, असें म्हणून तिनें सर्वांना नमस्कार केला. सगळ्यांनीं तिला आशीर्वाद दिला आणि सांगितलें कीं, सावित्री, आज आपत्तींत बुडालेलें कुल तूं आपल्या तपश्चर्येनें उद्धरलें आहेस. अंधारांत पडलेल्यांना उजेडांत आणलें आहेस आणि लहान

माणसांनीं मोठ्या माणसांशीं कसें वागावें याचा धडा जगाला दिला आहेस. तुझा जयजयकार असो !

अशा तऱ्हेनें रात्र निघून गेली तोंच पहाटें राजा द्युमत्सेनाचें प्रधानमंडळ आलें आणि आपणच म्हणालें, "महाराज, आम्ही शत्रूला हुसकावून लावलें आणि आपणच राजे असावेत अशी आमची इच्छा आहे. आपल्या सैनिकांना आणि प्रजाजनांचाहि तसाच आग्रह पडल्यामुळें आम्ही आपल्याला तशी विनंति करण्यासाठीं राजचिन्हें आणि पोषाख घेऊन आलों आहोंत. तर चला आणि आपल्या हातीं घ्या."

हें ऐकून त्या ऋषिमुनींनीं एकमतानें सदिच्छापूर्वक राजाला सांगितलें कीं, राजा, तूं सुखांत जातो आहेस तर खुशाल जा.

राजा द्युमत्सेन, त्याची राणी, मुलगा सत्यवान् आणि सून सावित्री यांनीं आपलें वनवासी पोषाख टाकून प्रधानांनीं आणलेलीं राजचिन्हें आणि राजश्रीयुक्त पोषाख परिधान केले आणि ऋषि-मुनींना वंदन करून आणि त्यांचे आशीर्वाद घेऊन त्यांनीं आपल्या राज्याकडे प्रयाण केलें. सगळ्या ऋषिमुनींना सावित्रीच्या आचरणाबद्दल मोठें कौतुक वाटलें. आणि ती आज त्यांच्यांतून गेली म्हणून थोडें वाईटही वाटलें. पुढें सावित्रीला शंभर भाऊ आणि शंभर मुलें झालीं.

मार्कंडेय धर्मराजाला विचारतात—राजा, आहे का तुझ्या बायकोसारखी ही स्त्री ? तिनेंहि धृतराष्ट्राला प्रसन्न करून तुमच्या हातांत शस्त्रें दिलीं आहेत. आतां पुढें तुमचें काम

आहे कीं, राज्य कसें कमवावयाचें ! सावित्रीनें आपल्या सासरच्या आणि माहेरच्या कुलांचा उद्धार केला. राजा, तुझी बायकोहि तुमच्या कुलाचा उद्धार करणारी आहे. तुझी बायको अशी आशी आहे आणि तिचे तुमच्यावर फार उपकार आहेत असें जें मला वाटतें त्यांत कांहीं अर्थ नाहीं. अशा शीलसंपन्न, विनयशील आणि शूर स्त्रिया या आर्यावर्तांत होत्या."

असो, मघाशीं सांगितल्याप्रमाणें द्युमत्सेन सहकुटुंब सहपरिवार आपल्या राज्यांत-राजधानींत गेला. पुढें त्यानें कांहीं वर्षें राज्य केल्यानंतर तें राज्य आणि राज्यव्यवस्था आपला मुलगा जो सत्यवान त्याचे स्वाधीन करून आपण परमार्थ चिंतनासाठीं पुन्हां अरण्यांत येऊन राहिला. पुढें सत्यवान आणि सावित्री यांनीं आपल्या मुलां-लेंकरांसह उत्तम प्रकारें चारशें वर्षें राज्य केलें. हें सावित्री आख्यान सांगणारांचें, ऐकणाराचें आणि लिहिणाराचें कल्याण परमेश्वर करतो. तसेंच तो तुमचें आणि माझें करो असें सांगून हें आख्यान आणि त्याबरोबर आजचें प्रवचन संपवितों उद्यांपासून गीता-पंधरावा अध्याय.

शुभं भवतु ! श्रीकृष्णार्पणमस्तु !

म. ग्रं. सं. ठाणे,
ग्रा. क्र. ८८६८
IRBK-0106978